# Travelogues

Author: Prof. Dr. B. G. Joshi


सिंगापूर सहल: २००१ .......... 2
पंजाब - देवभूमी .......... 12
आमची केरळ सहल .......... 34
Tulip Festival, Seattle .......... 51
Lake Chelan .......... 53
BON VOYAGE .......... 57
Whale Watching .......... 67
Vancouver .......... 68
Shakespeare Festival .......... 72
Crater Lake .......... 75
Ocean Shores, Quinault .......... 78
Jasper National Park ( Alberta ) .......... 82
अमेरिकेतील काही छोट्या सहली .......... 85
व्रजभूमी .......... 92
व्हिक्टोरिया - कॅनडा .......... 105
दक्षिण भारत सहल .......... 112

## सिंगापूर सहल: २००१

आम्ही Seattle मध्ये असताना काही महिन्यांपूर्वी आमचा जयंत उमराणी  व मीना उमराणी  यांचाशी परिचय झाला. अभयचा मित्र संजय जेजुरीकर याचा  तो नातेवाईक होता व सिंगापूरच्या त्याच्या ऑफिस मधून काही महिने बदलीवर आला होता. अधिक परिचयानंतर कळले की तो माझे थोरले भाऊ अण्णा याचा  जिवलग मित्र वसंत उमराणींचा दोन नंबरचा मुलगा होता. वसंताचा थोरला भाऊ शेखर याच्याशी आमची पुण्यामध्ये असताना खूप घसट होती त्यामुळे जयंतची  व आमची घट्ट मैत्री होण्यास वेळ लागला नाही. गप्पांमध्ये त्याने आम्हाला भारताला परत जाताना सिंगापूर भेटीचे मनापासून आमंत्रण दिले. सिंगापूरबद्दल, तेथील स्वच्छता, शिस्त, स्वस्ताई, रहदारीचे कठोर निर्णय या बद्दल खूप ऐकले होते. त्यामुळे आम्ही या आमंत्रणाचा फायदा घेण्याचे ठरवले.

30 एप्रिल 2001 रोजी जयंतचे  स्पॉन्सर लेटर आले व अभय-अंजूने आमचा सिंगापूर व्हिसा व परतीचा कार्यक्रम ठरवला. चार ते नऊ जून सिंगापूरला थांबणार होतो.  3 जूनच्या रात्रीपर्यंत बॅगा भरून गप्पा मारीत जागे होतो. आम्ही थेट भारतात जाणार असल्याने आम्हाला निरोप देण्यासाठी सर्व जागे होते. रात्री दीडला घरून  निघालो. फ्लाईट रात्री तीन पन्नासला सुटली. विमानात असताना समोरच्या छोट्या टीव्हीवर 180 रेखावृत्त ओलांडलेले पाहिले व सोमवार ओलांडून परत सोमवार मध्ये प्रवेश केला (तोच दिवस परत सुरू झाला होता). Eva Air ची

एक खासियत म्हणजे हिंदू फुड व्हेजिटेरियन भरपूर खाऊ घालतात.

१२ तासांनी पॅसिफिक महासागर ओलांडून आम्ही तैवानच्या राजधानीत ताइपेइ मध्ये प्रवेश केला. Eva Air ही तैवानची राष्ट्रीय विमान कंपनी आहे. आमचा प्रवास पश्चिमेकडे असल्याने आम्ही रात्रीतून दिवसाकडे येत होतो. सकाळच्या सव्वानऊ वाजता तैवान टाईम प्रमाणे, तीन तासांच्या मुक्कामानंतर आम्ही तैपेई सोडले. Eva Air ही नवी एअरलाइन असल्यामुळे विमाने नवी, स्वच्छ व अपटूडेट होती. कर्मचारी तत्पर, आर्जवी होते. खाणे पिणे वारंवार व भरपूर होते. आम्ही दोघे या airline वर खूप खूश होतो. दुपारी १-४० वाजता आम्ही सिंगापूरला पोहोचलो. सिंगापूर व ताईपेइचे स्टँडर्ड टाईम एकच आहे.

लगेजच्या पट्ट्यावरून आमच्या दोन बॅगा घेऊन बाहेर आलो. जयंत आमची वाट पहात बाहेर उभा होता. विमानप्रवास बराच वेळा झाल्यामुळे आम्ही औपचारिक गोष्टींना सरावलेलो होतो. जयंतने आम्हाला त्याच्या गाडीने तीन वाजता घरी आणले. जयंतचे घर प्रशस्त, सुंदर व कलात्मकरीत्या सजवलेले होते - पडदे, रंगसंगती व बाहेरचा view. सोसायटीच्या सर्व घरांना एकच रंग होता आणि सगळ्यांचे सेटिंग एकसारखे होते त्यामुळे आकर्षक वाटत होते. I was impressed. आम्हाला घरी सोडून जयंत ऑफिसला गेला. मीना आमचे जेवण डायनिंग टेबलवर तयार ठेवून सिटी बँकेच्या तिच्या ऑफिसला गेली होती. थोडेसे खाऊन आम्ही विश्रांती घेत पडलो.

संध्याकाळी दोघे घरी आल्यावर East Coast Beach पार्कला गेलो व जेटीवरून बंदरातील बोटीपर्यंत जाता येत होते. पण थकलो असल्याने फारसे न चालता या सर्व गोष्टींचा दुरूनच आस्वाद घेतला. सिंगापूरचे पहिले दर्शन - प्रशस्त स्वच्छ मोठा विमानतळ, स्वच्छ व सुंदर शिस्तबद्ध वाहतूक व सुंदर रेखीव इमारती - झोपेतही आम्हाला खुणावत होते.

या प्रवासात wheel-chair सर्विसने आम्हाला प्रभावित केले. एरवी व्हीलचेअरसाठी थांबावे लागत असे. विमानापासून काही अंतरावर त्या थांबत असत, आणि विमानातून उतरून खाली आल्यानंतरच ती सेवा मिळत असे. पण या खेपेला विमानाच्या दारापासूनच दारापर्यंत ही सेवा मिळाली, थांबावे लागले नाही. Seattle ताईपेई व सिंगापूर या तिन्ही विमानतळावरून विमानात आम्हाला सामानासह तिथपर्यंत प्रथम प्रवेश मिळाला.

### 6 जून 2001 बुधवार

जयंतच्या सूचनेनुसार आम्ही लवकर उठून साडेसातला तयार झालो. सिंगापूरचे सर्वात प्रसिद्ध स्थळ सेंटोसा बेट पहायला निघालो. जयंतने गाडीने आम्हाला प्रवेशद्वाराजवळ पोचवले. तेथील exchange सेंटर मध्ये आम्ही यु एस डॉलर सिंगापूर डॉलर्स मध्ये बदलून घेतले व आमची तिकिटे घेतली. आम्हाला सोडून जयंत निघून गेला आणि आम्ही मुक्तपणे आमची सहल सुरू केली. Elevator ने पंधराव्या मजल्यावर पोहोचलो आणि एका केबल कारने समुद्रावरून सेंटोसा कडे निघालो. वरून

खालचे हिरवेशार पाणी, बंदरातील मोठा विविध देशांच्या बोटी, दाट विषुववृत्तीय अरण्य मस्त वाटत होते. तीस मिनिटे मध्यम गतीने जाणारी केबल राइड हा एक अनोखा रमणीय अनुभव वाटला.

बेटावर उतरल्यानंतर पहिला शो  समोर आला - 'इमेजेस ऑफ सिंगापूर' याचे तीन भाग होते. १. pioneers of Singapore २. Surrenders of Singapore (once in 1942 to Japan, second  time in 1945 Japan to Britain) आणि ३. Festivals of  सिंगापूर. तिन्ही विभाग वास्तववादी व्यक्ती व देखाव्याद्वारे जिवंत  वाटावे इतके आकर्षक होते.

दुसरा  शो होता 'Underworld'. या विभागात अनेक प्रकारचे मासे, सागरी प्राणी, व्हेल, डॉल्फिन, शार्क ऑक्टोपस इत्यादी आणि इतर सागरी वनस्पती यांचे दर्शन होते. त्यांच्या मध्ये विविधता होती व जिवंतपणा होता.

तिसरा कक्ष होता Cinemania. या विभागात अनेक रोलर कोस्टर राइड होत्या. काही सोप्या साध्या तर बहुसंख्य आकाशामध्ये नेणाऱ्या व तरूण लोकांना thrilling आणि वृद्धांना scary अशा होत्या. आम्ही २-३ rides घेऊन चौथ्या आकर्षणाकडे गेलो - Monorail. या एक रूळी रेल्वे ट्रेनला सात स्टेशने होती व राईड विनामूल्य होती. आम्ही दोन वेळा तो प्रवास केला. पहाणे व अनुभवणे संपले होते. संध्याकाळी साडेपाच वाजता आम्ही परत Cable ride जवळ आलो. अधून मधून फोन करून जयंत मीना आमच्याशी संपर्क साधत होते.

केबल राईड आम्हाला खूप आवडली pleasant and spectacular. Single-use कॅमेऱ्यावर आम्ही दोन रोल संपवले होते. सहा वाजता वर्ल्ड ट्रेड सेंटरजवळ जयंत आम्हाला भेटला आणि आम्ही घरी आलो. दुपारी आम्ही मीनाने दिलेले toasted सँडविचेस व ज्यूस कॅन्सचा लंच म्हणून उपयोग केला. घरी चहा बिस्किटे घेऊन थोडी विश्रांती घेतली.

रात्री साडेआठ वाजता जयंतबरोबर आम्ही शहरातील एका साउथ इंडियन हॉटेलला भेट दिली. मीना बँकेतून डायरेक्ट तिथे आली होती. डोसा इडली सांबार व बदाम दूध असे पोटभर जेवण केले व फिरत फिरत घरी आलो. सहलीचा वृत्तांत डायरीमध्ये लिहिला आणि निद्राधीन झालो.

### 7 जून 2001 गुरुवार

उठायला थोडा उशीर झाल्यामुळे प्रातर्विधी लवकर आटपले. मीनाने तयार केलेला ब्रेकफास्ट व स्नॅक्स डब्यात घेऊन टॅक्सीने Jurong पार्कमधे आलो. तिकिटे विकत घेऊन आत शिरलो. अमेरिकेत सराव झाल्यामुळे (अभयने मुद्दाम आम्हाला याबाबतीत प्रवास व पैसे यांचे स्वातंत्र्य शिकवले होते) आम्ही दोघे कोणावरही अवलंबून न राहता Sight seeing मुक्तपणे करत होतो. आम्ही अनेक प्रकारचे पक्षी पाहिले. फ्लेमिंगो, तलावातील मोठे पक्षी, वेगवेगळ्या प्रकारची घुबडे, Birds of Prey, गरूड, Falcon Hawk इत्यादी. एका वेगळ्या विभागात बर्फाच्या ढिगाऱ्यात आम्ही दहा-बारा Penguins पाहिले. हा

दुर्मिळ पक्षी त्याचे ते जाडे लठ्ठ गर्भिणीसारखे पांढरेशुभ्र पोट, सारखी हलणारी गर्द निळी चोच, खाली बदकासारखे छोटे-छोटे पंजे व हळूहळू चालणारा हा पक्षी आम्ही प्रथमच पाहात होतो. एका वेगळ्या थंडगार विभागात बर्फाळ  पाण्यात त्यांना ठेवले होते. बाहेर पडताना एक पक्षीवाला आमच्या जवळ आला, आमच्या  खांद्यावर, हातावर प्रत्येकी तीन चार रंगीत पक्षी ठेवले व आमचे फोटो घेतले.

Jurong पार्कमधून आम्ही टॅक्सीने सायन्स सेंटरला आलो. फिरता फिरता एका हॉलजवळ आलो. नाव होते 'Chamber of Mirrors'. आतमध्ये मयसभेसारखा देखावा होता. सर्व भिंतींना छतांना स्वच्छ आरसे लावले होते व मधून मधून रंगीत वस्तूही ठेवल्या होत्या.  प्रेक्षक, वस्तू  व त्यांची सहस्त्रावधी प्रतिबिंबे. याचा गदारोळ व जल्लोष इतका झाला की खरं काय खोटं काय हेच समजेनासं झालं. एखाद्या प्रचंड कॅलिडोस्कोपप्रमाणे प्रतिबिंबांचा सागर तयार झाला होता. इंदूरच्या शीशमहालाची मला आठवण झाली. पण हा शीशमहाल अतिशय प्रचंड होता. स्पर्श केल्याशिवाय आरशांचे अस्तित्व कळत नव्हते.

चार वाजता मयसभेतून सुटका करून घेऊन आम्ही शेजारच्या I-Max थिएटरमध्ये आलो. I-Max मधला मूवी म्हणजे एक विलक्षण रोमांचकारी अनुभव असतो. सिएटल मध्ये असताना आम्ही 2 चित्रपट पाहिले होते: Volcanoes of Saint Helena आणि Journey to the West. नुकतेच हे तंत्र प्रगत राष्ट्रात सुरू झाले होते आणि तो अनुभव मोठा भारावून टाकणारा  होता. सिंगापूर मधील I-Max मूव्ही मध्ये आम्ही "Journey  to

Amazing Caves" हा पिक्चर पाहिला. पाहताना अंगावर काटा उभा राहत होता इतका रोमांचकारी अनुभव होता.

संध्याकाळी सहा वाजता जयंतबरोबर आम्ही घरी आलो. साडेसात वाजता आम्ही Night Safari पाहण्यासाठी निघालो. सुरूवातीस आम्ही रात्री जागे असणारे प्राणी पाहिले, उदाहरणार्थ, अजगर, कोल्हे, तरस, लांडगे व रात्री विहार करणारे पक्षी - घुबड, पिंगळा, गरूड इत्यादी. प्राणी जंगलात स्वैर विहार करत होते आणि आम्ही ट्रामच्या काचेतून त्यांना निरखत होतो. विविध प्रकारची हरणे, गवे, रेडे, वाघ, सिंह आपापल्या सुरक्षित विभागात हिंडत होते. हा कार्यक्रम खास आकर्षक वाटला नाही. 1978 साली मी स्कॉटलंड ला Sterling सफारी पार्कमध्ये गाडीमधून असाच फिरलो होतो. त्यावेळी एक वाघ आमच्या गाडीच्या जवळ आला होता. काचेतून त्याची व माझी नजरानजर झाली त्यावेळी एक विलक्षण भीती आणि आकर्षण यांचे जे रोमांचकारी मिश्रण मी अनुभवले त्याला कशाची तोड नाही. तेथे तो मुक्त होता व मी बंदिवान होतो. अकरा वाजता आम्ही घरी आलो, जेवलो व झोपलो.

## ८ जून २००१ शुक्रवार

सिंगापूरला Shopping Paradise म्हणतात. इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, jewellery, शोभेच्या वस्तू, furniture, छोटी छोटी उपकरणे खूप स्वस्त मिळतात. अमेरिकेत १० डॉलरला

मिळणारी वस्तू इथे सिंगापुरी १० डॉलरला मिळते. म्हणजे जवळ जवळ ५०% स्वस्त. विविधता आणि विपुल प्रमाणात.

जयंतने आम्हाला 'मुस्तफा' नावाच्या प्रचंड सुपर स्टोअरमध्ये सोडलं. या मॉलच्या ७ इमारती एकमेकांना ब्रिजने जोडलेल्या आहेत. खरेदीपेक्षा आमचा पाहण्यात, विविधता निरखण्यात जास्ती वेळ गेला. नाही म्हटले तरी २ सुंदर साड्या (प्रत्येकी १४ डॉलर रु.२४०, त्यावेळचे), माझ्यासाठी wrist watch, rolled gold सिटीझन,ऑल प्रूफ ४४ डॉलरला, २ calculators, १ इलेक्ट्रॉनिक रेझर, १ make-up box, १ टॉर्च व १ रेनकोट अशी १०५ डॉलर्सची खरेदी आम्ही केली. मोहात पडावं अशी कितीतरी रत्नजडित jewellery विपुल प्रमाणात व विविध प्रकारात उपलब्ध होती. It was indeed a fascinating mall, difficult to resist. ५ वाजता टॅक्सिने आम्ही घरी आलो.

विश्रांती घेऊन आम्ही सिंगापूरच्या शेवटच्या कार्यक्रमाला रात्री ९ वाजता निघालो. Clark's key नावाच्या बोटीच्या धक्क्यावर आम्ही गाडीने आलो. एका मोटरबोटने आमचा मोठ्या खाडीमध्ये River Cruise सुरू झाला. सिंगापूर आंतरराष्ट्रीय बंदराचे रात्रीचे दर्शन विलक्षण सुंदर होते. देशोदेशीच्या प्रचंड बोटी नांगर टाकून उभ्या होत्या. मोठमोठ्या क्रेन्सच्या साहाय्याने मालाची चढउतार चालू होती. बंदरावरचे मोठे मोठे दिवे आणि बोटींवरले दिवे यामुळे बंदर व सारा परिसर झगमगत होता. सिंगापूर हे हिंदी महासागरातील प्रमुख आंतरराष्ट्रीय बंदर असल्याने सतत गजबजलेले असते. एका प्रचंड विशाल बंदराचा परिसर आम्ही प्रथमच पाहत होतो. आमची बोट मोठमोठ्या

बोटींच्या जवळ जाऊन तिथला जिवंतपणा दाखवत होती. खूप आत जाऊन आल्यावर व तासभर cruise केल्यावर आम्ही धक्क्यावर परत आलो. आम्ही दोघेच या cruise वर गेलो होतो. मग आम्ही चौघांनी गोदीच्या जवळच्या हॉटेलमध्ये mixed flavours चे (वॅनिला चॉकोलेट आणि पिस्ता) cone icecream भरपूर खाल्ले व ११ वाजता घरी आलो. आज आमच्या सिंगापूर सहलीचा शेवटचा दिवस होता. सेंटोसा Island, Jurong bird पार्क, नाइट सफारी व आजची रात्रीची रिवर क्रूझ यांची स्वप्ने पहात पहात आम्ही झोपी गेलो.

## 9 जून 2001 शनिवार

आज सुट्टी असल्याने चौघे आरामात उठलो. आम्ही दोघे नऊ वाजता तर जयंत मीना अकरा वाजता. सर्वांचीच संकष्टी चतुर्थी असल्याने उपवासाची खिचडी व आंबा नारळ बर्फी यांच्यावर उपास साजरा झाला. सिंगापूरच्या सर्व छान छान गोष्टी बघून झाल्या होत्या. पण या सर्वांना एक गालबोट होते ते म्हणजे तिथला विषुववृत्तीय उष्मा. आधीच सिंगापूरचे विषुववृत्तीय हवामान, त्यात जून महिन्यात व सर्व हॉटेल्स इमारती मॉल्स गाड्या एसी असल्याने यातून बाहेर पडलं की घामाची आंघोळ सुरू व्हायची. ’आहे मनोहर तरी उन्हाळ्याचा त्रास’ असे सारखे म्हणावे लागत होते. फ्लाइट संध्याकाळी असल्याने सवडीचा फोनाफोनी करण्यात उपयोग केला. आशिष पेठेला मुंबईला फोन करून आमची मुंबईला पोहोचण्याची वेळ

कळवली. त्याने एअरपोर्टवर येण्याची तयारी दाखवली. अभय व तनुजाला सिंगापूर सहलीचा अहवाल दिला.

पावणेसहा वाजता आमची एअर इंडिया फ्लाईट होती. साडेपाच वाजता आम्ही चांगी विमानतळावर आलो. अमेरिकेला जाताना प्रथम या एअरपोर्टवर आम्ही आलो होतो त्यावेळी तो पाहिला होता. खूप मोठा व सर्व सुखसोयींनी सुसज्ज असा आहे. ड्यूटी-फ्री वस्तूंची दुकाने खुणावत होती. चालून आम्ही थकलो होतो. जयंत मीना आम्हाला सोडून निघून गेले. आम्ही बॅगा चेकीन केल्या, बोर्डिंग पास घेतला व साडेसात वाजता विमानाने झेप घेतली. हैदराबादला एक तासाचा विश्राम घेऊन मुंबईला रात्री बारा वाजता पोचलो. हैदराबाद भारतीय हवामानाचे स्वरूप दाखवत होता. पाऊस धो धो पडत होता. मुंबईलाही जोरदार पावसाने आमचे स्वागत केले. एअरलाईन्सच्या बसने आम्हाला विमानतळावर इमारतीमध्ये जावे लागले. अर्ध्या तासाच्या धडपडीनंतर आम्ही आम्हाला wheel-chair सर्विस मिळाली पट्ट्यावरून बॅगा घेतल्या आणि आम्ही घरी निघालो. व्हीलचेअरवाल्यांनी हट्टाने आमच्याकडून वीस सिंगापूर डॉलर्स घेतले. सिंगापूर इ. कुठेही आमच्याकडून व्हीलचेअरवाल्यांनी पैसे घेतले नव्हते. त्यामुळे भारतात परतल्याची खात्री पटली!

## पंजाब - देवभूमी

(सुवर्णमंदिर, वाघा बॉर्डर, वैष्णोदेवी, धर्मशाला, डलहौसी, कुलू, मनाली, रोहतांग, सिमला, चंदीगड, दिल्ली)

9 मे 2005 रोजी आमची उत्तर भारताची अमृतसर-कुलू-मनाली ही आणखी एक सहल सुरू झाली श्री ट्रॅव्हल्स या सहल कंपनीच्या आयोजित सहलीमध्ये पंधरा दिवसापासून सहभागी होण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू होते. सहा तारखेला चेकने त्यांची रक्कम रुपये 10000 भरली व आमचे जाणे निश्चित झाले त्यादिवशी आमच्या सहप्रवाशांची यादी आम्हाला मिळाली.

नऊ मे रोजी सकाळी सात वाजता आम्ही श्री ट्रॅव्हल्सच्या ऑफिसमध्ये दाखल झालो. आम्हा दोघांच्या सर्व बॅगा त्यांच्या स्वाधीन केल्या व बसने आठ वाजता औरंगाबादकडे प्रयाण केले. वाटेत एका धाब्यावर न्याहारी केली. आता इथून पुढे सर्व खर्च कंपनीचा. फक्त रेल्वेतील प्रवासातील जेवणाचा खर्च सोडून. दुपारचे जेवण औरंगाबाद स्टेशनजवळ एका हॉटेलमध्ये केले.

दुपारी दोन वाजता नांदेड-अमृतसर या सचखंड एक्सप्रेसने आम्हीं उत्तरेकडे निघालो. स्लीपर कोचमध्ये नंबर S-7 मध्ये आमचे समोरासमोर खालचे बर्थ होते. इतर प्रवासी - सहलीचे - S-4 ते S-30 पर्यंत विखुरले होते. टूर मॅनेजर चा पत्ता नव्हता. स्वप्निल नावाचा आमचा मॅनेजर S-13 मध्ये चक्क झोपला होता.

त्याच्या सहाय्याने आमच्या हँडबॅग्ज आशाने मिळवल्या. तोपर्यंत मनमाड स्टेशन आले होते.

नांदेडचे गुरुद्वारा व अमृतसरचे सुवर्णमंदिर जोडणारी आमची गाडी सचखंड सुपरफास्ट एक्सप्रेस होती आणि ती खरोखरच सुपरफास्ट होती. आमचे बस्तान लागेपर्यंत तिने भुसावळ गाठले होते. दोनला औरंगाबाद सोडलेल्या गाडीने केवळ पावणेतीन तासात ह पल्ला गाठला होता. आग्र्याला गाडी उभी राहिली त्या वेळी किल्ला झाडीतून दिसला पण ताजमहाल काही नजरेपुढे आला नाही. 1986च्या उत्तर भारताच्या प्रदीर्घ सहलीमध्ये आम्ही ताजमहाल जवळ तीन तास घालवले होते.

रात्रीची झोप गाडीत छान झाली. दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता न्यू दिल्ली स्टेशन आले. दोन तासानंतर गाडी दिल्लीला न जाता पंजाब मध्ये शिरली. अंबाला, लुधियाना मार्गे रात्री साडेनऊ वाजता अमृतसरला पोहोचलो.

रात्रभर गाडीत झोपणारा मॅनेजर दिल्लीला आम्हाला सोडून गेला. त्याच्या जागी आलेला सुनील निकम तरूण, चुणचुणीत युवक होता. दिल्ली नंतर तो आम्हाला गाडीत भेटला; त्याने स्वतःची ओळख करून दिली व सहलीचे नियोजन आपल्या हाती घेतले.

औरंगाबाद पासून आमच्याबरोबर नांदेडला चढलेला शीख परिवार होता. नांदेडचा गुरुद्वारा शिखांचे गुरू गोविंद सिंग यांनी स्थापन केलेला. त्याला त्यांनी सचखंड (The True Land) हे

नाव दिले. त्याची परिक्रमा करून हा परिवार परत अमृतसरच्या सुवर्ण मंदिराला चालला होता. त्यांच्यातील स्त्रीवर्गाशी सौ. आशाने थोड्या वेळातच दोस्ती केली आणि त्यांच्या छान गप्पा सुरू झाल्या. त्या अमृतसर पर्यंत चालल्या.

रेल्वेतील व रेल्वे स्टेशनवरील खाण्याचे पदार्थ अगदीच बेचव, टाकाऊ असल्याने या शीख मैत्रीचा आपला थेटपर्यंत फायदा झाला. औरंगाबादला खरेदी केलेली जाड कापडाची वॉटर बॅग फारच गळकी निघाली. पूर्ण भरलेल्या, डब्याबाहेर लटकवलेल्या बॅगेतून दिल्लीपर्यंत आम्हाला जेमतेम एक ग्लास थंड पाणी मिळाले. दिल्ली स्टेशन वर त्या कुचकामी बॅगेला आम्ही गुडबाय केले.

अमृतसर स्टेशनवर आमच्या सर्व बॅगा "श्री" च्या मुलांनी ताब्यात घेतल्या. पुणे ते पुणे सबंध प्रवासभर आम्हाला आमचे समान जराही उचलावे लागले नाही. That was a great comfort. अमृतसरला सुनील निकमने एक प्रवासी बस - 24 प्रवाशांना आरामशीर - ठरवली. आता दिल्लीला परत येईपर्यंत तीच आम्हाला सगळीकडे येणार होती.

या बसने आम्ही हॉटेल ब्लू मून या हॉटेलकडे रात्रीच्या मुक्कामासाठी गेलो. हॉटेल छान, 24 तास गरम पाणी, टॉवेल्स, साबण, intercom सेवा, रूम सर्विस, सोफा, खुर्च्या, डबल बेड, ब्लँकेट सर्व सोयी सुखद आणि आलिशान होत्या. थोड्याच वेळात "श्री"च्या सेवकांनी तयार केलेले रुचकर महाराष्ट्रीयन जेवण आणले. त्यावर आम्ही सर्वांनी ताव मारला. इथून पुढे परत

येईपर्यंत असेच जेवण आम्हाला मिळणार होते. It was indeed a nice beginning.

सुनील कर्तबगार, अनुभवी मॅनेजर होता. त्याने सर्वांची मने थोड्याच वेळात जिंकली. आम्ही दोघे ज्येष्ठ नागरिक असल्याने आमची तो अधिक काळजी घेत होता. प्रत्येक हॉटेलमध्ये आमची खोली तळमजल्यावर, सर्व सोयींनी युक्त, आलिशान असेल याची तो काळजी घेत होता. आम्ही श्री ट्रॅव्हल्सचे जुने गिऱ्हाईक असल्यामुळे कदाचित कंपनीने आमच्या नावापुढे VIP शेरा मारला असावा. प्रत्येक हॉटेलमधे आम्ही well served and well catered for होतो एव्हढे मात्र खरे.

अकरा तारखेला सकाळी 05:45 ला उठवले गेले, साडेसहाला बेड-टी आला. सर्व प्रातर्विधी आटपून आम्ही सातला तयार होतो. साडेसातला न्याहरी आटपून आठ वाजता आम्ही सर्व पूर्व सूचनेनुसार outing साठी तयार झालो. ही आता आमची ठरीव सुरूवात होती. सकाळी आठ ते बारा जुन्या अमृतसरमधील सर्व रस्ते अरुंद असल्यामुळे आम्ही सर्वजण रिक्षांनी सुवर्णमंदिराजवळ आलो. गर्दी खूप पण रिक्षावाले मोठ्या कौशल्याने वेग व ब्रेक यांचा समन्वय साधून अर्ध्या तासात आम्हाला सुवर्णमंदिराजवळ घेऊन आले.

"मंदिर" चित्रात/फोटोत दिसते अगदी तसेच चौरस आहे. एका मोठ्या तलावाच्या बरोबर मध्यभागी चारी रस्ते समान रूंदीचे, समान अंतरावर, प्रवेशद्वारे अगदी सारखी, चारी भिंती व तिन्ही मजले जाड सोनेरी पत्र्याने मढवलेले. कार सेवेने सर्व मंदिर

पाण्याने व फडक्याने सतत पुसून स्वच्छ ठेवले जात असते. कार सेवा म्हणजे स्वयंस्फूर्तीने भक्त व मंदिराचे सेवक विनामूल्य ही स्वच्छतेची सेवा करीत असतात. आम्हीही एका सेवकाच्या हातून पाण्याची बादली व फडके घेऊन आमची सेवा रुजू केली. मंदिरात कुठलीही मूर्ती नाही. तिन्ही मजल्यावर प्रचंड आकाराची पोथी ठेवलेली असते. काही लाल कपड्यातील लोक ती आलटून-पालटून वाचत असतात. काही कारसेवक ग्रंथसाहिबवर चवऱ्या ढाळत असतात. वाचणाऱ्यांना अधून मधून लेमोनेड देत असतात आणि हे पठण सतत चालू असते. ग्रंथसाहिब मध्ये नामदेवाचे काही अभंग समाविष्ट केले आहेत, त्या अभंगांची एक प्रत आम्हाला बाहेर विकत मिळाली.

सुवर्णमंदिर स्थापत्यशास्त्राचा एक अजोड नमुना आहे. सर्व बांधकाम मांडणी विलक्षण symmetric आहे. चार प्रवेशद्वारे, चारी मजल्यावरील मांडणी, ग्रंथ साहेबांची सजावट अगदी identical आहे. आम्ही चारी मजले फिरून पाहिले. पहिल्या मजल्यावर "शिरोमणी प्रबंधक संस्थेचे" प्रमुख कार्यालय आहे. अकाल तख्तचे बडे महंत पहिल्या मजल्यावर राहतात. सुवर्णमंदिराला हरिमंदिर, हरमिंदर साहिब अशीही पर्यायी नावे आहेत.

आम्ही गेलो त्यावेळी खलिस्तानी चळवळ ओसरली होती. त्याचे मुख्य कार्यालय, शस्त्रे, हत्यारांचा साठा व त्यांचा पुढारी बाबा भिंद्रानवाले. इंदिरा गांधींनी सुवर्ण मंदिरात सैन्य घुसवून भिंद्रनवाले यांचा व खलिस्तान चळवळीचा नायनाट केला होता. त्याची फलश्रुती म्हणून काही महिन्यातच इंदिरा गांधी त्यांच्या

अंगरक्षकांकडून झालेल्या हत्येला बळी पडल्या होत्या. दिल्लीमध्ये शिखांचे मोठ्या प्रमाणावर शिरकाण झाले होते. हा सर्व इतिहास ताजा होता. भिंद्रानवालेंची हत्या झालेले ठिकाण आम्ही पाहिले. भिंतीवरील रक्ताचे डाग अजून काही ठिकाणी ताजे होते. काही सेवकांनी आम्हाला तो भाग करून दाखवला. शिखांच्या मनात ती जखम अजून भळभळत असल्याचे जाणवत होते.

मंदिराच्या परिसरात तीन मोठी बोरीची झाडे होती. शीख लोक त्यांचीही पूजा करताना दिसत होते. आम्ही तलावाच्या पवित्र पाण्यात परत हात पाय धुतले. कार सेवकांनी दिलेले पवित्र तीर्थ प्राशन केले. सगळीकडे कार सेवकांच्या अहर्निश सेवेमुळे कमालीची स्वच्छता दिसत होती. सूर्याच्या किरणांत झगमगत असलेली सुवर्ण मंदिराची पवित्र सुंदर छबी अंतःकरणात आणि कॅमेऱ्यात टिपून आम्ही बाहेर पडलो. सकाळचे दहा वाजले होते.

रिक्षाने दुसऱ्या दिवशी एका पवित्र स्थळी आम्ही आलो -- जालियनवाला बाग. एकेकाळी गोळीबाराच्या वर्षावात अनेक निरपराध जीवांचे बळी घेणारी ही वास्तू आता एक स्मृतीस्थान झाली. अजून ती तशीच बंदिस्त, एक छोटे प्रवेशद्वार अजूनही असलेली, जालियनवाला बाग-पार्क झाली आहे. हुतात्म्यांचे फोटो, गोळीबाराचे आणि रक्तांकित दृश्ये दाखवणारे एक संग्रहालय आहे. वास्तू खूप प्रशस्त आहे. जागोजागी भिंतीवर बंदुकीच्या गोळ्यांच्या खुणा, अचानक सुरू झालेल्या कर्नल डायरच्या सैनिकांच्या गोळीवर्षावाने सैरावैरा धावणाऱ्या लोकांनी दिसेल त्या जागेचा आश्रय घेतला; एका अरूंद खोल विहिरीमध्ये

शेकडो स्त्री-पुरुषांनी बेधडक उड्या मारल्या आणि एका वेगळ्या मृत्यूला मिठ्या मारल्या. जालियनवाला हे एक मोठे स्मशान आहे, मन सुन्न करणारे. आम्हाला तिथे जास्त वेळ थांबवेना, स्त्रियांचे डोळे अश्रूंनी डबडबले होते आणि पुरुष सुन्न होते.

बारा वाजता आम्ही रिक्षांनी हॉटेलवर आलो. दुपारचे जेवण व थोडी वामकुक्षी, विश्रांती घेऊन संध्याकाळच्या सेशनसाठी तयार झालो.

## दुसरे मध्यांतर: दोन ते चार

अमृतसरमधील लालमाता नावाच्या सधन स्त्रीने व वैष्णोदेवीच्या अनेक भक्तांनी शहरात वैष्णोदेवीची एक प्रतिकृती निर्माण केली आहे. लालमातेला वैष्णोदेवीने आपले दर्शन दिले व मंदिर निर्माण करण्याचा आदेश दिला अशी आख्यायिका आहे. प्रतिकृती मूळ वैष्णोदेवीच्या मंदिरासारखीच एका गुहेत बांधली आहे. चक्रव्युहासारख्या बोगद्यातून पाण्यातून - घोटाभर - आत वळणे घेत जावे लागते. खाली वाकून सर्व अंतर चालणे ही कष्टाची, सहनशीलतेची परीक्षा आहे. आम्ही सर्वांनी कुरकुरत ते दिव्य पूर्ण केले.

## साडेचार ते साडेआठ वाघा बॉर्डर भेट:

बहुचर्चित आणि गाजावाजा केली गेलेली ही जागा एक दमवणारी फालतू भेट आहे असे सर्वांचे मत झाले. उन्हामध्ये दोन तास इकडे तिकडे सोयीस्कर जागा शोधण्याच्या

प्रयत्नानंतर भारत-पाकिस्तान सीमारेषेवर बरोबर सहा वाजता दोन्ही बाजूंनी भारतीय दलाची तुकडी व पाकिस्तान सैन्याची तुकडी स्लो मार्च करत सीमारेषेवर भेटतात, सलाम करून मागे परत जातात. दररोज साठ-सत्तर हजार माणसे - पाकिस्तानी थोडे भारतीयच जास्त - हा फार्स बघतात आणि मनात विचार करतात - कशासाठी हा सारा देखावा? यात ना देशभक्तीचे दर्शन, ना दोन्ही राष्ट्रांच्या मैत्रीचे प्रदर्शन! It is just a waste of time, playing with the emotion of simple gullible people!

खूप चालावे लागल्यामुळे थकलेलो, श्रांत, क्लांत आम्ही बसने हॉटेलकडे आलो, जेवण करून निद्रादेवीच्या मिठीत विसावलो.

### 12 मे 2005:

रोजच्या दिनक्रमाप्रमाणे आम्ही सर्व आवरून, न्याहारी करून, सकाळी आठ वाजता अमृतसर सोडले. अकरा वाजता माधवपुर पंजाब यांचा निरोप घेतला व रावी नदी ओलांडून जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश केला. वाटेत धाब्यावर "श्री" कर्मचाऱ्यांनी बनवलेली लंच घेतली व साडेपाच वाजता कतरा (वैष्णोदेवीचे प्रवेशद्वार) येथे आलो, जय माँ हॉटेलमध्ये प्रवेश, लगेच रात्रीचे जेवण उरकले. डोंगरावर असलेल्या वैष्णोदेवीसाठी प्रत्येकाने आपापल्या पसंती व कुवतीप्रमाणे चढणीची सोय निश्चित केली. कोणी पालखी (खुर्ची डोली), कोणी पायी, कोणी घोडेस्वारी, कोणी खांद्यावरून नेणाऱ्या मोठ्या टोपलीतून आपले वाहन त्या त्या प्रमाणे रक्कम भरून निश्चित केले. पाच हजार रुपये भरून

हेलिकॉप्टर सेवाही उपलब्ध होती. पण त्याने चालणे किंवा चढणे कमी होत नसल्याने कोणीही ती सेवा निवडली नाही. आम्ही खुर्ची डोली निवडली. दोन व्यक्ती आपल्या आपल्या खांद्यांवर खुर्चीला जोडलेले जाड लाकडी बांबू ठेवून खुर्चीधारीला घेऊन जाणे अशी ती सोय होती. एक दोन ठिकाणी ते चार मजूर  पाच-दहा मिनिटे विश्रांती घेत. हे सर्व पैसे भरुन बुकिंग केले व आम्ही हॉटेल कडे परत आलो.

पावणे नऊ वाजता सुनील बरोबर रिक्षांनी बाणगंगा या निघण्याच्या ठिकाणी आलो. आमचे चार हमाल (कॅरियर्स) तयारच होते व लगेच खुर्चीवर (डोली) बसून निघालो. रस्ता अरुंद, चढणीचा, वळणावळणाचा व गर्दीचा होता. पादचारी, घोडेस्वार, आमच्यासारखे डोलीस्वार, दोन्ही बाजूला दुकानांच्या रांगा या सर्वांशी मी पुढे मी पुढे करत प्रवास सुरू होता. चांदणी रात्र होती. थोडे वर गेल्यावर एक वळण आले; एक विहंगम नजारा डोळ्यांपुढे दृष्टीमान झाला. मी हमालांना थांबायला सांगितले. आम्ही खुर्चीवरून खाली उतरलो. कडेच्या भिंतीमध्ये एक मोठे भगदाड होते. मधून आम्ही पहातच राहिलो. वर आकाशात सप्तमीचा किंवा अष्टमीचा चंद्र, निळेशार आकाश, खाली दाट अरण्य, अंधारातही त्यांचा दाट हिरवा निळा रंग काळ्या रंगातूनही जाणवत होता. एका कोपऱ्यात बर्फाच्छादित शिखर चंद्रप्रकाशात, दाट अंधारात खुलून चमचमत होते. दहा मिनिटे आम्ही तो विलक्षण सुंदर देखावा, मध्यरात्रीच्या अंधारातही वेड लावणारा, पाहत राहिलो. हमालांना दिलेला चहा व ब्रेड संपला होता. आता पुढे जाणे भाग होते. आम्ही आसनस्थ झालो.

रात्री एक वाजता वैष्णोदेवी मंदिराच्या परिसरात पोहोचलो. डोलीवाले आम्हाला उतरवून निघून गेले. वैष्णोदेवी मंदिर लालमाता मंदिराचा मोठा अवतार होता. एक मोठी गुहा, त्यातून संगमरवरी लांब बोगदा, पायाखाली घोट्याइतके पाणी, गोल गोल फिरतच होते. जवळच्या बहुतेक सर्व वस्तू - रिकामी पर्स (कातडे म्हणून), पेन्स, डायरी, कंगवा, इत्यादी दर्शन रांगेपूर्वी टाकून द्याव्या लागल्या. (परत आलो त्यावेळी फक्त कंगवा मिळाला!) वैष्णोदेवीचे दर्शन व्हायला पहाटेचे साडेतीन वाजले. आणि देवी कसली तर एक दगडी पिंडी आणि दोन देवीच्या फ्रेम्स. यासाठी एवढा सगळा अट्टाहास! आपली सर्व प्रसिद्ध मंदिरे एक मोठा fraud वाटतो. लोकांच्या भक्तीचा हे प्रचंड गैरफायदा. आणि तिथे कर्मचारी भक्तांचा अपमान करण्यात, त्यांना अनेक प्रकारे फसवण्यात अग्रेसर - माझ्यासारखा डोळस भक्त या साऱ्या वागणुकीने विटून जातो. पहाटे साडेचार वाजता डोलीवाल्यांना शोधून काढून आम्ही वैष्णोदेवी शिखर सोडले व बाणगंगाला साडेसात वाजता आणि रिक्षाने हॉटेलवर आठ वाजता पोहोचलो.

आम्ही मध्ये थांबलो त्यावेळी डोलीवाल्याशी आमच्या थोड्या गप्पा झाल्या. त्या मोठ्या हेलावणाऱ्या होत्या. डोलीवाल्यांच्या सेवेसाठी आम्ही प्रत्येकी 1850 रुपये कार्यालयात भरले, त्यापैकी प्रत्येक डोलीवाल्याला फक्त दोनशे रुपये मिळतात. बिचारे अशिक्षित, भोळे, या कामासाठी सुद्धा गयावया करणारे, गरिबीमुळे नाडले जातात. त्यांनी आपले दुःख आमच्याजवळ

भडाभडा बोलून दाखवले. सौ. आशाने त्यांना मोकळ्या हाताने मदत केली. डोली वाल्यांनी माझे गुडघे, खांदे दाबून दिले.

वैष्णोदेवीला दर्शनाकडे जात असताना सगळीकडे जय मातादी असा जयघोष चालू होता, आम्हीही त्यात सहभागी झालो.

वैष्णोदेवी दर्शन करून पुढे जाण्यापूर्वी पंजाबचा आम्ही निरोप घेत होतो. पंजाबबद्दलची काही निरीक्षणे व्यक्त करणे इथेच सयुक्तिक ठरेल.

पंजाब हा एक  समृद्ध प्रदेश आहे. पाच मोठमोठ्या नद्यांच्या - झेलम, रावी, बियास, सतलज, सिंधू - या पाच नद्यांच्या पाण्यामुळे सगळीकडे हिरवीगार वनश्री, फुलणारे बगीचे, पिकांनी डोलणारी शेते. या निसर्गसमृद्धी बरोबरच 24 तास वीजपुरवठा सगळीकडे बांधकाम, रस्ते निर्मिती, फ्लाय-ओव्हर्स, बोगदे या मानवनिर्मित विकासाच्या खुणा आणि विकासाबरोबर येणाऱ्या अनिर्बंध वाहतूक, सिमेंटची जंगले, वाहनांची गर्दी या खुणाही जागोजागी अनुभवास येत होत्या. आमचा बहुतेक प्रवास नद्यांच्या काठाकाठानेच चालला होता. मे महिना असूनही हवेत सुखद गारवा होता.

जम्मू सोडल्यानंतर लखनपूर, पठाणकोट ओलांडल्यानंतर चढाचा रस्ता सुरू झाला. अवघड वळणे घेत वर वर बस चढत होती. संध्याकाळी सात वाजता डलहौसी आले. आता या उंचीवर थंडी जाणवू लागली होती. उंच उंच झाडांच्या राजीमध्ये अन्वर्थक नावाचे Nest नावाचे एक टुमदार छोटे हॉटेल आले.

डलहौसी हे ब्रिटीशकालीन हिलस्टेशन त्यामुळे टुमदार , छोटी घरे, हिरव्यागार वृक्षांचा सततचा संपर्क - virgin forest - आणि रावीवरील धरणामुळे विशाल backwaters चा रणजीत सागर नावाचा तलाव - हनीमूनसाठी आदर्श असे ठिकाण! तळमजल्यावरील आमची खोली नं. १०२ सर्व सुविधांनी युक्त - बाथरूम, टीव्ही, टॉयलेट वगैरे. नऊ वाजता ताजे, गरम-गरम जेवण मिळाले. रात्री अकराला गाढ झोपी गेलो. झोपेतही डलहौसीच्या सुंदर परिसराची स्वप्ने पडत होती - all green with thick green virgin forest, सूचीपर्णी वृक्षांचे जंगल आणि निळाशार रणजीत सागर! A dream place! हिमालयाच्या बर्फाच्छादित कुशीत वसलेले मनुष्यवस्तीपासून गोंगाटापासून कोसो दूर - Far from the madding crowds!

### 15 मे 2005 रविवार

सकाळी सहा वाजता उठलो. डलहौसीला वेढून असलेल्या पीर पांजाल शिखराच्या बर्फाच्छादित सूर्यकिरणात झगमगणाऱ्या पर्वतरांगा मोहून टाकत होत्या. खाली हिरवीगार जंगलाने भरलेली दरी तितकीच आकर्षक होती. हिमालयाचा बहुरंगी नजारा कितीही पाहिला तरी तृप्ती होत नव्हती. कंटाळा येत नव्हता. डलहौसी हे स्वतःच एका शिखराच्या टोकावर होते. आजूबाजूचे खोरे चंबा व्हॅली म्हणून प्रसिद्ध होते. थोडंसं आरामात सकाळचे कार्यक्रम आटपून, लंच थोडी लवकर आटपून आम्ही आमच्या दिमतीला असलेल्या ४ सुमोनी एका अद्भुत ठिकाणाकडे निघालो - खज्जियार - एका खोलगट तलावासारखे गोल ठिकाण - सुमारे सहा किलोमीटर परीघ

असलेला नैसर्गिक तलाव - त्याच्यातील वनस्पतींनी माखलेला. आजूबाजूला गोल दाट झाडीचा विळखा. वर पाहिले की कैलास पर्वताचा नयनरम्य नजारा. बराच वेळ मंत्रमुग्ध करणारा हा देखावा डोळ्यांनी प्राशन करीत, मनात साठवत आम्ही रस्त्यावर आलो. आता आम्ही हिमाचल प्रदेशात - देवभूमीत आलो होतो - अनेक देवालयांचा - देवांनी, पांडवांनी वस्ती केलेली पुण्यभूमी. पहिले मंदिर नाग (शिव) मंदिर. स्वैर फिरत होतो. हिमाचली वेषभूषेत दोन फोटो आठवण म्हणून काढून घेतले. वाटेत मुंबईहून आलेले एक गुजराती कुटुंब भेटले. सौ. आशाने गुजरातीचा सराव करून घेतला. 15 ऑगस्ट 1947 साली शहीद झालेल्या अजितसिंगची पंचफुली नावाची छोट्या धबधब्यांनी सजलेली स्मृतीशैय्या, ज्या ठिकाणी नेताजी सुभाष बोस सहा महिने राहिले होते तो सुभाष बावडीचा झरा - त्यात स्नान केल्यास क्षय व कातडीचे विकार बरे होतात - पहात पहात आणि कॅमेऱ्यात पकडत पकडत एक रोल संपवला. साडेपाच वाजता डलहौसीला घरट्यात - नेस्ट हॉटेलमध्ये - परत आलो. रात्री साडेसात ते दहा खोलीतल्या टीव्हीवर "गीतरामायण - सुधीर फडके" कार्यक्रम ऐकत विश्रांती घेतली. We had fallen in love with Dalhousie.

## 16 मे 2005 सोमवार

आठ वाजता जड अंतःकरणाने निरोप घेऊन मार्गात त्रिलोकीनाथ शिवमंदिर पाहून दुपारी दोन वाजता आम्ही धर्मशाला येथे पोहोचलो. आता

आम्ही कांग्रा खोऱ्यात (valley) प्रवेश केला होता. अडीच वाजता रिक्षांनी आम्ही MacLeaod Ganj या दलाई लामांच्या मठात प्रवेश केला. दलाई लामा भक्तांच्या गराड्यात असल्यामुळे इच्छा असूनही त्यांची भेट मिळाली नाही. त्यांच्या Art of Living या पुस्तकासंबंधी मला त्यांच्याशी बोलायचे होते. त्यांना चिठ्ठी पाठवली पण संधी मिळाली नाही. कॅम्पस खूप मोठा होता. भिक्षू, प्रवासी यांची गर्दी बरीच होती - भक्तिगीतांचा, नामजपाचा आवाज हवेत भरून राहिला होता. तीन मजल्यांचा विशाल मठ आम्ही संपूर्ण फिरून पाहिला - आकर्षक, स्वच्छ. आतमध्ये सर्व भिंतींवर धातूंचे स्वतः भोवती फिरणारे प्रचंड मोठे सिलिंडर्स फिरत होते. त्यांच्यावर तिबेटी भाषेतील शब्द कोरले होते. त्यांना फिरवणे हे पुण्य होते. आम्ही थोडा वेळ ते फिरवले. एका वेगळ्या खोलीत एक खूप प्रचंड सिलेंडर हळूहळू फिरत होता. त्याला पाहून मला साखर कारखान्यातील मोलॅसिस सिलेंडरची आठवण झाली. तिबेटी भाषेत घोषणा लिहिलेले कापडी ध्वज सर्वत्र फडफडत होते. बाहेर दोन मुले ते रंगवण्याचे काम करत होते. जवळजवळ दोन तास केव्हा गेले कळलेच नाही.

लामांच्या धर्मशाळेनंतर आम्ही एक प्राचीन शिवमंदिर - हेमाडपंती बांधकाम व शिल्पकला असलेले - पाहिले आणि पालमपूर रस्त्यावरील चामुंडा गावातील चामुंडा हॉटेलमध्ये सात वाजता आलो. शेजारीच असलेल्या चामुंडा देवी मंदिराचे दर्शन घेतले. साडेसातच्या आरतीला हजेरी लावून हॉटेलमध्ये आलो. मंदिर मध्यम आकाराचे छान होते.

धर्मशालाजवळ कांगरा दरी व धोलाधार पर्वतरांगा विलक्षण आकर्षक होत्या. बर्फ, जंगले, सूचिपर्णी वृक्षांच्या रांगा, शिखरांची टोके आणि नद्यांची संगत या सर्वांची  लयलूट या सर्व प्रवासात जाणवत होती. आणि ही सर्व सौंदर्यस्थळे अगदी निकट भासत होती.

दिवसभर चालल्याने व पायऱ्या चढ-उतार करून सर्व गात्रे शिणली होती. पण गाडीवर पडल्यानंतर हा शीण जाणवण्याऐवजी हे सौंदर्यच मिटल्या डोळ्यांसमोर नाचत होते.

### 17 मे 2005

आठ वाजता सर्व आवरून आम्ही सर्व 26 जण चामुंडा हॉटेल सोडले. रस्त्यावर पालमपुरला चहाच्या बागा वाटेत आल्या. आम्ही त्या बागांमध्ये फिरलो, तीन पानांचे दोन-तीन शेंडे खुडले, चहा झाडांच्या संगतीत फोटो काढले आणि प्रवास पुढे चालू केला. वैजनाथ मंदिराजवळ थोडे थांबलो. काही फोटो खरेदी करण्याच्या गडबडीत सौ. आशाचा गॉगल कुठेतरी गायब झाला. बसमध्ये येऊन बसली आणि तिच्या लक्षात आलं. झालं, मूड गेला आणि माझ्यावर टीकास्त्र सुरू झालं. मी वैजनाथला प्रार्थना केली, "भगवंता, गॉगल शोधून दे, नाहीतर माझी काही खैर नाही" वैजनाथ आमचे कुलदैवत असल्यामुळे व माझा जन्म महाशिवरात्रीचा असल्यामुळे कदाचित, बसमध्ये येऊन बसलो आणि सीटखालील दिसला. Thank God! वाटेत हनुमान प्रसाद ही मिळाला.

सबंध प्रवासात धौलाधार पर्वताच्या हिमाच्छादित शिखरांची व बियास नदीची सतत संगत होती. 5:30 ला आम्ही कुलूला पोहोचलो. इथे शालींचा कारखाना होता. शाली खरेदीसाठी सर्वांची झुंबड गर्दी झाली. परतीच्या वेळी आम्ही कुलूला थांबणार असल्याने आम्ही मुलांसाठी तीन जॅकेट्स (प्रत्येकी ९० रू) घेतली व मनालीकडे प्रयाण केले आठ वाजता उंच-सखल रस्त्याचा प्रवास संपला आणि आम्ही मनालीत दाखल झालो.

निशिता रिसॉर्ट हे नवेच हॉटेल होते. 212 नंबरची आमची खोली सर्व सुखसोयींनी युक्त, आलिशान होती. गॅलरीतून दिसणारा बर्फाच्छादित शिखरांचा व खोल निव्व्याशार जंगलयुक्त दरीचा देखावा विलक्षण मनोहर होता. हॉटेलचा मालक एक सरदारजी आदबशीर व अगत्यशील होता. एकच गैरसोय होती - लपंडाव खेळणारा वीजपुरवठा! आतापर्यंतच्या सर्व हॉटेलमध्ये निशिताचा नंबर पहिला लागला असता. रात्री पाऊस सुरू झाला आणि त्यामुळे हवामान अधिक थंड आणि सुखद झाले. मखमली ब्लँकेटमध्ये गुरफटून झोपण्यात मोठी मजा आली.

सकाळी साडेसहाला जाग आली पण लाईट नव्हते; चहाही कोमटच मिळाला. सुदैवाने आमच्या खोलीतल्या बॉयलरमध्ये पुष्कळ गरम पाणी होते. मनाली एक सुंदर हिल स्टेशन आहे - रमणीय, सुंदर, थंड. सर्वांनी एकमताने आजचा दिवस इथेच घालवायचा ठरवलं. रोहतांग खिंड भेट उद्यावर ढकलली.

साडेदहा ते दोन दरम्यान हिडिंबा मंदिर व घटोत्कच मंदिर ही महाभारतातील राक्षसांची दोन मंदिरे पाहिली. पांडवांना त्यांनी

सहकार्य केल्याने त्यांनाही इथे देवत्व मिळाले होते. मुलांसाठी बाग, बोटिंग पूल अशी रमणीय ठिकाणे पहात पहात एका सुंदर भव्य बौद्ध मठाजवळ आलो. बुद्ध भिक्षू, महंत, गोल फिरणारे सिलेंडर्स आणि बुद्ध मंदिरावरील मोठा घुमट या वैशिष्ट्यपूर्ण बौद्ध गोष्टी इथे होत्या. इथे एका दुकानात आम्हाला छान शाली मिळाल्या. आम्ही तीन शाली (प्रत्येकी 90 रुपये) घेतल्या. आज दुपारचे जेवणही खास होते - मसालेभात, फ्रूट सलाड. जेवणानंतर संध्याकाळ सर्वांना फ्री होती. बरेच जण - विशेषतः भगिनी वर्ग - खरेदीत गुंतला. आम्ही काही थोडे जण हिमाचल प्रदेश पर्यटन कार्यालयात गेलो. बरीच टुरिस्ट माहिती पत्रके गोळा केली. जाताना बसने गेलो; येताना रिक्षाने आलो. रात्रीचे जेवण पावभाजी होते. आमच्यापैकी काही तरुण नॉनव्हेजचे शौकीन - रेड्डी, प्रभू, सुनिल शहा चिकन खाऊन दोन तासाने आले. थोड्याच वेळात रेड्डी पोट बिघडल्याने तळमळू लागले. त्यांना food poisoning झाले होते. हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. कुलू मनाली कुलू दरीतील आठ हजार फूट उंचीचे सर्वात उंच हिलस्टेशन आहे.

## 19 मे 2005 गुरुवार

नेहमीचा दिनक्रम उरकून सकाळी आठ वाजता आम्ही सुमोमधून चढाने निघालो. दहा वाजता बर्फाळ भागात शिरलो. बर्फाच्या लाद्या सगळीकडे पसरल्या होत्या. मनाली पासून 61 किलोमीटर दूरी वर असलेला हा भागरोहटांग पास (खिंड) नावाने ओळखला जातो. सगळीकडे घट्ट गोठलेल्या बर्फाच्या भिंती व रस्ते व त्यातून खिंडीतून प्रवेश करायचा. खिंडीच्या

आधी थोड्या अंतरावर अनेक दुकाने होती. तेथे आम्ही snow-shoes भाड्याने - प्रत्येकी चाळीस पन्नास रुपये - अंगावर चढवले. कुठलेही डिपॉझिट न घेता त्यांनी हे सर्व कपडे (overcoat, snow-shoes, snow-gloves, cap) आम्हास दिले. परत आल्यावर भाडे द्यायचे होते. त्यांच्या या विश्वासाचे आम्हाला कौतुक वाटले. त्या वेषात आम्ही बरेच फोटो काढून घेतले. दोन प्रोफेशनल फोटोग्राफर कडूनही फोटो काढून घेतले. बर्फात खेळलो बरेच आत बर्फात गेलो; वर पाहीले तर थंड वाफेच्या पलीकडे काही दिसत नव्हते. बर्फात दोन तास एक अनोखा अनुभव घेऊन आम्ही sledging करून बाहेर आलो. Snow-suits परत केले, भाडे दिले. बियास नदीचे उगमस्थान पाहिले व सुमोमध्ये येऊन बसलो. व्यास मुनींनी याठिकाणी महाभारत व भागवत हे प्रसिद्ध ग्रंथ लिहिले अशी आख्यायिका आहे.

बर्फाच्या रुंद रस्त्यामध्ये पार्किंग केलेल्या व परत जाणाऱ्या सुमोसारख्या अनेक गाड्यांची एवढी गर्दी झाली. शिस्त लावणारे पोलीस वगैरे कोणीच नव्हते. या ट्राफिक जाम मधून बाहेर पडायला आम्हाला दोन तास लागले. साडेतीन वाजता हॉटेलवर येऊन पोटभर शिरा खाल्ला व संध्याकाळ विश्रांती घेण्यात घालवली. डलहौसी सारखे मनाली आम्हाला खूप आवडले. ते सोडताना खूप जिवावर आले.

## 20 मे 2005 शुक्रवार

देवभूमी चा निरोप घेण्याचा परतीचा प्रवास सकाळी आठ वाजता सुरू झाला. धाब्यात न्याहारी व मंडीला हॉटेलमध्ये लंच घेऊन बियास नदीच्या काठाने, हिरव्यागार दाट जंगलामधून चढत, उतरत संध्याकाळी सात वाजता आम्ही सिमल्याला पोचलो. दिवसभराच्या प्रवासाने दमलो होतो. Lower Mall (खालची बाजारपेठ) वर असलेल्या Victory हॉटेलमध्ये आमचा मुक्काम होता. 212 नंबरची पहिल्या मजल्यावरची आमची डबल रूम प्रशस्त, आलिशान होती. सोफे, कारपेट्स, फर्निचर. टीव्ही वगैरे सर्व सोयी छान होत्या. सिमल्यात प्रवेश केल्याकेल्या अपर मॉलवर बिरबल शमी नावाच्या एका कलाकाराचे 'हिमाचल दर्शन' नावाचे छायाचित्रांचे एक सुंदर प्रदर्शन पाहिले. हिमाचलमधील सुंदर निसर्गरम्य देखावे, मंदिरे, तलाव, ऐतिहासिक स्थळे, लोक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे शेकडो फोटो पाहून आमचे डोळे निवले.

सिमल्याला नेहमीच पाण्याची टंचाई असते; आजही ती होती, त्यामुळे पाणी वापरावर बंधने होती. आमच्या हॉटेलचा टँकर दिवसातून फक्त दोन वेळा पाणीपुरवठा करत असे. सकाळी दहा आणि रात्री दहा वाजता. रेड्डींची प्रकृती अजूनही सुधारलेली नव्हती. चिकन खाण्यामुळे झालेले फूड पॉयझनिंग खासगी दवाखान्यात ट्रीटमेंट घेऊन थोडेसे सुधरत होते. दुसरे भक्षक - शहा, प्रभू, पतंगे प्रवासात ओकत होते.

शनिवारी सकाळी आम्ही कुफरीला भेट दिली. काहीजणांनी घोड्यावर मुशाफिरी करून महाराष्ट्रीय बाणा दाखवला. १९६७

मधे मी सिमल्याला प्रथम आलो होतो त्यावेळी नुकतीच बर्फवृष्टी सुरू झाली होती. एका प्राणिसंग्रहालयाला व मोठ्या बागेला आम्ही भेट दिली. पायांना चालण्याची मेहनत याशिवाय काही प्रेक्षणीय नव्हते.

अशा प्रकारच्या सहलीमध्ये अनुभवास येणारा मानवी स्वभाव इथेही अनुभवास आला. तीन सभासदांच्या पतंगे कुटुंबाला अडीशे रुपये दराने घोडे मिळाले तर इतरांना 150 रुपये दराने घोडे मिळाले. मुशाफरीच्या शेवटी ज्यावेळी त्यांना हे कळले त्यावेळी त्यांच्या मस्तकात गेली आग गेली. सगळ्यांना शिव्या देऊन, मॅनेजर स्वप्नीलला देऊनही त्यांचा राग काही कमी झाला नाही. रेड्डी, शहा, प्रभू यांना अट्टाहासाने केलेला मांसाहार बाधला. खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घ्यावे लागल्याने दोन-तीन हजार खर्च करावे लागले. यात कुणाचा दोष? इतर सभासदांचा, श्री ट्रॅव्हल्स किंवा मॅनेजरचा काय दोष? पण त्या तिघांनीही सहल संपेपर्यंत इतरांशी असहकार पुकारला. सहलीच्या शेवटी मॅनेजर व इतर सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वखुशीने बक्षिसी देण्याचा विषय निघाला त्यावेळी या तिघांनी साफ नकार दिला.

सिमल्याची संध्याकाळ बहुतेकांनी अपर मॉलमध्ये शॉपिंगमध्ये घालवली. आम्ही ब्रिटिश काळात भारताची उन्हाळी राजधानी असणाऱ्या सिमल्याच्या त्या इतिहासाच्या खुणा अवलोकण्यात गात्रे शिणवली.

## 22 मे 2005 रविवार

सकाळी साडेसात वाजता सिमला सोडले, दिल्ली एक्सप्रेस हायवेने पिंजोरला ताजमहाल समोरच्या आकर्षक गार्डनची आठवण करून देणारा यादवेंद्र गार्डन पाहिला. कलका, भटिंडा, अंबाला ही पंजाब मधील मोठी शहरे ओलांडून चंदीगडमध्ये आलो. चंदिगड मधला रॉक गार्डन एक विलक्षण कलाकृती आहे. नेकचर नावाच्या एका माणसाने मोडक्या, तुटक्या, तुटलेल्या, फेकून दिलेल्या काचेच्या, चिनीमातीच्या, फरशी संगमरवर बांगड्यांचे कपबश्यांचे प्लेट्सचे छोटे मोठे तुकडे चिकटवून, एकत्र करून सुंदर, आकर्षक कलाकृती व देखावे निर्माण केले आहेत. माकडे, कुत्री,  घोडे, मेंढ्या, पक्षी, मोर, पोपट यासारखे पशुपक्षी, संगीतकार, परेड करणारे विद्यार्थी, शिपाई, सैनिक, संपूर्ण ऑर्केस्ट्राचे कलावंत या सर्व आकृतींच्या उपयोगातून हुबेहूब देखावे पाहून कौतुक तर वाटतेच, पण आश्चर्याने मन मुग्ध होते. कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून आयुष्यभर लक्षात राहील असा हा बाग (रॉक गार्डन) आहे. आम्ही अक्षरशः मंत्रमुग्ध पहातच राहिलो. दोन तास हा मानवनिर्मित अभूतपूर्व संग्रहालय पाहून परत परत मागे वळून नजर टाकत आम्ही निरोप घेतला. साडेतीन वाजता चंदीगड सोडले आणि रात्री साडेनऊ वाजता दिल्लीच्या परिसरात शिरलो. प्रथमच आम्ही रात्री दिल्ली पहात होतो. भव्य हॉटेल्स, कलादालने, निवासी गृहसंकुले, विशाल बागा आणि या सर्वांवर केलेली सजावट, विद्युत रोषणाई - आम्हाला आमच्या राजधानीचा अभिमान वाटेल असेच हे दृश्य होते. रात्री अकरा वाजता करोलबाग मधील हॉटेल अर्पित पॅलेस या आमच्या

निवासस्थानी पोचलो. हॉटेल छान होते आणि आमची १०४ नंबरची खोली प्रशस्त, आलिशान होती.

## 23 मे 2005 सोमवार

सोमवार मुळे मुख्य बाजार बंद होता. पण छोट्या दुकानातून स्वेटर्स वगैरे खरेदी करून हॉटेलमध्ये परत आलो. यांची पूर्वी प्रत्येकाकडून रूपये 100 गोळा केलेल्या रकमेतून मॅनेजर, आमचे इतर सेवा कर्मचारी, व दिल्ली ते दिल्ली बसचे चालक या सर्वांना आम्ही दोनशे पन्नास रुपयाची पाकिटे भेट दिली. घेणारे सर्व या हृद्य कृतीने गहिवरून आले. पतंगे व प्रभू कुटुंबीयांनी या कार्यक्रमावर आर्थिक व हजर राहण्याचा बहिष्कार टाकून आपल्या मनाचा हलकेपणा व्यक्त केला. वयाने आम्ही ज्येष्ठ असल्यामुळे आम्हा दोघांना मुख्य भूमिका दिली होती. संध्याकाळी चार वाजता इतर सहप्रवाशांचा (ते सर्व रेल्वेने पुण्याला येणार होते) निरोप घेऊन टॅक्सीने इंदिरा गांधी इंटरनॅशनल-डोमेस्टिक एअरपोर्ट वर आलो. साडेपाच वाजता जेट एअरवेजने आम्ही दिल्ली सोडले. विमानात ऑरेंज ज्यूस व पोटभर high tea चा आस्वाद घेऊन सात वाजता पुणे विमानतळावर उतरलो. Pre-paid taxi ने घरी आलो; दोन-तीन फोन करून झोपी गेलो.

## आमची केरळ सहल

ऑक्टोबर [२०११] मध्ये एका संध्याकाळी सौ. आशा एक पत्रक फडफडवित आली; माझ्या हातात देऊन ती जवळच बसली. ते होते 'सॅम्सन टूर' कंपनीचे सहलीचे जाहिरातपत्रक. आम्ही दोघांनी सारा भारत पाहिला होता. पण केरळने आम्हाला हुलकावणी दिली होती. कश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आम्ही सारा भारत पायाखाली घातला होता; दार्जिलिंग सिक्कीम हा कोपराही आम्ही गेल्या मे मध्ये 'श्री ट्रॅव्हल्स' बरोबर जाऊन मनसोक्त पाहिला. पण हा दक्षिणेकडील छोटा कोपरा आम्हाला कायमच डिवचत राहिला होता; त्याला अवलोकण्याची ही सुवर्णसंधी आली होती. 'घरापासून घरापर्यंत' हे आकर्षण, फक्त आजीआजोबांसाठी ही सहल होती. पंचवटीतील तिघेजण सहप्रवासी होते. आमच्या मनाने कौल देऊन टाकला - 'ही संधी सोडायची नाही' .

आम्ही लगेचच टूर मॅनेजर सूरज शहा याला फोन करून बोलावून घेतले. त्याच्याकडून सर्व माहिती घेतली व आमचा सहभाग नक्की केला. अभय त्यावेळी आमच्याजवळच होता. घरातले कोणीही नसताना आम्ही या सहलीला जावे हे अभयला फारसे पसंत नव्हते. पण आमची जोरदार इच्छा पाहून त्याने विरोध केला नाही. फक्त येताना ३६ तासांचा रेल्वे प्रवास न करता येताना आम्ही विमानाने यावे ही त्याची सूचना आम्हाला पटली व त्याप्रमाणे आम्ही आमचे प्रत्येकी २३ हजार व विमानाचे दोघांचे ९ हजार ४०० रू. देऊन बुकिंग केले.

आमची सहल २ डिसेंबरला निघणार होती. त्या दरम्यान आम्ही या सहल कंपनीबद्दल चौकशी केली; रिपोर्ट चांगले होते: हॉटेल्स व जेवण्याची व्यवस्था खूप छान होती; रेल्वेत सुद्धा कंपनी स्वतः बनवलेले न्याहरी जेवण देत होती व खरेदीशिवाय एकही पैसा खर्च करावा लागत नव्हता.

२ डिसेंबर रोजी ठरल्याप्रमाणे दुपारी २ वाजता टूर कंपनीची बस दारासमोर येऊन उभी राहिली. आमच्या प्रवासाची तयारी करून देण्यासाठी चि. सौ. तनुजा २ दिवस आधी मुंबईहून आली होती. चि. अभय नोव्हेंबरमध्येच अमेरिकेला गेला होता. तनुजाच्या येण्यामुळे आम्हाला खूप बरे वाटले; आम्हाला कोणीतरी घरचे “बाय बाय” करायला होते याचा आनंद मनात बाळगून आम्ही अडीच वाजता पुणे सोडले.

ठरल्याप्रमाणे प्रवासात मधे थोडा नाश्ता-चहा घेऊन आमची बस पनवेल स्टेशनवर आली; दुसऱ्या बसने आलेले सहप्रवासी आम्हाला येऊन मिळाले व असे आम्ही ४० जण संध्याकाळी ६-२५ वाजता “गरीब रथ” या a/c गाडीने केरळ सहलीला निघालो.

गरीब रथगाडी a/c असूनही खरेच नावाप्रमाणे गरीब निघाली. इतर a/c गाड्यांमधे रात्रीच्या प्रवासाला बेडिंग-उशी, ब्लँकेट वगैरे रेल्वेकडून फुकट मिळते. पण इथे तशी काहीच सोय नव्हती. आधीच थंडी, त्यात a/c! आमची चांगलीच पंचाइत झाली. सौ. आशाच्या प्रसंगावधानाने आमचे हाल टळले. तिने शाली, स्वेटर्स “मुन्नार” च्या थंडीसाठी घेतले होते ते इथेच

कामाला आले. थंडीचे निराकरण झाले व आम्ही आडवे झालो. त्यापूर्वी आमचे रात्रीचे जेवण झाले. चांगले होते जेवण. आमच्या कंपार्टमेंटमधल्या मुली (खरं तर त्या आज्या होत्या पण आमच्या मानाने लहान पन्नाशीतल्या असल्यामुळे) शैला व शोभा - बहिणी बहिणी - खूप चांगल्या निघाल्या. खूप गप्पिष्ट होत्या व सहकार्य करणाऱ्या होत्या. पुढे सर्व प्रवासभर त्यांनी बाबा-काकू हे संबोधन व नाते टिकवून धरले. आशाचे व त्यांचे छान जमले.

सुमारे १० वाजता आम्ही निद्रिस्त झालो. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही जागे झालो; उडुपीला कंपनीचा चहा आला, तोंड धुवून आम्ही खिडकीशी बाहेरचे निसर्गसौंदर्य बघत बसलो. मलबार सुरू झाले होते व किनाऱ्यावरील नारळापोफळीच्या बागा दाटीदाटीने चवऱ्या ढाळत होत्या. या हिरव्यागार सौंदर्याने मने प्रसन्न झाली.

कोझिकोडेला १२-३० ला दुपारचे जेवण आले - भरपूर आणि चवदार. दुपारी ३-३० वाजता त्रिचूर (मल्ल्याळी भाषेत त्रिसूर) आले. हा आमचा केरळमधला पहिला मुक्काम होता - प्रथमदर्शनीच दाट वनराईने आम्ही भारून गेलो. बसने आम्ही “हॉटेल सोपानन” वर पोचलो. तासाभरात आम्ही ट्रेनमधे राहिलेले देहाचे स्नानादि व्यवहार उरकून घेतले व पहिल्या कार्यक्रमासाठी तयार झालो.

पहिला कार्यक्रम होता गुरूवायूर मंदिर भेट. मंदिर जवळच असल्याने सर्वजण चालत पुढे गेले. आम्ही चौघेजण रिक्षा करून मंदिराजवळ गेलो. स्त्रियांनी पांढरी साडी व पुरूषांनी पांढरी

लुंगी व वरचे अंग उघडे अशा वेषात जायचे बंधन होते. त्या प्रमाणे आम्ही वेष करून निघालो. पण कॅमेरा, मोबाइल, पर्स इ. वस्तूंचेही बंधन निघाल्यामुळे आम्हाला लॉकर शोधा, त्यात या वस्तू व पादत्राणे ठेवा असे सगळे करीपर्यंत खूप उशीर झाला. त्यामुळे आम्ही एकटे पडलो; बाकीचे सर्व पुढे गेले. रांग तिरूपतीच्या मंदिरासारखी गोल गोल होती व भक्तांची खूप गर्दी होती. खूप वेळाने आमचा नंबर आला. तोपर्यंत आम्ही थकलो होतो; दर्शनाचे औत्सुक्य राहिले नाही. आत गेल्यानंतर पाहिले तो देव खूप दूर, अंधारात दडलेला, बाजूला छोट्या छोट्या दिव्यांच्या मध्ये त्याला एवढ्या दुरून पाहायचे म्हणजे एक दिव्यच होते. कुणाला सुदैवाने दिसला, कुणाला तो कुठे आहे हे कळण्याच्या आतच पुढे सरकावे लागले. ज्यांना दिसला ते “दिसला गं बाई दिसला” म्हणत आनंदाने बाहेर आले; बाकीचे चुटपुटत हात चोळत निराश होऊन बाहेर आले. या धडपडीत समाधानापेक्षा वैफल्यच बहुतेकांच्या नशिबी आले. लॉकरमध्ये वस्तू ठेवण्यासाठी ज्याच्याजवळ दिल्या तो माणूस बाहेर येऊन बघतो तो गायब; आमचे धाबे दणाणले. पर्स, चपला, कपडे सर्वच त्यात; गडबडीने निघाल्यामुळे हॉटेलचे नावही माहिती नाही. आम्ही चांगलेच हडबडलो. चेहऱ्यावरून त्या माणसाला शोधत एक तास गेला. दर्शनासाठी उभे राहून आता शोधण्यासाठी ही पायपीट, आणि मनात तो माणूस सापडतो की नाही ही धास्ती. आम्ही चौघेही चांगलेच थकलो. तास दीड तासाने तो माणूस व सूरज शहा आम्हालाच शोधत असलेले सापडले व आमचा जीव भांड्यात पडला. या पायपिटीत आम्हा दोघांचे पाय मात्र चांगलेच थकले. हॉटेल जवळ असतानाही आम्ही रिक्षा करून हॉटेलवर आलो व कॉटवर दाणकन पडलो.

हा देवदर्शनाचा अनुभव आम्ही मनात जपून ठेवला. पुढे तो उपयोगी पडणार होता.

रात्रीचे जेवण छान झाले. दुसरे दिवशी हॉटेल सोडायचे असल्याने बॅगा परत पॅक केल्या व हवीहवीशी वाटणारी झोप घेण्यात मग्न झालो.

दुसरा दिवस उजाडला तो माझ्यासाठी अपशकुनी ठरला. चहा, नाश्ता घेऊन, बॅगा नोकराकडे सोपवून आम्ही बसमध्ये येऊन बसलो. जवळ जवळ १०० कि.मी. रस्ता मस्त हिरव्यागार जंगलामधून जात होता; दाट, सुंदर हिरवेशार जंगल पाहून मने खूष झाली. दिवसाची सुरूवात तर सुंदरच झाली. अथिरापल्ली जंगलातील एका धबधब्याकडे आम्ही चाललो होतो. १० वाजता आम्ही त्याठिकाणी पोचलो. प्रवेशाचे पास मिळण्यात तासभर गेला. केरळी लोकांच्या आडमुठ्या आणि बिनडोक स्वभावाचा पहिला हिसका आम्हाला तिथे मिळाला. वास्तविक त्यांच्याजवळ तिकीटपुस्तके नव्हती. आम्ही “पैसे घ्या व तिकीटे परत आल्यावर द्या” अशी विनंती केली. पण त्यांच्या डोक्यात ती कल्पना शिरेना. आत सोडणाऱ्या मुलींना आमच्या वयाकडे बघून व उशीर होतो आहे असे सांगूनही काही दया येईना. तासाने त्यांचा माणूस तिकीटपुस्तक घेऊन आला; माणसे मोजून त्याने तिकीटे फाडली व आमचा ४० प्रवाशांचा ग्रुप पुढे सरकला; तोपर्यंत सूर्य बराच वर आला होता. बसपासून धबधबा थोडासा दूर होता. सगळा दगडी उतार होता, रस्ता नव्हताच. ओबडधोबड वाट काढत जायचे होते. धबधबा खाली थोड्या अंतरावर उतारावर होता. आम्ही खरेतर खूप धबधबे पाहिले

होते - नायगारा, जोग, गिरसप्पा, स्नोकाल्मी. मन सांगत होते, नको हे रिस्क! पण ...

उन्हात आम्ही दोघेजण हळूहळू निघालो. साडेबाराची उन्हाची वेळ, डोक्याला टोपी नव्हती. खालून वरून ऊन रणरणत होते. बरोबर शैला, शोभा होत्याच. खाली एका कोपऱ्यात पोचलो. धबधबा दिसू लागला - चार पाच पाण्याचे ओहळ ५०-६० फुटावरून खाली पडत होते. इकडून तिकडून पाहिले; काहीच प्रेक्षणीय वाटत नव्हते. थोडा वेळ थांबून आम्ही परत निघालो आणि गर्रकन चक्कर आली. अरे रामा, मला "व्हर्टिगो" चा attack येत होता; इथे, या ठिकाणी! मी हबकलोच. प्रयत्नपूर्वक चढ चढू लागलो, पण डोके गरगरायला लागले, आणखी एक चक्कर! शेजारीच असलेल्या आशाला सांगितले. तिने जवळच्या दोघा तरूण मुलांना बोलावले व त्यांच्या आधाराने माझी यात्रा हळू हळू सुरू झाली. त्या दोघांनाही माझा देह पेलवेना. कसाबसा एका शेजारच्या बाकाचा आधार घेतला. माझी अवस्था दयनीय झाली. सगळीकडे माझ्या अवस्थेची वार्ता पोचली. आमचा टूर मॅनेजर व त्याचा सहकारी लगबगीने माझ्याजवळ आले. त्यांनी शब्दशः माझे मुटकुळे करून मला उचलले व थांबत थांबत गेटपर्यंत मला आणले. माझी अवस्था पाहून मदत करण्याऐवजी तिथल्या केरळी मुलींनी सर्व खुर्च्या गोळा करून ऑफिसमध्ये नेल्या व दार बंद करून घेतले. या कठोर अमानुष वागण्याने आम्ही थक्क झालो. सूरज शहाने एका पोलीस ऑफिसरची मदत घेतली व मला त्याच्या जीपमधून बसपाशी आणले. दोघा तिघांनी मला आत सीटवर बसवले. दरम्यान

Vertin च्या २ गोळ्या आशाने माझ्या पोटात ढकलल्या व पुढचा स्पॉट येईपर्यंत मी थोडासा ताळ्यावर आलो.

२ वाजता आम्ही धबधब्याला टा-टा केले. साडेतीन वाजता आम्ही नंतरच्या स्थळापाशी आलो - कालडी, आदि शंकराचार्य़ यांचे जन्मस्थान! आशाचे हे अतिशय आवडीचे ठिकाण. टूरला निघताना तिने इथे भेट आहे ना हे अनेक वेळा सूरजला विचारून खात्री करून घेतली होती. मला एकटे सोडून जायचे तिच्या जिवावर आले, पण मी तिला माझी काही काळजी करू नकोस असे वारंवार सांगितले. एका कर्मचाऱ्याला माझ्याजवळ बसवून घेतले, तेव्हां कुठे ती उतरायला तयार झाली. शंकराचाऱ्यांच्या बालपणीच्या सर्व खाणाखुणा पाहून ती लगबगीने परत आली. तिचे समाधान झाले आहे याची मला खात्री झाली व तिच्या तोंडून मी सर्व हकीकत ऐकत बसलो.

साडेपाच वाजता आम्ही कालडी सोडले व सात वाजता कोचीनमध्ये प्रवेश केला. M. G. Road, Marine Drive या ठिकाणी गाडीतूनच फेरफटका मारल्यानंतर एका आकर्षक दुकानासमोर बस उभी करून सर्वांना खरेदीसाठी जाण्याची मुभा देण्यात आली. आम्हा दोघांनाही खरेदीचे आकर्षण नसल्यामुळे व अभय, तनुजा यांनी खरेदी निक्षून वर्ज्य केल्यामुळे आम्ही बसमध्ये बसून बाहेरची शोभा पहात बसलो.

कोची(न) खूप मोठे शहर आहे. त्या रात्री शहारुख खान एका प्रचंड मॉलचे (७ लाख चौ. फूट क्षेत्रफळ) उदघाटन करण्यास

येणार होता, त्याचेच जागोजागी मोठमोठे फलक लागले होते. ९ वाजता आम्ही हॉटेल “समिट”  वर पोचलो.

त्या दिवशी मी दुपारपासून काहीही खाल्ले नव्हते, तरी पण सारख्या करपट ढेकरांनी व तोंडाशी गुळमट भावनेने मला अस्वस्थ केले होते. पोटाला काय झाले आहे ते कळत नव्हते. त्यामुळे मी रात्रीही ब्रेडशिवाय काहीही खाल्ले नाही. या अस्वस्थ भावनेतच मी झोपलो. आणि रात्री १ ते दीड च्या दरम्यान मला तीन जबरदस्त जुलाब झाले. सर्व पोट खरवडून काढल्यासारखे रिकामे झाले. अनपेक्षीतपणे हा हल्ला झाल्याने सर्व कपडे खराब झाले. आशा तर या सर्व प्रकाराने हादरून गेली, पण धीराने तिने या सर्व प्रकाराला तोंड दिले. औषधांच्या पिशव्यांतून तिने “लोमोटिल”  शोधून काढले व दोन गोळ्या माझ्या पोटात उतरवल्या. थोड्या वेळाने हा सगळा प्रकार थांबला व मला शांत झोप लागली. बिचारी आशा सर्व साफसफाई करून बऱ्याच उशिरा झोपली. सकाळी तिने शैला, शोभा, त्यांचे वडिल नाना व सूरज यांना बोलावले व त्यांना हा प्रकार सांगून सल्ला विचारला. सूरजने टूर अर्धवट सोडून कोचीहून विमानाने मुंबईला व तेथून पुण्याला जावे असा सल्ला दिला; तशी reservations करण्याची व्यवस्था करण्याची तयारी दाखवली. बाकी मला विचारूनच निर्णय घ्यावा असा सल्ला दिला. नाही तरी १ वाजेपर्यंत काहीही निर्णय घेण्याची घाई नव्हती. सर्व जण सकाळच्या स्थळदर्शनासाठी गेले. आशा मी जागे होण्याची वाट पहात थांबली.

११ च्या सुमारास मला जाग आली. लोमोटिल मुळे व शांत झोप झाल्याने मला बरे वाटत होते. पोटातले वादळ पूर्णपणे शांत झाले होते. आम्ही दोघांनी चर्चा केली व टूर चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. ऊन टाळायचे व चढावर दूर जाणे करायचे नाही एवढी काळजी घेतल्यास काहीही त्रास होणार नाही याची मला मनोमन खात्री वाटली. दोन वाजता मला बसमध्ये सगळ्यांच्या बरोबर पाहून सगळ्यांना मनापासून आनंद झाला. सर्वांनी माझे स्वागत केले व आमचा प्रवास सुरू झाला. एक दुष्ट स्वप्न संपल्यासारखे वाटले.

चि. सौ. तनुजाला फोन करून माझ्या तब्येतीबद्दल व आमच्या निर्णयाबद्दल माहिती दिली. तिला बरे वाटले व तिने प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या. मी फारसे खाल्ले नव्हते; भूकही नव्हती व कालच्या प्रसंगानंतर मी अधिकच सावध होतो.

२ ला आमचा मुन्नारचा प्रवास सुरू झाला. जवळ जवळ दोन तासांचा - १३२ कि.मी. चा हा प्रवास केरळचे सौंदर्य दाखवणारा होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला हिरवेगार दाट जंगल होते. ते जंगल खूप सुखद, डोळ्यांना आल्हाददायक गारवा देणारे आणि बघत रहावे असे वाटले. मी माझा शीण व थकवा पूर्णपणे विसरून गेलो. It was all dark green all around, so pleasing, so enlivening, so refreshing!

वाटेत एका हॉटेलमध्ये सर्वांबरोबर मीही चहा व बिस्किटे घेतली. प्रथमच मला भूक लागली आणि काही खावेसे वाटले. मुन्नार थंड हवेचे ठिकाण, बऱ्याच उंचीवर होते; रस्त्याचा शेवटचा टप्पा

वळणा वळणाचा होता. केरळमध्ये प्रथमच थंडी वाजू लागली. रस्त्यावर रहदारीही बरीच होती. आम्हाला कुलू मनालीची आणि हरिद्वार जोशीमठ रस्त्याची आठवण झाली. तसेच अरूंद, वेडेवाकडे, चढत जाणारे, वरून खाली बघितले की अंगावर शहारे आणणारे! केरळमध्ये हिमालयाची आठवण करून देणारे. मस्त मजा आली. एकच फरक होता; हिमाचलमध्ये गाडी खाली कोसळली तर किमान गंगेमध्ये मोक्ष मिळण्याची आशा होती. इथे खाली नदी नसल्यामुळे दगडावर तुकडे तुकडे होण्याचीच खात्री होती. साडेसहालाच अंधार पडला व साडेआठला आम्ही मुन्नारच्या हॉटेलजवळ पोचलो. तेंव्हा चांगलाच काळोख झाला होता.

हॉटेल फारसे दर्जेदार नव्हते. खोल्याही अशा तशाच होत्या. अस्वच्छ, छोट्या, जेमतेम डबलबेड मावेल एवढ्या! अर्थात Hill Station ला मध्यम वर्गीय ज्येष्ठ नागरिकांनी यापेक्षा जास्ती अपेक्षा करण्यात अर्थ नव्हता. आमची खोली त्या मानाने बरीच सोयिस्कर होती. इतरांना जिने चढून वर तरी जावे लागत होते किंवा जिने उतरून खाली जावे लागत होते.

पहाटे ४ वाजता माझ्या डाव्या पायाचा तळवा दुखू लागल्यामुळे मला जाग आली. तासभर मी ती वेदना सहन केली पण ती काही कमी होण्याचे चिन्ह दिसेना. मग मी आशाला जागे करून तिच्याकडून Iodex चोळून घेतले व एक Combiflam गोळी घेतली. ६॥ वाजता चहा घेतला. पोट साफ झाले, गरम पाण्याने आंघोळ केली, पाय चांगला शेकला, खूप बरे वाटले.

८॥ वाजता बॅगांसह हॉटेल सोडले आणि “टेकाडी” कडे प्रयाण केले. वाटेत धाब्यावर शहाळे पाणी प्यालो. दुपारी १॥ वाजता आम्ही टेकाडी या गावी पोचलो. या गावाला ३ नावे आहेत: टेकाडी, कुमिली, व पेरियार. लेकशोअर या हॉटेल मध्ये जेवण घेतले, थोडी विश्रांती घेतली. इथल्या खोल्या चांगल्या होत्या - प्रशस्त, सर्व सोयींनी युक्त.

दुपारी ३ वाजता आम्ही मसाल्याच्या बागा (spices park) पाहण्यास गेलो. वेलदोडे, मिरी, कॉफी यांची झाडे पाहिली; त्यांची छोटी फळे लहान बोरांसारखी होती. पार्कमध्ये सौ. आशाने हत्तीवरून फेरफटका मारला; हा नवा अनुभव तिला गंमतीशीर वाटला. परत येताना एका मसाल्याच्या दुकानात बायकांनी जंगी खरेदी केली. सौ. आशानेही थोडीशी खरेदी केली. ७ वाजता हॉटेलवर परतलो.

टेकाडी हे तामीळनाडू व केरळ यांच्या सीमेवर आहे. पेरियार धरणाच्या पाण्यावरून या दोन राज्यात वाद उफाळला होता. सीमा हिंसात्मक होती. सुदैवाने आमच्या भेटीच्या वेळी वातावरण शांत होते. रात्री ८॥ वाजल्यापासून सौ. आशाचे पोट थोडे बिघडले पण Lomotil च्या एक गोळीने ते ताळ्यावर आले.

दुसऱ्या दिवशी लवकर उठून ७ वाजता आम्ही हॉटेल सोडले. रिक्षाने बोटराइडच्या जागी पोचलो. पेरियार नदीच्या Backwaters मध्ये आज आमचा नौकाविहार होता. तिकीटे घेऊन, अंगावर Lifejackets चढवून आम्ही नौकेवर चढलो.

पेरियार नदीचे पात्र खूपच विशाल, रूंद होते. नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर दाट, हिरवीगार जंगले होती. केरळचे प्रसिध्द सौंदर्य आमच्यासमोर चौफेर पसरले होते. कुठे पाहू आणि किती पाहू अशी अवस्था झाली. Periyar Wildlife Sanctuary व Tiger Reserve अशीही या पर्यटनस्थळाला नावे होती. केरळ, तामिळनाडू, व कर्नाटक या तीन राज्यांच्या सीमांना ही नदी स्पर्श करत होती. या नदीचे लांबवरचे दृश्य (long shots) मला Jurassic Park मधील सुरूवातीच्या देखाव्यांची आठवण करून देत होते. मी नुसता पहात होतो आणि माझे डोळे ते सौंदर्य आकंठ पीत होते व हृदयात साठवत होते. काही लोकांना वाघ दिसल्याचा भास होत होता, काहींना रानडुक्कर, तर काहींना गवा. नदीच्या पात्रात आलेल्या पर्णविहीन झाडांवरील (snags) घरटी व त्यातील पक्षी हेच फक्त सत्य दृश्य होते; बाकी होते सारे भास! मनसोक्त फोटो काढले. १॥ तासाच्या या बेभान नौकाविहारानंतर आम्ही परत फिरलो. केरळला सुंदर का म्हणतात याची प्रचिती या दीड तासाने दिली होती. Daffodils या कवितेच्या शेवटी Wordsworth म्हणतो:

> They flash upon that inward eye
> Which is the bliss of solitude.

त्याचे प्रत्यंतर आजही मला होते.

१२॥ वाजता हॉटेलवर परतलो, जेवण केले, आणि ४ वाजता अलेप्पीच्या दिशेने प्रयाण केले. वाटेत रबराचे मळे पाहिले आणि ७॥ वाजता अलेप्पीच्या Hotel Prince मध्ये दाखल झालो.

बाकीचे खरेदीसाठी गेले, आम्ही खोलीत बसून राहिलो. जेवण खोलीवरच मागवले. बुंदी रायता आणि dessert फालुदा हा बदल मस्त वाटला. गेल्या २/३ दिवसापासून रात्री बदामाचे दूध खोलीवर येत होते, ते पिऊन झोपायला मजा येत होती. सहल luxurious होत होती.

रात्री परत पायदुखीने जागे केले. कालच्याप्रमाणेच iodex चोळले व Combiflam घेतले आणि पहाटे ५ वाजता हाउसबोटीने Backwaters Ride साठी सज्ज झालो. हा जलविहार आता समुद्रातून होता. आधी खाडी व नंतर खुला समिंदर असे या ३ तासांच्या जलविहाराचे स्वरूप होते. बोटीतच न्याहरी दिली गेली. सुरवातीचे खाडीचे पाणी गढूळ आणि तेलकट होते. पण समुद्रात शिरल्यानंतर स्वच्छ व निळे पाणी दिसू लागले. बोटीत मी फारशी हालचाल न करता पडून जलविहाराची मजा घेत होतो. पाय थोडे थोडे दुखतच होते. जलविहार ११ वाजता संपला. आम्ही खाली उतरून बसमधे बसलो व कन्याकुमारीचा प्रवास सुरू केला. सामान आधीच बरोबर घेतले होते. वाटेत एका सोयिस्कर ठिकाणी लंच घेतले. ५ वाजता आम्ही कन्याकुमारीला पोचलो. दरम्यान पाय बरेच दुखायला लागले होते. कष्टाने पाय उचलत गांधीभवनपाशी आलो. सर्व जण सूर्यास्त पहायला गेले. मी समुद्रकिनाऱ्यावर बसून निसर्गशोभा अवलोकन केली व हळू हळू हॉटेलकडे पावले वळवली. खोली फारशी सोयिस्कर नव्हती पण आम्ही कुरकुर न करता तिचा स्वीकार केला. खोलीवर आल्यावर सौ. तनुजाला फोन करून छोटासा रिपोर्ट दिला. कर्मचारी खूप मदत करत होते, त्यामुळे पायदुखी सुसह्य झाली होती. दरम्यान

एक छोटेसे नाटक घडले. नाना – शैला-शोभाचे वडील हरवले होते; त्यांना शोधण्यात वेळ गेला. पण ते आधीच हॉटेलवर आले होते व त्यांना तेथे पाहताच काळजी संपली.

संध्याकाळी पाय खूप दुखू लागले; Iodex चोळले, Combiflam च्या दोन गोळ्या घेतल्या, जेवलो आणि झोपून गेलो.

सकाळी कन्याकुमारीचे स्थळदर्शन करायला सर्व जण गेले, आम्ही खोलीतच बसून राहिलो. १९७६ च्या भेटीत आम्ही विवेकानंद स्मारक आरामात पाहिले होते; तीन सागरांच्या संगमात हात पाय बुडवून वंदन केले होते; आजूबाजूला खूप भटकलो होतो; कन्याकुमारीचे अगदी जवळून दर्शन केले होते. त्यामुळे पाय दुखत असताना परत ती पायपीट करायची आमची इच्छा नव्हती. थोड्या वेळाने आम्ही खाली स्वागत कक्षात येऊन बसलो.

७॥ वाजता आमची मनापासून सेवा करणारा एक कर्मचारी गणेश आमच्याजवळ आला व आम्हाला बाहेर घेऊन जायला तयार झाला. त्याच्याबरोबर आम्ही बाहेर पडलो; कन्याकुमारी देवतेचे अगदी जवळून दर्शन घेतले व समुद्राच्या कडेला असलेल्या बाल्कनी मधून विवेकानंद स्मारकाचे लांबून दर्शन घेतले. गणेशशी गप्पा मारताना एक विलक्षण माहिती मिळाली. तो मूळचा नैनी(ताल)चा. तो मुंबईला सिनेसृष्टीत Assistant Cameraman म्हणून काम करत होता. चांगल्या चांगल्या दिग्दर्शकांच्या बरोबर त्याने काम केले; पण तिथल्या

वातावरणाला कंटाळला व केरळमध्ये कर्मचारी म्हणून काम करू लागला. त्याचा हा पूर्वेतिहास ऐकून मला वारणा बालवाद्यवृंदाच्या शंकरराव कुलकर्णींची आठवण झाली. नवलाची गोष्ट म्हणजे हा इतिहास त्याने आतापर्यंत कोणालाच सांगितला नव्हता. त्याने आमचे बरेच फोटो काढले. सूर्योदय व सूर्यास्त समुद्रातच दिसणारे कन्याकुमारी हे एकमेव ठिकाण असावे.

दुपारी २॥ वाजता आम्ही आमचे Tri Sea हॉटेल सोडले व थेट त्रिवेंद्रमची दिशा धरली. ६-३० वाजता आम्ही Hotel Dubai Internatioal मध्ये चेक-इन केले. हॉटेल नावासारखेच छान होते व आमची खोलीही मस्त होती - प्रशस्त, सर्व सोयींनी युक्त व लिफ्टच्या जवळ, आठव्या मजल्यावर होती.

त्रिवेंद्रमचे पहिले प्रेक्षणीय स्थळ होते पद्मनाभ मंदिर. त्याच्या अफाट पुरातन खजिन्यामुळे ते सध्या गाजत आहे. त्याच्या बंद असलेल्या दोन खोल्यांमध्ये अजून किती संपत्ती दडलेली असेल याचा लोक अंदाज करत आहेत. लांबून आम्ही त्या दोन खोल्या पाहिल्या. मंदिर खूप सुंदर आकर्षक होते. पण खूप गर्दीमुळे, कपड्याच्या बंधनामुळे व लॉकरसाठी मोठी रांग पाहून आम्ही दर्शनाचा नाद सोडला; ऊनही तापू लागले होते. पूर्वीच्या अनुभवामुळे आम्ही रिस्क टाळले व सावलीत येऊन बसलो.

आतल्या बाजूला आम्ही नंतर जे म्युझियम पाहण्यास जाणार होतो त्याच्या व्हरांड्यातच आम्हाला बसायला छान जागा मिळाल्या. तिथे बसलेल्या युवकाने आमची श्रांत अवस्था बघून

आम्हाला वारा घालायला सुरवात केली; थंड पाणी मागवून दिले; एवढेच नव्हे तर मंदिरातून आलेल्या एका पुजाऱ्याकडून देवाला लावलेले चंदन आमच्या कपाळी लावले. देवाला वाहिलेली फुले आमच्या हातात दिली व आम्हाला भरपूर प्रसाद दिला. हे सर्व आमच्यासाठी करणारा युवक एक नायर - भगवान पद्मनाभ यांचा एक पुजारी होता. आम्हाला धन्य धन्य वाटले. भगवंतानेच आमची वेदना ओळखून त्याच्या रूपाने आमचे समाधान केले. केरळमधले सर्व देव अंधारात असतात. लांबून त्यांचे ओझरते पुसट अस्तित्व फक्त जाणवते. तास तास भर रांगेत उभे राहून आलेल्या आमच्या सहप्रवाशांपैकी एकालाही देवाचे दर्शन झाले नव्हते; आणि इथे देवाने आम्हाला त्याच्या कपाळीचे चंदन, नैवेद्यातील प्रसाद पाठवला होता.

सगळे आल्यावर आम्ही म्युझियम पाहिले; काही खास नव्हते. त्रावणकोरच्या राजाच्या खाजगी मालकीचे, जमवलेल्या शस्त्रांचे व कपड्यांचे ते संग्रहस्थान होते. चालून चालून आम्ही खूप दमलो होतो; बसपर्यंत परत चालत जावे लागले. हॉटेलवर आलो, जेवण घेतले, आणि तासभर ताणून दिली. २॥ वाजता पुढचा दौरा सुरू झाला. वाटेत Blossom Park नावाचा सामान्य बगिचा पाहिला आणि ऊन असतानाच ४॥ वाजता सुप्रसिद्ध कोवालम बीचवर येऊन पोचलो. तासभर आम्ही सावलीत बसलो व ऊन कमी झाल्यावर बीचवर गेलो. तो एक छोटा, आकुंचित, जोरात लाटा आत येईल असा बीच होता. गोव्याचे किनारे याच्यापेक्षा कितीतरी लांबलचक व आकर्षक आहेत. थोडेफार फोटो काढले व आम्ही तो किनारा सोडला. रिक्षावाल्यांच्या आडमुठेपणामुळे आम्हाला चढावर असलेल्या

बसपर्यंत जायला त्रास होईल असे वाटत असतानाच एका गुजराती कुटुंबाच्या मदतीमुळे आम्ही त्यांच्या गाडीतून बसजवळ पोचलो. शैला-शोभांना सौ. आशाच्या गुजराती व्यक्तिमत्वाचा प्रभाव पाहून आश्चर्य वाटले. दिवसभर तब्येतीने चांगली साथ दिल्यामुळे दिवस चांगला गेला.

रात्री गच्चीमध्ये छोटासा गप्पांचा, कर्मचाऱ्यांना बक्षिसी देण्याचा व निरोपवजा जेवण्याचा कार्यक्रम झाला; दुसऱ्या दिवशी परतीचा प्रवास सुरू होत होता; पत्ते, फोन्स यांची देवाण घेवाण झाली; भेटीची निमंत्रणे दिली गेली व सर्वजण स्वप्नमयी झोप घेण्यास रवाना झाले.

सकाळी ६ वाजता रेल्वेने जाणाऱ्या सर्व सहप्रवाशांना आम्ही बाय बाय केले. आम्ही विमानाने पुण्याला परत जाणार असल्याने व आमची flight दुपारी ४ वाजता असल्याने आम्ही थोडा आराम केला. राजू मॅनेजरने लंच व टॅक्सीची व्यवस्था केली होती. दुपारी आम्ही हॉटेल सोडले व त्रिवेन्द्रम विमानतळावर आलो. विमानतळ छोटा होता पण स्वच्छ होता. त्रिवेंद्रम ते बंगलोर व बंगलोर ते पुणे अशा दोन टप्प्यात प्रवास करून रात्री ११-४५ वाजता आम्ही पुणे विमानतळावर उतरलो. चि. सुबोध घ्यायला आला होता; त्याच्या बरोबर आम्ही घरी आलो आणि केरळच्या सौंदर्यस्थळाची स्वप्ने पाहात निद्राधीन झालो.

## Tulip Festival, Seattle

२४ एप्रिल, शनिवार

कालपासून थंडावा कमी होऊ लागला. आज सकाळी तर चक्क सूर्यानं उठवलं. आज दुपारी tulip fields बघायला जायचं होतं. Alexandra Dumas च्या Black Tulip या कादंबरीचं मी शाळेत असतानाच वाचन केलं होतं. त्यावेळेपासून tulip बद्दल माझ्या मनात खूप उत्सुकता होती. गेल्या अमेरिका भेटीत आम्ही tulip च्या बागा पाहायला आलो होतो त्यावेळी फक्त पिवळे tulips पाहायला मिळाले होते. त्यांचा season आणि festival अजून सुरू व्हायचा होता. कुणीतरी श्रीखंडाच्या मेजवानीला बोलवावं आणि चमचाभर श्रीखंडावर बोळवण करावी तसं झालं होतं.

यावेळी आम्हाला उशीर झाला होता. सिझन संपला होता. अभय भारतात जाताना सांगून गेला होता - जमल्यास जाऊन या, पाहून या. त्यामुळं कितपत पाहायला मिळेल याबद्दल साशंकच होतो.

दुपारी २ वाजता आम्ही घर सोडलं. आम्ही ४ मोठी, २ लहान - एका गाडीत नियमानं बसू शकत नव्हतो. पण आगाशे कुटुंब बरोबर येत असल्यानं त्यांच्या गाडीत माझी सोय झाली. Seattle - Vancouver रस्त्यावर Interstate-5 वर उत्तर दिशेनं आमचा प्रवास सुरू झाला. हवामान खरंच छान होतं. ६० मैलावरील Skagit Valley spot वर आम्ही ३:३० वाजता पोचलो. शेतांच्या दिशेनं वळतानाच लांबवर तांबडे-पिवळे पट्टे दिसू लागले आणि आमची भेट फलदायी ठरण्याची खात्री वाटू लागली. थोड्याच वेळात आम्ही शेतात पोचलो. लाल, पिवळ्या, गुलाबी रंगाच्या

tulip फुलांची  मैलोंमैल पसरलेली शेते क्षितिजापर्यंत पोचली होती. मखमली गालिचे अथांग पसरल्यासारखे दृश्य breathtaking या शब्दाचा अर्थ दृष्टांत देऊन सांगत होते. आम्ही खरंच भाग्यवान होतो. उत्सवाचा तो शेवटचा दिवस होता. दुसऱ्या दिवसापासून ती फुलं तोडली जाणार होती. एका बाजूला Daffodils फुलांची पसरलेली शेतं पाहताना Wordsworth च्या ओळी डोळ्यांसमोर नाचत होत्या -

Ten thousand saw I at a glance
Tossing their heads in sprightly dance …
I watched and watched but little thought
What wealth the show to me had brought !

फुलांच्या शेतात मनसोक्त हिंडल्यानंतर आम्ही शेजारच्या पार्कमध्ये गेलो आणि तेथील निसर्गसंपत्ती पाहून चक्क वेडे झालो. शेतात तीनच रंगाची लयलूट होती - पिवळा, लाल आणि गुलाबी. पण इथं तर नवरंगांची आणि त्यांच्या विविध छटांची उधळण होती. कुंड्यांमध्ये लावलेल्या फुलांचे इथे प्रदर्शन होते. काळ्यापासून पांढऱ्यापर्यंत सर्व रंगांच्या छटा आणि त्यावर काळ्या पांढऱ्या रेषांची असंख्य designs! एकाच फुलाच्या या अगणित varieties बघून मन सैरभैर झालं. कितीही पाहिलं तरी समाधान होत नव्हतं. जमेल तेवढं कॅमेऱ्यात साठवून, परतताना माना वळून वळून पाहत आम्ही नाईलाजानं काढता पाय घेतला आणि  ८:३० वाजता घरी पोचलो. रात्रभर जागेपणी आणि झोपेतही tulips चं अवर्णनीय सौंदर्यच आम्ही पीत होतो.

## Lake Chelan

रविवार, ३० मे २०००

गेल्या खेपेच्या Orcas Island च्या आठवणी मनात घोळवत आम्ही उभयता रात्री झोपलो होतो.  चि. सौ. तनुजानं तरी बजावलं होतं - आपण पाण्याच्या आत जाणार नाही आहोत. एका पर्वतातील तलावाच्या भेटीस ( Lake Chelan ) जात आहोत. काठावरून हे सौंदर्य न्याहाळायचं आहे.

लौकर उठून, लौकर आवरून, आम्ही भाड्याच्या van नं सकाळी १०:३० ला घर सोडलं. दुतर्फा ‘पाईन’  वृक्षाच्या जंगलातून वळणं घेत जाणारा सुंदर शुभ्र रस्ता मागं पडत होता. शहराच्या बाहेर पडल्यावर Highway 90 ला आल्यावर अभयनं गाडीचा वेग वाढवला आणि आम्ही Snowqualmie खिंड ओलांडली. एरवी खिंडीतील रस्ता १००-२०० फुटांचा असतो पण ही खिंड तर ५० मैल होती. दोन्ही बाजूला उंच उंच बर्फाच्छादित आणि जंगलात गुरफटलेले Cascade पर्वाचे कडे आणि मधून वळणं वळणं घेत जाणारा रस्ता. आजूबाजूचं पर्वतांचं सौंदर्य पाहावं का रस्त्याच्या मनोहर वळणांना कवेत घेणारा गाडीचा सुसाट आवाका पाहावा आणि डोळे मिटून धुंदी अनुभवावी - काही कळत नव्हतं. What was more beautiful - the landscape or the ride ? एका विलक्षण सुखाची अनुभूती शरीराला जाणवत होती. प्रख्यात Snoqualmie Falls जवळपास कुठेतरी होता आणि गेल्या खेपेला बर्फात skating साठी आलेल्या ३ तरूणांचे देह इथेच कुठेतरी गाडले गेले होते - शेवटपर्यंत सापडलेच नव्हते. १९९७

सालच्या मार्चमधील तो अपघात आम्ही वर्तमानपत्रात वाचला होता. चि. अभय, तनुजा आणि अंजू २ महिन्यांपूर्वी बर्फातल्या skating साठी इथं आले होते. अभयनं ती जागा मला दाखवली. क्षणभर मन शहारून गेलं. अजूनही तेथे भरपूर बर्फ होतं.

१ वाजता आम्ही Leavenworth या गावी आलो. हे एक typical German गाव आहे. इमारती, चर्चेस, रस्ते जर्मन गावासारखे. अमेरिकेत wagon मधून आलेल्या सुरवातीच्या जर्मन लोकांनी इथे वस्ती केली होती म्हणे. 'वनाची' नदीच्या दोन्ही काठावर वसलेलं हे छोटं गाव अगदी लहान बाळासारखं Cascade पर्वतरांगांच्या कुशीत विसावलं आहे. नदीच्या काठी - इथं तिला Icicle म्हणतात - तिच्या अवखळ जलौघाकडे पाहत आम्ही बराच वेळ थांबलो. बरोबर घेतलेल्या उप्पीट व इतर खाऊवर लंचची भूक भागवली, गावात चक्कर मारली, फोटो काढले, मुलांच्या बरोबर आम्हीही mini train नं प्रवास केला आणि ३ वाजता ते गाव सोडलं. Essentiat नदीच्या काठानं व railway line च्या समांतर रस्त्यानं बराच प्रवास करत आम्ही ५ वाजता Lake Chelan जवळ आलो. एका बाजूनं अर्ध्या तलावाला वळसा घालून संध्याकाळी ५:३० वाजता आम्ही तलावाच्या दुसऱ्या काठावरील Wapato Point या हॉटेलपाशी पोचलो. आमचा flat/ condo नं. ७१५ आधी बुक केला होता. हॉटेलमध्ये सामान ठेवलं आणि तलावाच्या काठाकाठानं आम्ही बरेच चालत गेलो.

हॉटेलमधील आमचा फ्लॅट तलावाच्या अगदी काठावर, just 50 steps away होता. पाठीमागच्या दारानं बाहेर पाय टाकला की

तो रेतीतच. जागा spacious; TV, fridge, tub bath, cooking range, microwave, dishwasher; स्वयंपाक करण्याच्या सर्व भांड्यांनी, सुखसोयींनी युक्त होती.

चि. अभय - तनुजानी ब्रेड, दूध, केळी, डोनट्स आणले. उप्पीटाच्या समवेत या गोष्टी आमच्या बुभुक्षित पोटात झपकन लुप्त झाल्या. सर्व दिवे बंद केले आणि चहाचे घुटके घेत आम्ही खिडकीशी बसून समोरचा तलावाचा 'नजारा ' पाहत बसलो. सगळीकडे निस्तब्ध शांतता, आकाशात 'चंद्र आहे साक्षीला' आणि निळ्याशार पाण्याचा Lake Chelan समोर विस्तीर्ण पसरलेला. It was a dream scene. थकलेल्या डोळयांच्या पापण्या मिटू पाहत होत्या आणि या शांत tranquil beauty नं मोहित झालेल्या पापण्या मिटायला तयार नव्हत्या. डोळ्यात मोठा विलक्षण संघर्ष चालला होता. नाराज पापण्यांची केव्हा हार झाली कळलं नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी तृप्त मनानं तलावाच्या काठी हिंडलो, शेजारच्या पार्कमध्ये चि. सारंग, रश्मीला भरपूर खेळू दिलं. दुपारी १ वाजता खिन्न मनानं Lake Chelan ला सायोनारा म्हटलं आणि आम्ही परतीचा रस्ता धरला. Snowqualmie Pass मधून जाताना ढगाळ वातावरण निर्माण झालं. धुकं, ढग, जंगल, बर्फ यांच्या आक्रमणामुळे रस्त्यावर थोडा वेळ terrifying beauty सजीव झाली होती. Weekend च्या परतीच्या traffic मुळे Highway 90 जॅम झाला होता. We were literally inching our way home. ६:३० ला आम्ही घरी पोचलो.

लेक Chelan सिएटल पासून पूर्वेस सुमारे १५० मैल अंतरावर आहे. Cascade पर्वतात हिमनदीमुळं निर्माण झालेला हा तलाव १५०० फूट खोल, १५० मैल परीघ असलेला, गोड्या स्वच्छ पाण्याचा लांबलचक पसरलेला आहे. Boating, skiing सर्व सोयी आहेत. काठावर वसलेल्या गावाचं नाव आहे Manson.

## BON VOYAGE

Air India च्या जेट विमानाने हवेत झेप घेतली, थोडा वेळ अंधारात चमचमणाऱ्या मुंबईवर ते गोल फिरले आणि उत्तर दिशेने त्याने आपला प्रवास सुरू केला.

माझा हा पहिलाच विमान प्रवास होता त्यामुळे एखाद्या लहान मुलासारखे माझे कुतुहल चौकस नजरेने सगळीकडे पाहत होते, मेंदूत साठवण्याचा प्रयत्न करत होते. बोरिवलीहून टॅक्सी करून आम्ही सर्वजण - मी, सौ. आशा व दिलीप - सहार विमानतळावर आलो. सौ. आशा व दिलीपला विमानाचे उड्डाण पाहता यावे म्हणून वरील डेकची तिकीटे घेतली व मी फ्रान्स मित्रमंडळाच्या ग्रुपमध्ये सामील झालो. चार जण ओळखीचे होते पण बाकीचे वीसजण महाराष्ट्र व गुजरात मधून वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेले असल्यामुळे अजूनही अपरिचितच होते.

पुण्याच्या फ्रान्स मित्रमंडळातर्फे माझी आणि आणखीन तिघा सहाध्यायींची फ्रान्स भेटीसाठी निवड झाली होती. निघण्याआधी पुण्याला आमच्या तीन मिटींग्स झाल्या होत्या. सगळ्यांचा परिचय करून दिला गेला होता. मी इंग्लिशचा प्रोफेसर असल्यामुळे माझी लीडर म्हणून नियुक्ती झाली होती. मंडळाच्या प्रमुख निर्मलाताई पुरंदरे यांनी आवश्यक त्या सूचना वारंवार दिल्या होत्या. काही उपयुक्त संभाषणाच्या फ्रेंच भाषेतील टिप्स त्यांनी आम्हाला दिल्या होत्या. शेवटच्या मिटिंगपर्यंत आम्ही एकमेकांना Good Morning च्या ऐवजी Bon Jour आणि thanks च्या ऐवजी Merci म्हणायला लागलो होतो. Travel Corner चे प्रतिनिधी श्री कारखानीस यांना तर आम्ही विद्यार्थ्यासारखे छोटे

छोटे प्रश्न विचारून भंडावत होतो. मंडळानेच आमचे सर्व पासपोर्ट, व्हिसा, व हवाई तिकिटे बुक करायची  व्यवस्था केली होती. मी येताना लंडनला थांबणार असल्याने त्याचा व्हिसा मिळवण्यासाठी मला बरीच मेहनत घ्यावी लागली.

27 एप्रिलच्या मुंबईतील शेवटच्या मिटींगला पासपोर्ट व त्यावर आवश्यक ते व्हिसाचे  शिक्के मारलेले आमच्या ताब्यात देण्यात आले. तिकिटे, परकीय चलन विमानतळावर आम्हाला देणार होते. ३० एप्रिलच्या रात्री 1 मेच्या पहाटेस दीड वाजता आमची एअर इंडियाची फ्लाईट मुंबईहून सुटणार होती. ३० एप्रिलला  ९ वाजता आम्ही सर्व विमानतळावर हजर झालो. तिथल्या हॉटेलमध्ये मंडळाने आम्हाला सेंड-ऑफ मेजवानी दिली. सर्व कागदपत्र आमच्या हवाली केले. लीडर म्हणून मला काही खास सूचना, माहिती व पत्रे दिली. १०:३० वाजता आम्ही check-in साठी आत शिरलो. काचेच्या पार्टीशनमधून मी आशाला  हात हलवून बाय बाय केले. check in, boarding pass वगैरे सोपस्कार आटोपून एक वाजता आम्ही विमानाकडे जाणाऱ्या बसमध्ये बसलो. आणि पंधरा मिनिटात विमानात आमच्या सीटवर येऊन बसलो. हवाई सुंदरी सूचना देत होती त्या आम्ही एका सिन्सियर विद्यार्थ्याप्रमाणे लक्ष देऊन ऐकत होतो. विमान पाण्यावर उतरण्याचा प्रसंग आला तरच्या सूचना ऐकताना मला धास्तीच बसली होती. तिच्या सूचना तर मी माझ्या एका छोट्या नोटबुकमध्ये लिहून ठेवल्या, म्हटलं काय नेम! विमानप्रवासात असा काही प्रसंग येत असेल हे कधी मनातही आले नव्हते,असो.

फ्लाईट ४० मिनिटे उशिरा सुटली. डेकवर पाहत बसलेल्या आशाला आमचे विमान सुटलेले दिसले किंवा कळले की नाही कोण जाणे. कारण विमानतळावर खूप मोठमोठी अवाढव्य विमाने उभी होती. दर ४-५ मिनिटांनी एखादे विमान उतरत होते अथवा उड्डाण करत होते.

तासाभरात ज्यूस चहा कॉफी दिली गेली, चॉकलेट टॉफीज देण्यात आल्या आणि आम्ही आपल्या सीटवर आरामशीर स्थानापन्न झालो. मला खिडकीजवळची सीट मिळाली होती त्यामुळे बाहेरचा देखावा पाहता येत होता. विमानातील मासिक, इयरफोन या सर्वांची ट्रायल झाल्यानंतर मी विमानातील ओव्हर हेड कंपार्टमेंट सहप्रवासी या सर्व गोष्टी पाहू लागलो आणि सहज एक गोष्ट माझ्या लक्षात आली की आमच्या कक्षातील हवाईसुंदरी माझ्याकडे जमेल त्यावेळी आडून, समोरून, जवळून जाताना जरा अधिकच जवळिकीने निरखून पहात होती. ती आकर्षक सुंदर होतीच गोरी पान मोठे मोठे पिंगट डोळे, काळेभोर केसांची पोनी, मध्यम उंचीची सडपातळ छानच होती. माझ्या लक्षात आल्यावर मी तिच्याकडे निरखून पाहिले. तिने हसून माझ्या नजरेला प्रतिसाद दिला आता ती अधिक धीटपणाने माझ्याकडे पाहू लागली. कोण आहे ती माझ्या ओळखीची नक्कीच नव्हती. I was intrigued.

कैरो आल्याची घोषणा झाली आणि माझ्या घड्याळात सकाळचे आठ वाजत होते. कैरोला माझ्या शेजारचा सहप्रवासी उतरून गेला. त्याच्या जागी कोणीच न आल्याने ती सिट रिकामीच राहिली. चाळीस मिनिटांनी विमानाने कैरो सोडले व जिनेव्हाच्या

दिशेने प्रवास सुरू केला. परत juice आणि या खेपेला Toffie भरलेली ओंजळ माझ्यासमोर करत ती हवाईसुंदरी शुद्ध मराठीत मला म्हणाली, "तुम्ही मृणालिनी कुलकर्णीला ओळखता का?" माझी स्मृती click झाली नाही. मी नाही म्हणून मान हलविली . मिस्किलपणे हसत माझ्या डोळ्यांना डोळे भिडले तिने विचारले, "किर्लोस्करवाडीची?" क्षणभर मंदावलेली माझी प्रज्ञा एकदम पेटली, "माझी बहीण?" सिंधू जोशी लग्नानंतर मृणालिनी कुलकर्णी झाली होती आणि आमच्या किर्लोस्करवाडीत एका कारखाना तिचा नवरा नोकरीला होता.

ती माझ्या शेजारच्या सीटवर बसली. एक मंद गोड सुवास माझ्या नाकात शिरला. ती खूपच सुंदर होती. मोठे पिंगट डोळे माझ्यावर रोखून ती म्हणाली "मला ओळखलं का? निरखून बघा आणि मग सांगा." मला बरोबर पाहता यावे म्हणून ती शेजारी उठून उभी राहिली. हसत हसत माझ्याकडे पहात राहिली. पण मला ओळखीची खूण काही दिसली नाही. नाईलाजाने "सॉरी नाही आठवत" म्हणून मी मान वळवली. ती परत माझ्या शेजारी बसली. "माझे नाव शिल्पा शिंत्रे, मी तुमच्या बहिणीची खास मैत्रीण, तुम्ही १९५९ साली किर्लोस्करवाडीला आला होता मला पाहायला. तुम्ही आमच्या घरी आला होता. मी त्यावेळी P.D.Arts ला होते." "मी नापसंती कळवली?" इतक्या सुंदर पोरीला मी का नाकारले हे न कळुन मी न राहवून विचारले. "नाही, तुम्ही पसंती कळवली होती मी तुम्हाला नापसंत केले. तुम्ही आवडला नाहीत म्हणून नव्हे. तुम्ही मला खूप आवडला होतात. तुमचा पगार 120 रुपये फार कमी होता. माझ्या मैत्रिणींनी ही मला चिडवले. "फक्त एकशे वीस रुपये

तुझा संसार कसा व्हायचा? या तुटपुंज्या कमाईत? निदान तीनशे रुपये तरी हवा ग!" मला त्यांचं बोलणं संयुक्तिक वाटलं आणि.... मी नकार दिल्याची रुखरुख कितीतरी दिवस माझ्या मनात होती. आणि दोनच वर्षाने मृणालने मला बातमी दिली कि तुमचं लग्न बडोद्याच्या एका मुलीशी झालं. नंतर तीन महिन्यांनी तुम्ही M.A. झाला आणि धुळ्याला इंग्लिशचे प्रोफेसर झालात. मृणालने मला चिमटा काढून सांगितलं, "शिल्पा माझ्या भावाचा पगार दरमहा रुपये तीनशे आहे." मी कपाळाला हात लावला. मी माझ्या हाताने हातातोंडाशी आलेलं सुख लाथाडलं होतं. एक सुस्कारा सोडून बराच वेळ शिल्पा गप्प बसून होती.

जिनिव्हा विमानतळ जवळ आल्याची announcement झाली आणि शिल्पा काही न बोलता उठून निघून गेली. मी खिडकीतून जीनिव्हाचा विस्तीर्ण निळाशार तलाव व त्यातील उत्तुंग उडणारे कारंजे पहात बसलो. जीनिव्हाला उतरणाऱ्या लोकांची लगबग संपली. मी कुतूहलाने विमानाच्या दाराशी जाऊन थांबलो. अनपेक्षितपणे शिल्पा माझ्याजवळ आली, माझा हात हातात घेऊन विमानाच्या बाहेर पडली. "चल, आपण कॅफेटेरियात जाऊन कॉफी घेऊया."

गुबगुबीत खुर्चीत बसून कॉफी व कुकीज खाता-खाता तिने निवेदन सुरू केले. "त्यानंतर तीन वर्षाने माझे लग्न झाले, माझे वडील माझ्या लहानपणीच निवर्तले होते. माझे काका घरचे सर्व पाहत होते. मी T Y मध्ये होते, बोरगावच्या जमीनदाराने मला मागणी घातली. कमी पगारामुळे मी तुम्हाला नाकारले होते हे काकांना माहिती होते त्यामुळे त्यांनी या श्रीमंत जमीनदाराला

होकार कळवला. मी ही आढेवेढे घेतले नाहीत. लग्नानंतर सहा महिन्यांच्या आतच या लग्नाच्या बाबतीत  मी पार फसले आहे हे माझ्या लक्षात आले. माझा नवरा व्यसनी आणि कमालीचा छंदीफंदी होता. दारुड्या तर होताच पण बायकोपेक्षा बाहेरच्या स्त्रियांमध्ये त्याला जास्ती रस होता. फार्म हाऊस वर त्याने एक बाई ठेवली होती. आणि लग्नाची नवलाई संपताच त्याचा रात्रीचा मुक्काम तिकडे होऊ लागला. तमाशे आणि नाचगाण्याच्या पार्ट्या फार्महाऊसवर झडत होत्या. त्याचे हे छंद अडवणारे घरात कोणीच  वडीलधारे माणूस नसल्याने इस्टेटीवर डोळा ठेवून असलेला थोरला सावत्र भाऊ त्याला उलट उत्तेजन देत होता. मी त्याला एकदा बोलायचा प्रयत्न केला तर, "गुमान आपल्या खोलीत बसून राहायच, मास्तराच्या पोरीला जमीनदाराचे  जीवन  काय माहिति असणार?" काकांना  "मला घेऊन माहेरी जा"  असा निरोप पाठवला तर त्यांनी घरी न्यायला नकार दिला. मला बाहेर जायचे स्वातंत्र्य होतं पण तेही मर्यादित. मी पुरती फसले होते आणि अडकले होते.

एक रात्री बाहेर खूप आवाज येत होते मी बाहेर गेले आणि पाहिले, कुणीतरी माझ्या नवऱ्याला गाडीतून बाहेर काढत होते. त्याचा रक्तबंबाळ देह पाहून मला घेरीच आली. दुसऱ्या  दिवशी कळलं दारू पिऊन गाडी चालवत असताना एक ट्रक वर गाडी धडकली होती. कार आणि ट्रक यांच्यामध्ये त्यांचा देह चिरडला होता, जागीच मरण आलं होतं.पतीच्या  प्रेमाचा काहीच अनुभव नसल्याने मी बधीर मनाने या बातमीचा स्वीकार केला. लोकांच्यासमोर मला शोक प्रदर्शन करावं लागत होतं पण अंतःकरणात मी सुन्न होते. या आकस्मिक मरणाने एक चांगली

गोष्ट झाली. सावत्र भावाचा इस्टेट हडप करण्याचा मनसुबा फसला होता. पत्नी या नात्याने मी मालकीण झाले होते आणि तो माझा आश्रित झाला होता.

माझ्या एका मैत्रिणीचा नवरा वकील होता त्याने मला या सर्व प्रकरणात खूप मदत केली. सर्व कटकटी त्याने मिटवल्या. जमिनी, खेड्यातली घरे विकून त्याचे पैसे बँकेत गुंतवले. सांगलीमधील छानसे टुमदार घर, गुलमोहर कॉलनीतले, व पन्नास लाखांच्या गुंतवणुकीवरील भरपूर व्याज या कमाईत मी मजेत राहू लागले.

मृणालनेही सांगलीला घर बांधले होते व ती माझ्या जवळच राहायला आली होती. तू वारणा नगरला आहेस हे तिनेच मला सांगितले. न रहावून मी एकदा मृणालसह तुमच्या फ्लॅटवर आले. तू पुण्याला परीक्षेच्या कामासाठी गेला होतास. आशा मला खूप आवडली. साधीसरळ, तिचे तुझ्यावर खूप प्रेम होते. तिचा का कोण जाणे मला जराहि हेवा, मत्सर वाटला नाही. तुझी मुले तर मला फार आवडली. दोघी मुली ditto तुझ्यासारख्या, पिंगट डोळे सरळ नाक, भरपूर केस. अभय सुरुवातीस दूर दूर राह्यचा पण नंतर मिसळला . रविवारी आम्ही वारणा बझारला भेट दिली. मुलांसाठी भरपूर खरेदी केली. आयुष्यात प्रथम मी माझ्या माणसासाठी खरेदी करते आहे असे मला वाटले, खूप रमले मुलांच्यात आणि आशाच्या सहवासात. आधी ठरवल्याप्रमाणे तिची एक श्रीमंत मैत्रीण एवढीच माझी माहिती मृणालने आशाला दिली. दोन दिवसानंतर तिथून निघायचे माझ्या जिवावर आले, माझे पाय तेथे घुटमळत होते, तुझी भेट

झाली नव्हती तू चार दिवसांनी येणार होतास. 'परत लवकर या, जास्त दिवस या' हा प्रेमळ निरोप हृदयात साठवून मी बाहेर पडले. आदल्या दिवशी वाद्यवृंदाचा कार्यक्रम पाहायला गेलो होतो. अभयचे violin वादन व अंजुची अनेक वाद्यांवरील सफाई राहून राहून डोळ्यासमोर येत होते. मी मूर्खपणा केला नसता तर ही मुले माझी असती हा विचार राहून राहून माझ्या मनात डोकावून जात होता.

चार वर्षांनी मी M A झाले, पुणे युनिव्हर्सिटीचा फ्रेंच भाषेचा डिप्लोमा पूर्ण केला. १९७४ साली मी Air India मध्ये अर्ज केला व तिथे Air Hostes म्हणून माझी निवड झाली. मला आवडली ही नोकरी. गेले सहा महिने मी मुंबई पॅरिस लंडन फ्लाईट वर काम करते आहे.

तिचे निवेदन संपले आणि ती उठून निघून गेली. तिच्या डौलदार बांध्या कडे मी थोडावेळ पहात राहिलो. अर्ध्या तासाने ती परत माझ्याजवळ आली व माझ्याकडून तिने फ्रान्स दौऱ्याचे सर्व वेळापत्रक घेतले, लंडन मुक्कामाची माहिती घेतली, मुंबईची परतीची तारीख घेतली. या सर्व गोष्टींची छोट्या वहीत नोंद केली. पॅरिस आगमनाची अनाउन्समेंट झाली. त्याबरोबर मला पॅरिस मुक्कामात भेटण्याचे व मुंबईला receive करण्याचे आश्वासन देऊन दोन बोटे ओठावर ठेवुन, Bon Voyage अभिवादन करत निघून गेली.

पॅरिसला फ्रान्स मित्रमंडळाने आमचे आगमन कक्षात जंगी स्वागत केले. मला मोठा पुष्पगुच्छ देऊन व इतर सदस्यांना

गुलाब पुष्प देऊन मादाम Landormi यांनी सर्वांची ओळख करून घेतली व दिली. १५ जणांचा माझ्या नेतृत्वाखालचा ग्रुप २.३० वाजता पहिल्या केंद्राकडे मेझ स्ट्रासबुर्गकडे रवाना झाला व दुसरा 9 जणांच लियोन्झ कडे.

यानंतर ४ आठवडे आम्ही कार्यक्रमात, स्थानिक कुटुंबाच्या आदरातिथ्यात पॅरिस दर्शनात इतके गुंतून गेलो की शिल्पाची एकदाहि आठवण झाली नाही. तिला मी पार विसरून गेलो.

31 मे ला आमचा फ्रान्स दौरा संपला. फ्रेंच मित्र-मैत्रिणींना Bon Voyage करून आम्ही लंडनला आलो. माझ्या भावाचा मित्र त्रिंबक पाटील याने माझा ताबा घेतला. लंडन, आसपासचा परिसर, शेक्सपिअरचे जन्मस्थान, StratFord on Avon, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी व खूप खरेदी उरकून आम्ही वारणा नगरचे ४ जण मँचेस्टर मार्गे डॉ. सुधाकर कोरे यांचे पाहुणे म्हणून किल्मेरनॉकला गेलो. त्यांचा पाहुणचार व स्कॉटलंडचा हिरवागार परिसर, एडिंबरो, ग्लासगो, अबरडीन ही High Lands मधील शहरे, उत्तर समुद्रातील खाडी वरील ४ मैल लांबीचा पूल ओलांडून आम्ही इंग्लिश स्थापत्यशास्त्र पाहून चकित झालो. पाच दिवस कोरे दांपत्याने आम्हाला सर्व स्कॉटलंडची, जॉनी वॉकर व्हिस्की ची Beers च्या सर्व प्रकारांची अनुभूती देऊन खूष केले. रात्री गप्पा मारीत उशिरा झोपायचे व पाचला उगवणाऱ्या सूर्याला गुड मॉर्निंग करत फिरायला बाहेर पडायचे. अक्षरशः दिवसातील 16 तास गाडीच्या चाकावर घालवून आम्ही Sight Seeing करायचो. आम्ही लंडनला परत आलो.

14 जूनला आम्ही चौघांनी लंडन सोडले. मॉस्को तेहरान मार्गे मुंबईला 15 ला आलो. सौ आशा, मुलांनी माझे स्वागत केले. दुसऱ्या दिवशी मला कॉलेजमध्ये नोकरीवर हजर व्हायचे असल्याने आम्ही दुपारी लगेच बसने  वारणानगर ला रवाना झालो.

कॉलेजमध्ये हजर झालो. दुर्दैवाने माझ्या वडिलांच्या निधनाचा मिरजेहून संध्याकाळी फोन आला व पुढील पंधरा दिवस मी कामात पार बुडून गेलो.

५ जुलैला फ्रान्स मित्र मंडळाची बैठक होती. लीडर या भूमिकेतून मी  निर्मलाताईंना सर्व अहवाल दिला. कारखानीस यांनी  बोलता बोलता सहज एक बातमी दिली, "तुम्हाला पॅरिसला घेऊन येणारे एअर इंडियाचे विमान लंडनला हिथ्रो विमानतळावर उतरताना त्याला अपघात झाला होता. ३७ प्रवासी व एअर इंडियाचे चार कर्मचारी मृत्यू पावले होते. एअर होस्टेस शिल्पा शिंत्रे यांचा त्यात समावेश होता"....

शिल्पाने मला पॅरिसला Bon Voyage म्हटले होते पण मी तिला Bon Voyage म्हणावयास विसरलो होतो.

## Whale Watching

८ सप्टेंबरचा Whale Watching चा अनुभव सुखद म्हणण्यापेक्षा थरारक व लक्षणीय म्हणून लक्षात राहील. महाराष्ट्र मंडळातर्फे गणेशोत्सवानंतर ‘महासागरात प्रचंड Whale माशांचे दर्शन’ ही ट्रिप आयोजित केली होती. एका छोट्या मध्यम आकाराच्या बोटीने सुमारे ९० प्रवासी पॅसिफिक महासागरात खोलवर गेलो. माश्यांच्या प्रचंड देहांचे दर्शन झाले खरे; पण प्रचंड हेलकाव्यांमुळे आम्ही जवळजवळ सर्वजण ओकाऱ्या आणि मळमळणे यांनी हैराण झालो. भल्याभल्यांचे गर्वहरण करणारी ही सहल बोटीचे थोडा वेळ दवाखान्यात रूपांतर करणारी ठरली. Friday Harbour या बेटावर उतरल्यानंतर सर्वजण हळूहळू ताळ्यावर आले. गरमगरम कॉफी पोटात गेल्यावर बरे वाटले. परत येताना मोठ्या फेरीतून काहीच त्रास झाला नाही. सर्व पेशंट मजेत खेळत होते.

आता आठवलं की सांगायला मजा वाटते; पण त्यावेळेला ३ तासांचे हे दिव्य कसे संपेल असे झाले होते. Whale Watching च्या ऐवजी Hell Watching म्हणावं अशी झाली ही सहल !

## Vancouver

गेल्या तीन अमेरिकन भेटीत हुलकावणी दिलेले व्हॅन्कुव्हर या खेपेला अनपेक्षितपणे घडले. दर खेपेला काही ना काहीतरी अडथळा निर्माण व्हायचा व व्हॅन्कुव्हर राहून जायचं. एकदा तर आम्ही चौघेजण व चि. सारंग सर्व तयारी करून गाडीनं निघालो आणि आमच्या लक्षात आलं की I94 Card INS कडं पाठवल्यानं आमचे प्रवासी कागदपत्र पुरेसे नव्हते. परत येताना कॅनडा बॉर्डरवर आम्ही दोघेजण अडवले जाण्याचा धोका होता. या खेपेला मात्र जुलैमध्येच अभयनं जाहीर केलं की ऑक्टोबरमधल्या एका Long Weekend ला आपण Vancouver ला नक्की जाऊ. प्रत्यक्षात ऑगस्टच्या अखेरीस Long Weekend लाच आमची व्हॅन्कुव्हर भेट झाली.

१ सप्टेंबर रविवारी सकाळी ११ वाजता दोन गाड्यांतून आम्ही सर्व तयारी करून निघालो. चि. अंजूच्या गाडीत आम्ही दोघे होतो व चि. अभयच्या ‘होंडा’ मध्ये बाकी सर्व. I-5 Interstate Highway नं गाड्या सुसाट सुटल्या होत्या. मध्ये एका Rest Area मध्ये बरोबरीचं काही व तेथील Free Cookies व कॉफी पोटात रिचवून ढेकर दिले व बरोबर १:३० वाजता कॅनडा बॉर्डरवर दाखल झालो. सुटीचा सीझन असल्यानं गाड्यांची बरीच लांबलचक रांग व्हिसा वगैरे कागदपत्रं तपासून हद्द ओलांडण्यासाठी तिष्ठत उभी होती. आमचा नंबर येईपर्यंत अर्धा तास आम्ही गाडीत बसून काढला. बाहेत अतिशय सुंदर असा Peace Arch Park होता. हिरवीगार प्रशस्त हिरवळ व त्यावर जागोजागी विविध रंगांच्या फुलांची अतिशय आकर्षक सजावट. कॅनडा बॉर्डरला लगेच लागून कॅनडाचा तिरंगी ध्वज व त्यावर

मध्ये शांतिनिदर्शक Maple चे पान ( बिल्वदलासारखे त्रिपर्णी ) त्या त्या रंगांच्या फुलात पसरला होता. सबंध Canada - US सरहद्द रंगीबेरंगी फुलांच्या गालिच्यांनी लगडली होती. हवेत सुखद गारवा आणि रंगांची ही रेलचेल दोन देशांतील गाढ मैत्री दाखवत होती. दोन्ही देशांच्या नागरिकांना परस्परांच्या देशात जाण्यासाठी Visa लागत नाही. २:३० वाजता आमच्या पासपोर्टवर कॅनडाच्या Immigration अधिकाऱ्यांनी Admitted म्हणून शिक्के मारले. ५ मिनिटांचे काम पण गर्दीमुळे आम्हाला एक तास लागला.

सरहद्दीवरील उंच शुभ्रधवल Peach Arch ओलांडून आम्ही व्हॅन्कुव्हरच्या परिसरात शिरलो. व्हॅन्कुव्हर हे British Columbia या प्रांताचे प्रमुख शहर. इमारती, रस्ते, उपनगरांची नावे ब्रिटिश प्रभाव जाणवून देत होते. व्हॅन्कुव्हर बेट हे स्वतंत्रच भूप्रदेश आहे.

Indian Market मध्ये थोडीशी खरेदी व भारतीय जेवण ( खूप तिखट ) करून पहिल्या प्रेक्षणीय स्थळाकडे मोर्चा वळवला. रूंद, स्वच्छ रस्ते, प्रचंड Flyovers व प्रदीर्घ पूल हे व्हॅन्कुव्हरचे वैशिष्ट्य आहे. Lions Gate Bridge अगदी हुबेहूब San Francisco च्या Golden Gate Bridge सारखा प्रचंड, स्थापत्यशास्त्रातील आश्चर्य आहे. तो ओलांडून आम्ही Capilano Suspension Bridge कडे गेलो. २३० फुट खोलवर घळ, तिच्या तळाला कॅपिलानो नदीचा प्रवाह व वर दोन्ही काठांना जोडणारा ४५० फूट लांब अरूंद झुलता पूल. माणसांच्या पायी वर्दळीमुळे पूल सारखा हालत असतो. मध्ये खोलगट, दोन्ही

बाजूला पीळदार लोखंडी दोरांनी वर ओढून धरलेला हा पूल लोखंडी जाळीचा, पूर्ण सुरक्षित, दोन्ही बाजूला १० फूट उंच लोखंडी जाळी असलेला, एका वेळी २-३ माणसे चालू शकतील एव्हढाच ( अ ) रुंद आहे. दोन्ही बाजूला धरलं नाही तर सारखा तोल जाण्याची भीती वाटते. पूल ओलांडून पलीकडे जाईपर्यंत जीव टांगलेला असतो. हा पूल ओलांडणे म्हणजे एक विलक्षण आकर्षक धाडस आहे. खरं हास्य पूल ओलांडल्यावरच तोंडावर फुटतं. तोपर्यंत नुसती धास्ती - केव्हा संपतंय हे दिव्य अशी अधीरता.

पूल दोन्ही बाजूंनी ओलांडल्यानंतर मुक्त मनाने कॉफी घेतली. अमेरिकेतील मूळचे रहिवासी Native Americans (Indians) यांचे लाकडावरील कोरीव काम व रंगकाम दाखवणारे उंच Totem खांब पहिले. Indians ना गरूड फार प्रिय व पवित्र. सर्व खांबांचा आकार व रंगकाम गरूडाची प्रतिकृती दाखवणारे होते.

रात्री ८ वाजता आम्ही आमच्या नियोजित Comfort Inn हॉटेलमध्ये येऊन पोचलो. प्रवेशद्वारावरील कारंज्यांनी Kings Way वरील हे तारांकित हॉटेल अतिशय सुसज्ज व Comfortable वाटले. भूक फारशी नव्हतीच पण उर्वरित अन्न पोटात ढकलून गादीत कोसळलो. गाद्या तशा मऊमऊ होत्या व थोड्याच वेळात बॉर्डरवरील फुलांचा समुदाय, लायन्स गेट ब्रिज, कॅपिलानो झुलता पूल व Downtown व्हॅन्कुव्हरची विहंगम Skyline यांची स्वप्ने पाहत झोपेच्या कुशीत शिरलो.

दुसऱ्या दिवशी न्याहारीनंतर Stanley Park या सुप्रसिद्ध बागेत आम्ही हिंडलो. मध्यभागी मोठा तलाव व भोवती Ring Road. आम्ही दोघे १५०० पौंड वजनाच्या, एका वेळी ५० प्रवाशांना वाहून नेणाऱ्या लाकडी गाडीत बसलो. २ मोठे घोडे, ताकदवान, धष्टपुष्ट, मोठ्या जाड पायांचे व खुरांचे, गाडी ओढून नेत होते व जागोजागी असणाऱ्या प्रेक्षणीय शिल्पांचे, पुतळ्यांचे, बागांचे वर्णन Driver-cum-Guide करीत होती. तासभर ही घोडदौड झाल्यानंतर Prospect Point वरून आम्ही व्हॅन्कुव्हरचे Cinemascopic दर्शन घेतले. एका बाजूला दूर पसरलेला प्रशांत महासागर, समोर व्हॅन्कुव्हर बंदरातील मोठमोठ्या बोटी, Loading ची वाट पाहत असलेले Sulphur चे पिवळे उंच ढीग, पाठीमागे उंच चढत गेलेल्या टेकड्यांच्या सात रांगा, त्यांच्या उतारावर घरंगळणारी, झाडांच्या कुशीत विसावलेली घरे, उजवीकडे Downtown व्हॅन्कुव्हरच्या गगनचुंबी इमारती व त्यांच्या अलीकडे Lions Gate पुलाची मनोहर कमान. अर्धा तास या दृश्याचे आकंठ दर्शन घेतल्यावर आम्ही आमची नजर आवरती घेतली. वाटेवर Indica नावाच्या भारतीय हॉटेलमध्ये जेवण घेतले व बॉर्डरच्या दिशेने गाड्या वळवल्या. Canada - US border वर अर्ध्या तासात आमची सुटका झाली. मावळतीकडे वळलेल्या सूर्याच्या प्रकाशात परत एकदा पांढरीशुभ्र Peace Arch व नयनमनोहर फुलांच्या - पानांच्या रेलचेल बागांचे सौंदर्य मनात साठवून घेतले आणि सुसाट वेगाने घरचा रस्ता धरला. रात्रीचे जेवण वाटेवरील Denny’s या उपाहारगृहात घेतले व घरी येऊन थेट शयनगृहात शिरलो.

## Shakespeare Festival

ही अविस्मरणीय भेट घडली १४-१५ सप्टेंबरला. चि. अभयच्या ऑफिसमधील एक अमेरिकन सहकारी John Scarborough दक्षिण ओरेगॉनमधील Ashland गावी राहतात. गेली कित्येक वर्षे त्यांच्या गावी फेब्रुवारी ते ऑक्टोबर शेक्सपियरच्या नाटकांचे प्रयोग होतात. सोमवार सोडून प्रत्येक दिवशी एक नाटक, व शनिवारी - रविवारी दोनदोन नाटके सादर केली जातात. स्थानिक कलावंतांबरोबरच अनेक नामवंत कलावंत - राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय - या नाटकांत भूमिका करण्यासाठी अहमहमिका करतात. जॉनने आम्हाला ही नाटके पाहण्यासाठी त्यांच्या घरी राहण्याचे आमंत्रण केले व आम्ही ते उत्सुकतेने स्वीकारले.
शनिवारी १४ सप्टेंबरला Crater Lake सहलीनंतर Medford मार्गे दुपारी Ashland मध्ये दाखल झालो. Scarborough दाम्पत्य - जॉन आणि मार्गारिट आमची वाटच पाहत होते.

एका अमेरिकन कुटुंबाचे आतिथ्य त्यांच्यात राहून अनुभवण्याचा हा आमचा पहिलाच अनुभव होता. जॉनचा आमचा थोडा परिचय झाला होता; पण मार्गारिट पूर्णपणे अनभिज्ञ, अनोळखी होती. गृहिणीची ओळख नसल्यामुळे आम्ही दोघेही थोडेसे बिचकत, बावरत त्यांच्या घरात शिरलो आणि काही मिनिटांतच मार्गारिटने तिच्या भारतीय चहाने आणि अन्नाने आणि मनमोकळ्या स्वभावाने आमचा संकोच पूर्ण घालवला. भाषेची अडचण, संस्कारांचा वेगळेपणा आणि प्रथम भेटीचा बुजरेपणा यावर मात करून आशा व मार्गारिट दिलखुलास गप्पा मारणाऱ्या मैत्रिणी झाल्या. इंग्रजी भाषेचा फारसा गंध नसतांनाही थोड्याच वेळात फक्त आंग्लभाषिकाशी चटकन मैत्री करण्याचे आशाचे

हे इंगीत मला मोठे अगम्य आणि अद्‌भुत वाटते. Communication साठी तिला भाषेची अडचण कधीच जाणवत नाही. Paula, Kate, Jennie आणि आता मार्गारेट - त्यांच्याशी नुसता कामापुरतेच नव्हे तर चक्क गप्पा मारणे तिला सहज जमतं. I admire her skill.

पहिल्या दिवशी रात्री ( शनिवारी ) As You Like It व दुसऱ्या दिवशी ( रविवारी ) मूळचे इटालियन English मध्ये रूपांतरित केलेले Saturday, Sunday and Monday ही दोन नाटके पहिली. थकवा व कंटाळा आल्यामुळे रात्रीचे Winters Tale रद्द केले व गप्पा मारत बसलो. जॉनना भारतीय देवता, अध्यात्म व हिंदू संस्कृती याबद्दल बरीच माहिती व आत्मीयता होती. मार्गारेटही स्वभावाने बरीच हिंदू विचारांची होती. दारावरील पडदे, बागेतील फुलझाडे, हिंदू देवतांचे आदरणीय पार्श्वभूमीवर ठेवलेले पुतळे व एकंदर घराची सजावट यामध्ये श्रीमंतीचे प्रदर्शन नव्हते; पण कलात्मकता, रसिकता व पाहुण्याबद्दलचा आदर जाणवत होता. घरात कुठेही मद्य, मांस व सिगारेटचा मागमूस नव्हता. Personal Library मध्ये भारतीय विषयावरील आम्हालासुद्धा विलोभनीय, अप्रूप वाटतील अशी भरपूर पुस्तके होती. दोन्ही दिवस जेवण संपूर्ण भारतीय पद्धतीचे आणि चवीचे होते. घर Victorian पद्धतीचे व बाग प्रशस्त, कलात्मक होती. दोन्हीही दिवस जॉन व मार्गारेट दोघांनीही अतिशय अगत्याने आमचे आतिथ्य केले. मुलांची जागा ४ गुबगुबीत व अतिशय शांत मांजरांनी घेतली होती. त्याच हक्काने व मायेने. त्यांची नावेही मोठी गमतीची होती - मल्लिका, उमा, Tobias आणि अमर.

सोमवारी सकाळी भरल्या पोटाने व तृप्त मनाने आम्ही दोघांचा निरोप घेतला. Airport पर्यंत दोघेही पोचवायला आले होते. परत एकदा छोट्या विमानाने दीड तास प्रवास करून आम्ही सिऍटलला परत आलो. अर्ध्या तासात गाडीने घरी पोचलो. मनात प्रेम व आत्मीयता असली तर भाषा, देश, संस्कृती, विचार यातील भेद सुखी जीवनाला छेद देत नाहीत; हा आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा आणखी एक अनुभव पाठीशी घेऊन आलो.

## Crater Lake

शनिवारी १४ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता एका छोट्या ५० सीटर विमानाने आम्ही सिऍटल सोडले व ८:२० ला मेडफोर्ड या विमानतळावर उतरलो. चि. अभयने Online भाड्याने घेतलेली गाडी बाहेर पार्कमधे उभी होती. आम्ही गाडीत बसलो व बरोबर घेतलेल्या न्याहारीचा आस्वाद घेत ८० मैलावरील Crater Lake च्या दिशेने निघालो. संबंध प्रवास डोंगराच्या माथ्याच्या दिशेने Rogue नावाच्या नदीच्या काठाने होता. Rogue या शब्दाचा अर्थ अवखळ, असंस्कृत, untamed असा आहे. एखाद्या अनावर हुंदडणाऱ्या जंगली जनावराप्रमाणे ही नदी कधी डोंगरावरून उड्या मारत होती, कधी लाव्हाच्या नळ्यांसारख्या अरुंद मार्गाने झेपावत होती, तर कधी आजूबाजूच्या उंच वृक्षांना मुळाशी धक्के मारत अक्षरशः एक पायावर उभे राहिलेल्या योग्याप्रमाणे कसरत करायला लावत होती. एका ठिकाणी तर एक उंच वृक्ष तिच्या धक्क्यामुळे तोल गमावून तिच्यावरच आडवा धाराशायी झाला होता. तिच्यावरील पूल उलटसुलट ओलांडत वर जात होतो. तिचे पात्र छोटे छोटे होत गेले व तिच्या उगमस्थानाला - Diamond Lake ला मागे टाकताच तिचा सहप्रवास संपला. ६०-६५ मैलांच्या या टप्प्याला म्हणूनच Rogue Valley म्हणतात व Medford विमानतळाला Rogue Valley Airport म्हणतात.

डोंगर उघडाबोडका दिसू लागला, झाडे विरळ झाली, रस्त्याची वळणे वाढली. Fall चा रास्ता उजवीकडे गेला. सरळ पुढे जात शेवटचे वळण घेतले. गाडी एका मोठ्या पठारासारख्या भूप्रदेशावर आली. उजवीकडे एक मोठा गोल कठडा दिसत

होता. आम्ही खाली उतरलो आणि कठड्यावरून खाली बघितले - Wow !

कठड्यापासून खाली सुमारे १००० फूट खोलीवर एका प्रचंड नैसर्गिक गोल कढईत (cauldron) अथांग निळाशार जलाशय पसरला होता, त्याचे नाव Crater Lake ! डोळ्यात भरून वाहणारी त्याची खासीयत होती तो निळा रंग. ६ मैल रुंद, २० मैल परीघ व पाण्याची खोली २००० फूट असणारा हा गोलाकार जलाशय विलक्षण तेजस्वी निळ्या रंगाचा होता. एव्हढा दाट निळाशार रंग पूर्वी कुठेच पहिला नव्हता. सूर्यप्रकाशात तो आकाशी दिसत होता, तर दूरवर झाडांच्या छायेत त्याचा रंग दाट मोरपंखी होता. निळ्या रंगाच्या अनेक मनोहर छटा वाऱ्याने उठणाऱ्या तरंगत खुलत होत्या. भान हरपून पाहत राहिलो… Wordsworth च्या अजरामर ओळी जिभेवर रेंगाळू लागल्या -

I looked and looked, but little thought
What wealth the show to me had brought !

त्या सुंदर, प्रचंड नीरव शांततेत मती कुंठित झाली होती, बुद्धी स्तब्ध झाली होती.

७८०० वर्षांपूर्वी ज्वालामुखीच्या स्फोटाने माझमा शिखराचे डोके उडून गेले. वारंवार झालेल्या स्फोटामुळे लाव्हा, खडक, धूळ उडून जाऊन एक खोल विवर (crater) तयार झाले. पाऊस, बर्फ त्यात साठून प्रचंड खोल तलाव तयार झाला. ज्वालामुखीच्या विवरातला तलाव म्हणून नाव पडले Crater

Lake. पाण्याची अथांग खोली व आतील घनदाट जंगल यामुळे हा विलक्षण मनोहर निळा रंग पाण्याला प्राप्त झाला आहे असे म्हणतात. पाण्याभोवती मोठा वर्तुळाकार घसरता कडा आहे. आत उतरता येत नाही, उतरू देतही नाहीत. वरून १००० फूट दूरीवरून, बांधीव कठड्यावरूनच पाहावे लागते. ४४०० वर्षांपूर्वी झालेल्या आणखी एका उद्रेकाने तळाचा थोडा भूप्रदेश वर आला व तलावात छोटेसे बेट निर्माण झाले. त्याचे नाव आहे Wizard Island. तलावाच्या भोवती गोल रस्ता आहे - Rim Road.

कितीतरी वेळ पाहिलं तरी तृप्ती होत नव्हती. दोन तास कठड्यावर वेगवेगळ्या ठिकाणी बसलो, जमेल तेव्हढे फिरलो, निळ्या रंगाला कॅमेऱ्यात साठवण्याचा प्रयास केला आणि शेवटी नाईलाजाने तलावाला ‘सायोनारा’  म्हणत परतीचा प्रवास धरला. परतताना २-३ ठिकाणी थांबून Rogue नदीचे विहंगम अवखळ पात्र पाहिले, पाण्यात हातपाय, तोंड धुवून घेतले आणि Medford मार्गे Ashland मध्ये शेक्सपियर महोत्सवासाठी आलो.

## Ocean Shores, Quinault

२६ जुलै, २००६, बुधवार

आधी ठरवल्यामुळे केट, मार्टी सकाळी ८:३० वाजता आपली गाडी घेऊन आले आणि आम्ही उभयता रश्मीला बरोबर घेऊन निघालो. १० वाजता आम्ही Fort Lewis या सैनिकी ठाण्यावर पोचलो. मार्टी अमेरिकन आरमाराचा निवृत्त अधिकारी (Veteran) असल्याने आम्हाला या संरक्षित ठिकाणी प्रवेश मिळाला. तिथल्या ड्युटी-फ्री, सवलतीच्या दराच्या दुकानात आम्ही थोडी खरेदी केली; केदारसाठी $१० चं wristwatch, रश्मीसाठी Hairbrush घेऊन आम्ही Pacific Beach Resort मध्ये दाखल झालो. Ocean Shores हे पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरील एक सुंदर लोकप्रिय स्थळ आहे. लांब, सुरक्षित किनारा; बारीक रेती व पायाशी लडिवाळपणे घुटमळणाऱ्या लाटा यामुळे बारमाही दर्याप्रेमींची इथे वहिवाट असते. हॉटेलच्या खिडकीतून थोडा वेळ सागराचे मनोहर दर्शन घेऊन गादीवर लवंडलो.

५:३० ते ६ मी व रश्मी दोघांनी हॉटेलच्या स्पाचा गरम पाण्याचा अंगभर शेक घेतला; खूप बरे वाटले. दरम्यान केट व मार्टी जवळच असलेल्या Aloha Reservation मध्ये Red Indian कुटुंबाशी आमची भेट ठरवायला गेले.

अमेरिकेचे मूळ रहिवासी Red Indians (कोलंबसने त्यांना दिलेले नाव) युरोपियन आक्रमणामुळे पराभूत झाले. ब्रिटिश, फ्रेंच, डच, स्पॅनिश या वसाहतवाल्यांनी अमेरिका पूर्वेकडून

(अटलांटिक महासागर) पश्चिमेकडे (पॅसिफिक महासागर) पादाक्रांत केली. Red Indians ना त्यांनी देशभर ठराविक ठिकाणी राहण्याच्या सर्व सोयीनीं युक्त अशा राखीव जागा - Reservations उपलब्ध करून दिली. त्यांच्यासाठी स्वस्त खाणेपिणे व भरपूर दारू मिळण्याची सोय केली. आयते ऐषारामी जीवन मिळाल्यामुळे अमेरिकेचे हे मालक वैर विसरले व आळशी जीवनात दंग झाले. केटचा काही रेड इंडिअन्सशी चांगला परिचय होता. मला त्यांना पाहायचे होते, भेटायचे होते, गप्पा मारायच्या होत्या, म्हणून ही भेट.

रात्री १०:३० वाजता टिपूर चांदण्यात आम्ही बीचवर एका वळणावर काही रेड इंडियन्स गिटार वाजवत व गात होते. आम्ही तेथे गेलो. केटने मर्लिन व तिचा पती यांच्याशी ओळख करून दिली. दोघेही आधुनिक अमेरिकन वेषात, इंग्लिशमध्ये व्यवस्थित बोलत होते. माझी थोडी निराशा झाली. अमेरिकेतील हे आदिवासी, चित्रामध्ये, सिनेमामध्ये पाहिल्याप्रमाणे ते अर्धावृत (half-naked), डोक्यावर उंच पिसांचे मुकुट घातलेले, उंच अशा त्यांच्या आकृती मी अपेक्षित होतो; पण हे तर निळ्या जीन्स व शर्ट घातलेले, अस्खलित इंग्लिशमध्ये बोलणारे आधुनिक अमेरिकन होते. त्यांच्याशी आम्ही गप्पा मारल्या. मी जी अपेक्षा केली तसे रेड इंडियन्स त्यांचे टोळी नायक असतात व वर्षातून १-२ वेळा त्यांचे अधिवेशन असते त्यावेळी ते या वेषात समारंभाने येतात. गरूडाची पिसे त्यांना पवित्र वाटतात व ही पिसे डोक्यावरील टोपीत खोचून ते समारंभात येतात. सर्व साधारण रेड इंडियन्स इतर अमेरिकन लोकांसारखेच शिकलेले आहेत व आपल्या वसाहतीत ते तसेच राहतात. Merlin व तिचा

पती आमच्याशी अतिशय सौजन्याने वागले, बोलले; आमच्या शंकांची उत्तरे मनमोकळेपणे दिली; bonfire करून थंडगार वाऱ्यात आम्हाला ऊब निर्माण करून दिली; गिटारवरील संगीत ऐकवले. थोडक्यात ते रेड इंडियन्स होते पण americanised होते. They were no doubt good-natured and polite. रात्री १:३० वाजता आम्ही खोलीवर परत आलो.

### २७ जुलै; गुरूवार

Merlin ने आज आणखी काही रेड इंडियन्सशी आमची भेट घडवून आणायचे ठरवले होते. त्याप्रमाणे Windjammer हॉटेलमध्ये ब्रेकफास्ट घेऊन आम्ही पाचजण Aloha Reservation (of Quinault Indian Nation) कडे गेलो. Fred, Merlin, Philip Merlin आणि आणखी ५-६ जण आमची वाट पाहत होते. आमच्या अपेक्षेतील एकही रेड इंडियन त्यांच्यात नव्हता; सर्व अमेरिकन होते. गप्पा मारल्या, त्यांची वसाहत फिरून पहिली. एका स्थळाने आम्हाला स्तंभित केले - Quinault नदीचा पॅसिफिक महासागराशी झालेला संगम ! आम्ही आतापर्यंत छोटे मोठे संगम पहिले होते; विवेकानंद स्मारकाजवळ अरबी समुद्र, बंगालचा उपसागर व हिंदी महासागर यांचा त्रिवेणी संगम अनुभवला होता. पण नदीचा महासागराशी संगम, हे एक अनोखे दृश्य होते. चालत चालत आम्ही नदीच्या मुखाशी गेलो. काही फूट अंतरावरून आम्ही ते मीलन पहिले. पॅसिफिक आडवा पसरलेला होता आणि विशाल Quinault त्याच्यामध्ये अलगद विलीन होत होती.

Philip ने खुलासा केला - रेड इंडियन्स पूर्णपणे अमेरिकन झाले आहेत. आपली संस्कृती, वेशभूषा, भाषा, पद्धती सर्व सोडून दिल्या आहेत. वर्षातून एकदा त्यांचे अधिवेशन भरते. त्या ठिकाणी ते पूर्वीचा वेष, खाणेपिणे, संस्कृती व्यक्त करतात; मिरवणुकीने फिरतात. त्यांचा राजा पूर्वीच्या सर्व थाटामाटात ३ दिवसभर राहतो. ऑगस्ट ५ ला पुढील वर्षी Auburn (Seattle चे उपनगर) मध्ये पुढील अधिवेशन भरणार आहे. आम्हाला त्यांनी अगत्याचे आमंत्रण दिले. निरोप घेऊन आम्ही हॉटेलवर आलो.

## Jasper National Park ( Alberta )

३१ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २००० हे सहा दिवस आम्ही माझे थोरले भाऊ व वहिनी Alberta मध्ये St. Albert येथे राहतात त्यांच्याकडे गेलो होतो. जवळच असलेल्या Edmonton या राजधानीच्या शहरात आम्ही दोन दिवस हिंडलो. तेथील West Edmonton Mall हा प्रचंड सुपरबझार पहिला. ८०० हून अधिक विविध वस्तूंची दुकाने, समुद्रासारखा बीच, लाटा असलेला विशाल swimming pool, roller coaster, giant wheel अशा अनेक साहसपूर्ण rides असलेला Fantasy Land ! पाणबुडी, Dolphin Show असलेला पाण्याचा प्रवाह, संबंध बाजारामध्ये मध्यभागी खेळवलेली अनेक प्रकारची कारंजी यांनी युक्त असा हा दोन मजली प्रचंड बझार एक मयसभाच होती. रोज ६-७ तास याप्रमाणे दोन दिवस पाहत होतो नुसते.

Edmonton सोडण्याच्या आधल्या दिवशी आम्ही सकाळी लवकरच उठून एका अविस्मरणीय ठिकाणाच्या भेटीस गेलो. भावाने मुद्दामच काहीही माहिती न देता ‘जरा थोडं फिरून येऊ ’ असं म्हणून आम्हाला बाहेर काढलं.

कॅनडाच्या पश्चिम आणि उत्तर भागात बर्फाचं साम्राज्य आहे. Rockies या पर्वतराजीतील शिखरे कायम बर्फाच्छादित असतात. वर्षभर साठलेला बर्फ उन्हाळ्यात थोडाफार ठिसूळ होतो आणि बर्फाचे कडे खाली कोसळून हिमनद्या ( glaciers ) वाहू लागतात. येथील सर्व शेकडो तलाव अशा हिमनद्यांपासून

तयार झालेले आहेत. अशा अनेक प्रचंड हिमनद्या या पर्वतात आहेत. त्यांचे दर्शन घडवणारा; जंगले, पर्वतातील सुंदर नागमोडी रस्ते, तलाव, बर्फाच्छादित शिखरे यांनी भरलेला एक सुप्रसिद्ध पार्क - Jasper National Park पाहायला आम्ही चाललो होतो. नावाचा बोर्ड पाहिल्यावर मग आमच्या लक्षात आलं आणि आम्ही उत्साहाने खिडकीच्या बाहेर पाहू लागलो. एक सुंदर छोटा धबधबा, Mt. Edith Kevil नावाचे पर्वतशिखर, हिमनदी व तलाव यांनी रोमहर्षक केलेले एक ठिकाण कायम लक्षात राहील असे होते.

दोन शिखरांच्या मधल्या पोकळीत प्रचंड बर्फ साठलेले होते. पूर्वी तेथील बर्फ वारंवार खाली कोसळून खाली एक मोठा तलाव तयार झाला होता. त्या तलावाचा पृष्ठभाग बर्फाच्या प्रचंड दगडांनी माखलेला होता. आजूबाजूला वितळलेल्या बर्फातून - पाण्यातून छोटीछोटी झुडुपं तोंड वर काढत होती. दरवर्षी बर्फाचा हा प्रचंड कडा खाली कोसळून सारा परिसर बर्फाखाली गाडला जाई व अल्पमुदतीच्या उन्हाळ्यात वितळलेल्या बर्फात ही झुडुपं तोंडं वर काढत. जीवनमरणाचा एक विलक्षण संघर्ष who wins या जिद्दीनं इथं चालला होता. समोर डोंगरावरला प्रचंड बर्फ मृत्यूसारखा 'आ' वासून खाली पडण्यासाठी आसुसला होता आणि खाली छोटीछोटी झुडुपे वाऱ्यावर डोलत होती - जिवंत, हसरी. एकाच दृष्टिक्षेपात जीवनमृत्यूचे हे साक्षात्कारी दर्शन विलक्षण प्रभावी आणि परिणामकारक होते. आम्ही थक्क होऊन ही savage beauty पाहत होतो. पाहवत नव्हतं तरी पाहत होतो - मंत्रमुग्ध होऊन, चुपचाप. आमच्या देखत कड्याचा एक भाग कडकड आवाज करीत खाली

कोसळला आणि त्यानं आम्हाला अद्‌भुत भयानक स्वप्नातून जागं केलं.

जातायेता ९०० किलोमीटर्सचा हा प्रवास सार्थकी वाटत होता. सकाळी ८ ला घराबाहेर पडलेलो आम्ही रात्री ९ ला घरी परत आलो. भारावलेले, शांत आणि विलक्षण संतुष्ट !

अल्बर्टामधे अजून पाहण्यासारखं खूप होतं - तेलाच्या, कोळशाच्या खाणी; वाळूतून तेल काढल्यानंतर राहिलेले रेतीचे प्रचंड ढीग; Calgary हे निसर्गसमृद्ध शहर; Lake Louis चा आठवडाभर झुलवणारा, भुलवणारा परिसर; ७ शिखरे आणि त्यांना कुशीत घेणारा विस्तृत निळाशार Leman Lake - सारा Rockies पर्वतच जागोजागी आपल्या भीषण सौंदर्याचं प्रदर्शन उघडून बसला होता - किती किती पाहाल ?!

# अमेरिकेतील काही छोट्या सहली

१९९६ ते २००२  या काळात आम्हा उभयतांच्या अमेरिकेला खूपच भेटी झाल्या. या कालावधीतच आमच्या आजूबाजूच्या प्रेक्षणीय स्थळांच्या सहली झाल्या आणि  त्या काळात आमचा मुक्काम Seattle येथे होता.

## स्पेस नीडल ( Space Needle )

१९६७ साली Seatlle  येथे जागतिक विज्ञान परिषद झाली. त्या निमित्ताने उभारलेले हे सुळक्यासारखे उंच टोकदार शिल्प Seattle चे  मानबिंदू (icon ) झाले आहे. इथे असणाऱ्या बऱ्याच संस्था उदा. महाराष्ट्र मंडळ आपल्या कागदोपत्री  व पत्रव्यवहारात या चिन्हाचा बिरुद म्हणून गौरवाने उल्लेख करतात. या शिल्पाजवळ असलेले पॅसिफिक सेंटर, विज्ञान परिषदेसाठी सुरू केलेली मोनोरेल व नंतर उभारलेले I-max theatre  या सर्वांचे हे  एकत्रित पर्यटन स्थळ झाले आहे. शनिवारी-रविवारी पर्यटकांची व शाळेतील विद्यार्थ्यांची येथे एक दिवशी वनभोजना सारखी (पिकनिक) गर्दी असते. बऱ्याच  वेळी आम्ही इथे ज्ञान व करमणूक यांचा एकत्रित आनंद घेतला आहे.

सकाळी 520 Freeway ने DownTown Seattle मध्ये यायचे, पहिली भेट Space Needle ला, लिफ्टने वर  जायचे, वरच्या १० पायऱ्या  चढून गेल्यावर गोलाकार मंचावर जायचे, आजूबाजूचा सिएटल नगरीचा व प्रशांत महासागराचा विहंगम

आसमंत पहायचा, अर्ध्या-पाऊण तासानंतर खाली उतरायचे. पॅसिफिक सेंटरमधील वैज्ञानिक गमतीजमती, प्रदर्शने पहायची, शेजारीच असलेल्या म्युझिकल फाऊंटनचे संगीत व तुषार ऐकत, अंगावर घेत बसायचे, आजूबाजूच्या स्टॉल्सवरून खाण्याच्या वस्तू आणून लंच करायचे असा पहिला अर्धा अंक (first half) घालवायचा. अमेरिकेतील प्रत्येक पर्यटन स्थळी पुरेसे चौकोनी टेबल-खुर्च्या सेट असतात. जिथे बसून खाता पिता येते, Use Me कचरा पेटीत कचरा टाकता येतो. पाण्याच्या व प्रसाधनाच्या सुविधा सहज उपलब्ध असतात. त्यामुळे या एक दिवशी सहली विनाकष्ट, आनंददायी होतात. आम्ही प्रत्येक वेळी ४ वाजता I-Max थिएटरमधला सिनेमा पाहून सहलीचा समारोप करत असू. काही वेळा मोनोरेलमध्ये फिरायचे, कधीतरी जवळच्या Pier मार्केटमध्ये फेरफटका मारायचा. या मार्केटमध्ये स्थानिक कलावंतांची पेंटिंग्स, धातूच्या कलाकृती पहात हिंडायचे, आवडल्यास भारतीय पद्धतीने किमतीचा सौदा करायचा, पटलं तर घ्यायचं, नाही तर पुढे सरकायचे. रात्री ८-८.३० पर्यंत घरी यायचं. पाहिलेल्या गोष्टींवर गप्पा मारायच्या आणि झोपायचं. अमेरिकेत शनि-रवी सुट्टी असल्यामुळे बहुतेक दर शनिवारी-रविवारी आम्ही आटोपशीर सहलीला जात असू. त्यात अन्य काही पर्याय नसल्यास Space Needle सर्वमान्य पर्याय असे.

## **माऊंट रेनियर ( Mt Rainier )**

Seattle ला दुसरा एक दिवस सहलीचा सहज सुलभ पर्याय म्हणजे माउंट रेनियर. हे रॉकीजमधले १५००० फूट उंच असलेले पर्वत शिखर Seattle चा दुसरा मोठा landmark आहे. त्याच्या सदैव बर्फाच्छादित शिखराचे दर्शन सिऍटल मध्ये कुठूनही होते. उन्हात चमकणाऱ्या त्याच्या बर्फाच्छादित टोकामुळे लोक त्याला लोण्याचा गोळा म्हणतात. शहरापासून केवळ ८० मैल दूर असलेले पर्यटनस्थळ सिएटल-वासियांचे खूप लाडके आहे. शहरातील शौकीन युवक-युवती दर रविवारी या शिखराची वर चढून सफर करतात.

आम्ही दोघांनी ४/५ वेळा या पर्वताची सहल केली आहे. त्यापैकी दोन लक्षात आहेत - एक चौधरी जोडप्याबरोबर, दुसरी अभय व सीमा यांच्याबरोबर. आम्ही पहिली सहल केली नेहमीच्या रस्त्याने, आम्ही वर चढलो जाताना नारद धबधबा (हो आपले नारदमुनी ) पाहिला, आपल्याकडील गोकाक धबधब्याइतकी त्याची उंची आहे पण रुंदी जेमतेम १०० फूट आहे. चढत चढत आम्ही Paradise Point पर्यंत गेलो. तिथून पुढे चढ अवघडच आहे. तिथे असलेल्या हॉटेलमध्ये आम्ही जेवण घेतले, हिरवळीवर आडवे पडलो. ४ वाजता आम्ही पार्किंगपाशी आलो आणि संध्याकाळी ६.३० वाजता घरी आलो. ही आमची सहल १९९६ साली केव्हातरी झाली.

९ ऑक्टोबर २०१४ रोजी झालेली आमची रेनियरची सहल सर्वात रोमहर्षक झाली. आमची थोरली कन्या सीमा सिऍटलला आली होती. आम्ही दोघे, ती व अभय असे चौघेजण आम्ही सकाळी ९.३० वाजता अभयच्या होंडाने निघालो. नेहमीच्या

पायथ्याच्या, Paradise पॉईंट जवळ गेलो तर कळले की नेहमीचा रस्ता काही कारणाने बंद होता. नारद आमच्यावर रुसला होता. पण अभयने रेनिअरच्या पाठीमागे Sunrise पॉईंटवर आम्हाला नेले. रस्ता वळणावळणाचा घनदाट जंगलातून बराच लांब - दोन तासाचा - होता. Sunrise पॉइंट वर पोचलो आणि जो देखावा पाहिला त्यांनी आमच्या डोळ्याचे पारणे फिटले. Sunrise पॉइंट एखाद्या पठारा सारखा, पर्वताच्या पाठीमागे प्रेक्षणीय पॉईंट होता. आम्ही गाडीतून उतरलो आणि थक्क होऊन पाहत राहिलो. शिखर बर्फानी लहडलेले, त्याच्यावरून हिमनद्या पर्वताच्या खाचामधून मार्ग काढीत खाली येत होत्या. वरचे जाड शिखर दाट गोठलेल्या बर्फाने उन्हांत तळपत होते. शिखराचा सर्व उंच रुंद भाग इतका जवळ दिसत होता की जणू तो लक्ष्मी रोडवर दगडूशेठ हलवाई मंदिराजवळच होता. पर्वत आणि आमच्यामध्ये एक रुंद खोल दरी होती आणि लगेच पलीकडे रेनियर स्वच्छ स्पष्ट सुंदर उन्हात तळपत असलेला; पर्वताचा तो जाडजूड आकार इतक्या नजिकच्या सान्निध्यात कधी पहायला मिळेल असे स्वप्नातही वाटले नव्हते, आम्ही दिग्मूढ होऊन पहातच राहिलो. सनराइज् पॉइंट दरीने वेढलेला होता. एका बाजूला एक प्रशस्त निळाशार तलाव होता. भीती वाटावी असा रौद्र सुंदर देखावा पाहवतही नव्हता आणि डोळ्यात साठवावा असे वाटत होते. पॉईंटच्या आजूबाजूला स्वैर फिरून तो अभूतपूर्व सोहळा आम्ही पाहतच होतो. शनिवार रविवार नसल्याने आम्हा चौघांशिवाय शिवाय दुसरे कोणीच नव्हते. खूप चाललो, दमलो. एका सपाट टेकाडावर बसून घरून आणलेली सँडविचेस खाल्ली. तो विस्तृत देखावा (panorama) पाहून आमचे डोळे निवले, शिणलेली

गात्रे विसावली. एक अविस्मरणीय अनुभव हृदयात साठवून - एवढे प्रचंड उंच पर्वत शिखर एवढ्या जवळून पाहण्याचा - आम्ही चौघेही मूक स्तब्ध होऊन गाडीत बसलो, परत परत खिडकीतून तो नजारा न्याहाळत, त्या पठारावर आम्ही १.३० तास होतो.

रेनियरचा माथा शंकूसारखा टोकदार नाही, एखाद्या उपड्या बाउलसारखा अर्धगोल आहे. एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे बहुतांश गिर्यारोहक सुरुवातीचा सराव रेनियरवर किंवा आफ्रिकेतील किलिमंजारो शिखरावर करतात. रेनियर हा निद्रिस्त ज्वालामुखी आहे, मृत नाही, किंबहुना Cascade पर्वताची सर्व रांग भूकंप व ज्वालामुखी-प्रवण आहे.

### Snowkalmie Falls (धबधबा)

सिएटल पासून ४० मैलावर असलेला स्नोकलमी धबधबा एका दिवसाच्या सहलीसाठी एक आकर्षक पर्यटन स्थळ आहे. प्रख्यात नायगारा धबधब्या पेक्षा हा धबधबा उंच आहे. आपल्या कडील जोगच्या उंचीचा असू शकेल. ५/६ वेळा तरी आम्ही या स्थळाला भेट दिली असावी.

पहिल्यांदा आम्ही सर्व गेलो त्यावेळी आमचा ६ महिन्यांचा नातू सारंग अजून चालायला लागला नव्हता. त्याला बाबा गाडीतून नेले होते. वसंत ऋतूची नुकतीच सुरुवात होती. हवेत गारवा बराच होता. त्याला ब्लँकेट स्वेटरमध्ये चांगला लपेटला होता.

आम्ही गाडीतून उतरून धबधब्याजवळ गेलो. नदीचा प्रवाह धो धो करीत खालच्या फत्तरावर आपटल्यानंतर तुषार बरेच वर उसळत होते, वारा वाहात असताना तुषार वरपर्यंत अंगावर येत होते. शेजारी एक पायवाट खाली धबधब्यापर्यंत जाण्यासाठी होती, आम्ही निम्मे अंतर गेलो, आणि सारंग त्या थंडीने घाबरा झाला. मग आम्ही परत वर आलो. गाड्या बऱ्याच लागल्या होत्या. रविवार असल्यामुळे गर्दी बरीच होती. आम्ही झटकन गाडीत बसलो, हीटर ऑन केला, थोड्यावेळात सारंग नॉर्मल झाला. आम्ही बरोबर आणलेली सँडविचेस पार्किंगमध्ये बसून खाल्ली, वाटेत Starbucks कॉफ़ी घेतली आणि घरी आलो.

त्यानंतर आम्ही बऱ्याच वेळा स्नोकलमीला भेट दिली.आरामात धबधब्याचे, सर्वांगीण, सर्व सोईस्कर पॉईंट्स पाहून त्याचा आस्वाद घेतला. पायवाटेने तळाशी गेलो. एवढी मोठी पाणीदार नदी खाली आल्यावर २-३ प्रवाहाने शांतपणे पुढे वाहत होती. धबधब्याचे रौद्र स्वरूप शांत शालीन प्रवाहांत रूपांतरित झाले होते. आता सारंग मोठा झाला असल्यामुळे आमचे बोट पकडून कठड्यापर्यंत येऊन धबधब्याचा आनंद लुटत होता. प्रत्येक वेळी आम्ही दिवसाचा बराच वेळ व्यतीत करत होतो. आम्ही दोघे निसर्गप्रेमी असल्याने आम्हाला हे स्थळ खूप आवडले होते. या धबधब्याजवळ आणखी एक आकर्षण होते: Snowqualmie pass (खिंड). Fall City नंतर थोड्या अंतरावर ही खिंड सुरू होते. एरव्ही खिंड हा २ डोंगरांमधील छोटा रस्त्याचा भाग असतो, पण इथे चक्क १२ मैल दोन्ही बाजूच्या उंच कड्यांमधून वाकडी वळणे घेत रस्ता जात होता. डोंगरावर दोन्ही बाजूला दाट सूचीपर्णी जंगले आहेत. ऑक्टोबर

ते मार्च ही जंगले बर्फाने आच्छादलेली असतात. गाडीतून उतरून खिंडीच्या टोकावर थांबून तो रौद्र सुंदर देखावा मोठा आकर्षक असतो. आम्हा दोघांचे हे सहलीचे अतिशय आवडते ठिकाण आहे.

२०१४ मध्ये आमच्या आत्तापर्यंतच्या शेवटच्या सिएटल भेटीत आम्ही परत एकदा इथे आलो. सर्व सौंदर्य आरामात थांबत थांबत परत एकदा अंतकरणात, स्मृतीत भरून घेतले. या खेपेला आमची थोरली कन्या प्रथमच आमच्याबरोबर होती. आमची तिन्ही मुले सीमा, अभय, व अंजली आमच्याबरोबर असल्याने या भेटीला एक आगळेच महत्व आले होते. खात, पीत, गप्पा मारत, इतर धबधब्यांच्या आठवणी काढत आम्ही हे सौंदर्य डोळ्यांनी प्यालो. वार्धक्यामुळे आता अमेरिका प्रवास अवघड झाला आहे, पण यदाकदाचित सिऍटलला आलो तर ही सर्व एक-दिवसाची सहलीची ठिकाणं परत आणखी एकदा नक्कीच पाहू.

## व्रजभूमी

मथुरा - वृंदावन - गोकुळ परिसर

वयाच्या १२-१३ व्या वर्षी मी द्वारकेला आई - अण्णाबरोबर गेले होते. भगवान श्रीकृष्णाच्या उत्तर आयुष्यातील वैभव द्वारकेने मला दाखवले. श्रीकृष्णाबद्दल गुजरातमध्ये खूपच भक्तीचे वातावरण आहे. डाकोरच्या रणछोडरायामुळे व माझ्या आजूबाजूच्या गुजराती लोकांच्या कृष्णभक्तीमुळे मला कृष्णाबद्दल खूप कुतूहल होते. त्या कुतूहलाचे भक्तीत केव्हा रूपांतर झाले मला कळलेच नाही.

द्वारकेच्या भेटीनंतर व डोंगरे महाराजांच्या भागवत श्रवणानंतर मला श्रीकृष्णाच्या बाललीलांबद्दल खूप उत्सुकता निर्माण झाली व या बाललीला ज्या भूमीने पाहिल्या त्या मथुरा - वृंदावन - गोकुळ या व्रजभूमीचे मला खूपच आकर्षण वाटू लागले. तो परिसर स्वतःच्या डोळ्यांनी पाहावा; तो यमुनेचा प्रवाह, जिच्या काठावर गाईबैलांना गावात चारा चारताना कृष्णाने गोपाळ सवंगड्यांना प्रेम दिले; त्या यमुनेच्या काठच्या वृंदावनाने श्रीकृष्णाची बासरी ऐकली; त्याची गोपींबरोबरची रासलीला पहिली; कंसाने त्याच्या पारिपत्यासाठी पाठवलेल्या पुतना, कालिया आणि अनेक असुरांचा कृष्णाने केलेला नायनाट पहिला; गोपींना ज्ञान शिकवण्यास आलेल्या उद्धवाचा गोपींच्या करवी झालेला पराभव पहिला; अक्रूराबरोबर कृष्ण बलरामाचा त्या परिसराला दिलेला कायमचा निरोप पहिला; ती व्रजभूमी - अनेक रोमहर्षक प्रसंगांची साक्षीदार व्रजभूमी पाहण्याची माझी उत्कंठा वाढतच गेली.

लग्नानंतर महाराष्ट्रात ही उत्कंठा हृदयाशी बाळगून मी आले. उत्तर हिंदुस्तानच्या आमच्या बऱ्याच सहली झाल्या. १९७२ मध्ये कॉलेजची २० दिवसांची काश्मीर - दिल्ली - आग्रा सहल झाली. १९८६ मध्ये २६ दिवसांची चारधाम - काशी - प्रयाग - गया - नेपाळची दीर्घ सहल झाली. २००५ मध्ये सिमला - कुलू - मनाली ही देवभूमी सहल झाली. पण या सर्व सहलींनी मथुरा, वृंदावनना बगल दिली. अयोध्येची रामजन्मभूमी पहिली. अगदी सोनेरी त्रिकोण म्हणून गाजलेली आग्रा - दिल्ली - जयपूर सहल सुद्धा व्रजभूमीचा अंतर्भाव करत नव्हती. दरम्यान श्रीमद्भगवद्गीतेच्या व ज्ञानेश्वरीच्या अध्ययन, अभ्यासाने माझी ही उत्कंठा पराकोटीला पोचली. मुद्दाम गेल्याशिवाय ती बाळकृष्णाची जन्मभूमी मला दिसणार नव्हती. शेवटी परवा ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबरला तो योग आला. आमची बडोदे भेट ठरली व त्याच दरम्यान आम्ही व्रजभूमी भेट निश्चित केली. राजधानी एक्सप्रेसचे दोन्ही वेळचे; ३ दिवसांचे मथुरेतील हॉटेल निवासाचे अशी सर्व आरक्षणे श्री ट्रॅव्हल्सकडून निश्चित केली. आमची मुलगी सौ. सीमा व नात मधुरा आमच्याबरोबर यायला तयार झाल्या व उत्सुकतेने माझी झोप उडाली. २ ऑक्टोबरला बडोद्याला व ३१ ऑक्टोबरला आम्ही उभयता मथुरेला प्रयाण केले, रात्री १०:४५ वाजता. राजधानी एक्सप्रेसचा पाहुणचार, आरामदायक A.C. प्रवास व तुफान वेग यांचा प्रसन्न अनुभव घेऊन १ नोव्हेंबरला सकाळी ९ वाजता आम्ही मथुरा स्टेशनवर व अर्ध्या तासात आमच्या आलिशान ३-स्टार ‘व्रजवासी रॉयल’ या हॉटेलमध्ये पोचलो.

### १ नोव्हेंबर २००५

जेवण व वामकुक्षी घेऊन आम्ही रिक्षाने ४ वाजता भगवान श्रीकृष्ण जन्मस्थान मंदिरात पोचलो. मंदिर प्रशस्त, खूप विशाल, मोठ्या इमारती व भरपूर मोकळी जागा यांनी भरले होते. ज्येष्ठ नागरिकांची वेगळी, स्त्रियांची वेगळी, इतरांची वेगळी अशा वेगवेगळ्या रांगांतील आपली रांग निवडून; मोबाइल, पर्स, कॅमेरा, चार्जर अशा वेगवेगळ्या विविध वस्तू बाहेर ठेवून, फक्त पैसे व भक्तियुक्त अंतःकरण बरोबर घेऊन सर्पासारख्या रांगांतून आम्ही प्रवेश मिळवला. खुद्द जन्मस्थान खूप आत, एका बोळकंडीतून, अंधारातून मार्ग काढीत शोधावे लागले. बाळकृष्णाची एक छोटी तसबीर एका दगडी जागेवर होती आणि तेच मंदिर ! त्या जागेला अजूनही कारागृहाची कळा होती; गूढता, भिंतींचा दाट काळेपणा व असूर्यपश्या खोलीची भयाण शांतता. जाड काळ्या दगडी भिंतींनी अंधार आणि गूढता यांत भर पडली होती. सावली गोपुराची किंवा शिखराची नव्हती, तर एका भव्य मशिदीच्या घुमटाची होती. अयोध्येच्या रामजन्मभूमीला बाबरी मशिदीने तर इथे कृष्ण जन्मभूमीला अशाच एका विशाल मशिदीने झाकले होते. ४०० वर्षांपूर्वी मोगल बादशहाने बांधलेल्या या मशिदीचे सोयरसुतक आत्तापर्यंत कोणत्याही राज्यकर्त्याला वाटले नाही व पुढे वाटेल असे वाटत नाही. कृष्ण जन्मस्थानाच्या भेटीच्या आनंदापेक्षा ही विषण्णताच मनात घेऊन आम्ही बाहेर पडलो.

ISCON चे प्रचंड कृष्णमंदिर त्यांच्या जगभरातील इतर मंदिरांपेक्षा अधिक श्रीमंत आणि आकर्षक होते. गोरे कृष्णभक्त हरे कृष्ण हरे रामचा जप करत सर्वत्र फिरत होते. एका छोट्या

बोगदेवजा गुहेत श्रीकृष्णाच्या बालवयातील पूतनावध, कालियामर्दन वगैरे प्रसंग मातीच्या आकृतीद्वारे साकार केलेले होते. २ तास मंदिराच्या परिसरात घालवून संध्याकाळी ६:३० वाजता आम्ही बाहेर पडलो. पौर्णिमा असल्यामुळे सगळीकडे तोबा गर्दी होती व रांगेत उभे राहिल्याशिवाय कुठेही प्रवेश मिळत नव्हता. भटकता भटकता काळोख झाला. हॉटेल मॅनेजरच्या मदतीने दुसऱ्या दिवशी पाहण्याची सर्व ठिकाणे ठरवून व सकाळी ७ वाजता एक भाड्याची गाडी ठरवून आम्ही जेवलो व निद्राधीन झालो.

### २ नोव्हेंबर २००५ सोमवार

सकाळी ६:३० वाजता आम्ही चौघे खाली आलो. हॉटेलची Complimentary रुचकर न्याहारी घेतली. आमच्या टाटा इंडिकाचा ड्रायव्हर धरमसिंह उत्साही तरुण माहितगार होता. प्रत्येक स्थळाच्या भेटीपूर्वी त्याची पार्श्वभूमी, त्याचे महत्व व घ्यावयाच्या काळजीच्या सूचना देत होता. पहिले ठिकाण होते वृंदावन. मथुरेचे ते आता उपनगर झाले होते, व आधुनिक प्रगतीच्या खाणाखुणा जागोजागी दाखवत होते. मथुरा सोडताच आम्हाला ४ मोठ्या गोशाळा दिसल्या. प्रत्येकीमध्ये शेकडो गायी व त्यांची वासरे व सभोवती विशाल गवताची कुरणे होती. वृंदावनमध्ये, किंबहुना सर्व व्रजभूमी परिसरामध्ये गायींना अभयदान होते. त्यांच्यासाठी चारा, निवास, संरक्षण यांची परिपूर्ण सोय होती. कोट्यवधी रुपयांच्या देणग्या त्यासाठी मिळत होत्या व त्यांचा योग्य विनियोगही होत होता. मुस्लिम,

खाटीकखाना व राजकारणी शक्तीचा भ्रष्टाचार तिथे पोचला नव्हता.

गोशाळा मागे टाकून आम्ही वृंदावनात प्रवेश केला. वृंदावनाचा आतील भाग मंदिरांनी, जुन्या वाड्यांनी, छोट्या छोट्या गल्ल्यांनी व्यापला होता. वृंदावन बरेच मोठे, विकसित झाले होते, पण मूळ जुने वृंदावन गर्दी, नवीन हातगाड्या, त्यातच मोठ्या, जुन्या हवेल्या, छोटी जुनी घरे आणि गल्लीवजा अरुंद रस्ते यांनी आपले मूळ स्वरूप टिकवून होते. मंदिरे बरीच होती. व्रजभूमी परिसरात छोटी मोठी एकूण ५५०० मंदिरे आहेत. त्यातली मोजकीच पाहण्यासारखी आहेत. ही मंदिरे खाजगी, श्रीमंत जमीनदारांच्या हवेलीत स्थानापन्न झालेली आहेत. दगडी, भव्य, प्रशस्त व भगवान श्रीकृष्णाच्या मूर्ती विविध आकाराच्या आहेत. बिर्ला मंदिर त्यांच्या लौकिकाप्रमाणे आलिशान, भव्य, श्रीमंत, संगमरवरी बांधकाम असलेले, भिंतीवर गीतेतील श्लोक कोरलेले असे आहे. राधावल्लभ मंदिर मूळचे उंच, अनेक मजली पण औरंगजेबाच्या रोषाला बळी पडल्यामुळे फक्त खालच्या ओट्यापर्यंतच उध्वस्त अवस्थेत आहे. या मंदिरातील कोरीव काम भग्न अवस्थेतसुद्धा मन मोहित करते. गोविंद देव मंदिर १५९० साली जयपूरच्या मानसिंग राजाने बांधलेले, भारतीय स्थापत्यशास्त्राचा अप्रतिम नमुना आहे. ७ मजली मंदिराचे वरील ४ मजले औरंगजेबाच्या द्वेषाला बळी पडले. मंदिराच्या १० फूट जाड भिंती लाल दगडाच्या आहेत. वृंदावन मधील हे सर्वांत सुंदर मंदिर आहे. मंदिराच्या परिसरातील गोविंदकुण्ड व ब्रम्हाकुण्ड हे दोन तलाव अतिशय पवित्र मानले जातात. रंगजी मंदिर हे असेच एक सुंदर स्थान आहे. बाहेरील ४

प्रवेशद्वारे जयपूर धर्तीवर, जाळीच्या बारीक कोरीव कामाने आकर्षक वाटतात. तर आतील ७ प्रवेशद्वारे दक्षिण भारतीय धर्तीची आहेत. अतिशय भव्य, प्रशस्त व भगवान बालाजीची रेखीव मूर्ती ही या मंदिराची वैशिष्ट्ये आहेत. मंदिराच्या खांबांवर कोरलेल्या आकृती विलक्षण रेखीव आहेत.

वृंदावनमधील सर्वात उल्लेखनीय ठिकाण म्हणजे विधीवन - श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचे स्थान. सुमारे १००’ X १००’ क्षेत्रफळाचे गोलसर हे एक छोटे अरण्य आहे. १०’ ते १२’ उंचीची झाडे बहुतेक एकाच जातीची आहेत. त्यांचे हे दाट वन आहे; आत छोट्या पायवाटा आहेत. विधीवनात अजूनही रात्री ८:३० नंतर श्रीकृष्ण गोपींसह रासक्रीडा खेळतात असा प्रवाद आहे. त्यामुळे ८:३० नंतर कोणालाही वनात प्रवेश नाही. एखादा चुकून आत राहिला तर दुसऱ्या दिवशी त्याचे प्रेत सापडते. दोन इंग्लिश लोकांनी श्रीकृष्णाची रासलीला चोरून पाहिली; दुसऱ्या दिवशी ते ठार वेड्या अवस्थेत सापडले. या वनात दिवसा हिंडताना चष्मा किंवा गॉगल घालणे धोक्याचे आहे. अनिर्बंध विहार करणाऱ्या माकडांना त्याचे मोठे आकर्षण वाटते. तुमचा चष्मा केव्हा एखाद्या माकडाच्या डोळ्यांवर चढला असेल हे तुम्हालाही कळणार नाही. धरमसिंहाने आधीच आम्हाला या संकटाची सूचना दिली होती म्हणून माझा चष्मा वाचला. या वनातील बांकेबिहारी ( Bending Lord Krishna ) ची मूर्ती पुढे प्रभुपाद स्वामी यांना मिळाली व त्यांच्या भक्तांनी त्या मूर्तीची ‘बांकेबिहारी’ मंदिरात स्थापना केली.

'विधीविना' बरोबरच आमची वृंदावनाची भेट संपली. वृंदावनातून बाहेर पडण्यापूर्वी एका माहितीची दाखल घेणे आवश्यक आहे. आपण सर्व भगवान श्रीकृष्णाच्या बाललीला गोकुळात व त्याच्या नजीक असलेल्या वृंदावनात झाल्या असे समजतो; वस्तुस्थिती तशी नाही. वृंदावन आपण समजतो तितके गोकुळाच्या निकट नाही. मथुरा, वृंदावन यमुनेच्या एका काठावर आहेत तर गोकुळ परिसर दुसऱ्या काठावर आहे. यमुना नदी मथुरा, वृंदावन यांना कवेत घेऊन वळणे घेत वाहत राहते. तिचे पात्र खूप रुंद आहे असे म्हणतात. पूर्वीपेक्षा तिचा प्रवाह खूप बदलला आहे. बाळकृष्ण ८-१० वर्षांचा होईपर्यंत कंसाच्या पूतना, केशी, राक्षस, कालिया यांच्या कारवायांचा नंद व गोकुळवासीयांना खूप त्रास झाला. श्रीकृष्णाच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी गोकुळ सोडले व मथुरेपासून २५ कि. मी. अंतरावरील एका टेकडीच्या परिसरात मुक्काम हलवला. त्या स्थळाला नाव पडले नंदगाव. टेकडीवर नंद, बलराम व बाळकृष्ण यांचे मंदिर आहे. बऱ्याच पायऱ्या चढून वर जावे लागते. एका स्थानिक ब्राम्हणाने अनाहूतपणे आमच्या गाईडची भूमिका घेतली व वरच्या गच्चीतून श्रीकृष्णाच्या बालपणाचे राधाकुंड, हरीकुंड, गायी चरण्याचा परिसर असे बरेच टप्पे दाखवले. टेकडीच्या आजूबाजूला मातीच्या, सिमेंटच्या बऱ्याच घरांची वस्ती झाली आहे. वृंदावन सोडल्यानंतर एका बांधकाम चालू असलेल्या Flyover ला वळण घालून आग्रा - दिल्ली Highway वर २५ कि.मी. प्रवास केल्यानंतर एका कच्च्या रस्त्याला आम्हाला नंदगाव भेटले. तिथे प्रेक्षणीय काहीच नव्हते; फक्त स्थानमाहात्म्य !

त्यानंतर आम्ही थांबलो बरसाना येथे, मथुरेहून २५ कि.मी. अंतरावर. हे होते आणखी एक टेकडीवरील व टेकडीभोवती वसलेले गाव. टेकडी बरीच उंच होती व पायऱ्या अवघड होत्या. त्यामुळे डोलीचा उपयोग करून आम्ही दोघे वर गेलो. वर होते एक राधाराणीचे सुंदर मंदिर. बरसाना हे राधेचे जन्मगाव. वृषसेन या राजाची कन्या राधा ही विवाहीत होती. अनय नावाचा तिचा पती होता याचा कुठेच उल्लेख होत नव्हता. किंबहुना राधा ही गांधर्व विवाहाने श्रीकृष्णाशी परिणीत झाली होती अशीच सर्वमान्य भावना होती. ती त्याची राणी होती असाच तिचा थाट होता व वृंदावन हे त्यांच्या रासलीलेचे स्थान होते, असा सर्वदूर सर्वमान्य भाव होता. व्रजभूमीमध्ये कृष्णाला कोणीच आवाहन करत नाही. सगळीकडे ‘राधे राधे’ असा घोष चाललेला असतो. राधेच्या मागे कृष्ण आपोआप येतो अशी व्रजवासीयांची श्रद्धा आहे.

व्रजभूमीमध्ये प्रत्येक मंदिरात देवदर्शनाच्या ठराविक वेळा आहेत. इतर वेळी देव पडद्याआड असतात. राधाराणीच्या दर्शनासाठी आम्हाला थोडा वेळ थांबावे लागले. राधाकृष्णाच्या मूर्ती छान आकर्षक होत्या. इथेही टेकडीच्या गच्चीवरून व्रजभूमीचा झाडांनी गजबजलेला परिसर हिरवागार, रम्य दिसत होता.

एव्हाना दोन वाजले होते. पोटात कावळे ओरडायला लागले होते. पण धरमसिंहाने ‘अर्धा तास कळ काढा, पुढे गोवर्धनात छान जेवण मिळेल’ असे गाजर पुढे धरल्याने आम्ही फक्त चहा घेऊन आगेकूच केले. १५ कि.मी. वर गोवर्धन आले.

धरमसिंग मंदिरापाशी आम्हाला सोडून गाडी पार्क करायला गेला. सर्व मंदिरच व मूर्ती रस्त्याच्या पातळीच्या खाली होत्या व पायऱ्या चिखलमय होत्या, त्यामुळे आम्ही वरूनच दर्शन घेतले. शेजारच्या एका भक्ताला 'गोवर्धन पर्वत कुठे आहे' असे विचारताच त्याने रस्त्याच्या पलीकडील भागाकडे बोट केले. आम्ही रस्ता ओलांडून पलीकडे गेलो. पलीकडे एखादा उंच डोंगर, कमीतकमी एखादी टेकडी, उंचवटा दिसतो का ते पाहू लागलो. आजूबाजूला पर्वत, डोंगर सोडा, साधे टेकाड, चढही दिसत नव्हता. आजूबाजूचा परिसर खडबडीत, शेतातल्या ढोकळ्यांनी भरलेला होता. जवळून जाणाऱ्या एका पोरसवदा माणसाला आम्ही गोवर्धनाचा ठिकाणा विचारला. त्याने दिलेल्या उत्तराने आम्ही स्तंभित झालो. 'हे काय, तुम्ही उभे राहिला आहेत तोच गोवर्धन पर्वत' ! बहुतेक एव्हढ्या वर्षांनंतर गोवर्धन हळूहळू बुटका होत होत जमीनदोस्त झाला होता. कालाय तस्मै नमः ! आजूबाजूला बरीच गर्दी होती. त्यातले बरेचजण गोवर्धनाला ३ कि.मी. ची प्रदक्षिणा घालत होते.

आम्ही चक्रावून रस्त्यावर परत आलो. गाडी शोधत पुढे आलो तर डाव्या बाजूला 'वैष्णव शाकाहारी भोजनालयाचा' बोर्ड दिसला. धरमसिंगही आमच्यात सहभागी झाला. आम्ही तेथे जेवण घेतले - साधे, स्वच्छ, रुचकर, पोटभर, गरमगरम - ताजे दही तर भरपूर आणि चवदार होते. वाढपी वाढण्यात हात आखडता घेत नव्हता. या अगत्यशील जेवणाने आम्ही संतुष्ट झालो. पैसे देऊ केले, त्यांनी हात जोडून नाकारले. गोवर्धन भेटीबरोबर आमचा यमुनेच्या एका काठावरील प्रेक्षणीय भाग संपला होता. आता राहिले होते गोकुळ ! आतापर्यंत आमच्या

हिंडण्यात यमुनामाई कुठेच आल्या नव्हत्या. त्यांना पाहायला आम्ही उत्सुक होतो.

४ वाजले आणि मथुरेला बाजूला टाकून ‘बायपास’ रस्त्याने आम्ही दिल्ली - आग्रा हायवेवर आलो. गोकुळ १५ कि.मी. अंतरावर होते. हायवे सोडून गोकुळ रस्ता घेतला. यमुना आली पण तिच्यावरील बंधाऱ्यामुळे ( Barrage ) तिच्या विस्तृत प्रवाहाचे दर्शन झालेच नाही. धरणातून बाहेर पडलेली एखाद्या ओहोळासारखी झालेली यमुना खिन्न करून गेली.

सुरवातीस आली रमण रेती. एका मंदिराजवळ बारीक रेतीचा लांबरुंद पट्टा होता. पुरात यमुना या पट्ट्यावर येते व तिच्या रेतीचा आणखी एक थर त्या पट्ट्यावर ठेवून जाते. या रेतीमध्ये बाळकृष्ण खूप लोळला होता. भगवंताचा स्पर्श झालेल्या रेतीत आजही त्याचे भक्त लोळतात; अगदी गडबडा लोळतात. वेड्यांना उमगत नाही - भगवंताचा स्पर्श झालेली रेती एकतर इतक्या वर्षांच्या पुरात वाहून गेली असेल किंवा शेकडो थरांच्या खाली लुप्त झाली असेल - पण मग भक्ती कशाला म्हणायचे ? आम्ही लोळलो नाही पण थोडीशी रेती प्लास्टिक पिशवीत भरून घेतली.

इथे गाईडच्या रूपाने एक शार्क आम्हाला अनाहूत चिकटला. त्यावेळी कळले नाही पण त्यानंतर ज्यावेळी आमची पर्स रिकामी झाली, त्यावेळी आम्हाला उमगले की तो एक हुशार, लुच्चा पंड्या होता.

१० मिनिटांनी गोकुळ आले. अतिउत्कट श्रद्धाभाव उराशी बाळगून आम्ही त्या गाईडच्या मागे गेलो. नंदाच्या प्रशस्त लांब जुन्या वाड्यात शिरलो. पहिल्याच खोलीत बाळकृष्ण पाळण्यात आमच्या झोक्यांची वाट पाहत होता. तिथल्या पुजाऱ्यांनी आमच्याकडून साग्रसंगीत पूजा करून घेतली; बाळकृष्णाला झोके देण्याची आम्हाला संधी दिली; धन्य धन्य वाटले. सर्व शांततेने पार पडल्यानंतर पुजाऱ्यांनी आमच्यासमोर दानाचे ३ प्रस्ताव ठेवले -

१.) रु. ५००१ बाळकृष्णाच्या आजीव सेवेला;

२.) रु. २५०१ बाळकृष्णाच्या १ वर्ष सेवेला;

३.) रु. १२५१ बाळकृष्णाच्या १ महिना सेवेला;

आमच्या चेहेऱ्यांकडे पाहत त्यांनी आमच्या असल्या - नसल्या गुणांचे भरपूर कौतुक केले. दान केल्यानंतर आम्हाला आमरण मिळणाऱ्या कृष्णकृपेचे आमिष दाखवले. आम्हाला त्या क्षणी काय भूल पडली कोण जाणे. त्यांनी आम्हाला १०,००० रुपये जरी मागितले असते तरी आम्ही खुशीने दिले असते. सुदैवाने सौ. आशाच्या पर्समध्ये १४०० व चि. सौ. सीमाच्या जवळ ८०० रुपयेच निघाले. त्यांनी उदार मनाने आमचा १२५१ चा ( दुसरा ) व सीमाचा ५५१ चा ( तिसरा ) प्रस्ताव जुळवून घेतला. आम्ही भगवंताच्या आशीर्वादाने स्वतःला धन्य करून घेतले. हर्षविभोर हृदयांनी आम्ही बाहेर पडलो. आमच्या मनात जराही शंका आली नाही. गाईडने ११ रुपये घेऊन संतोष व्यक्त केला; बाहेर पडलो. धरमसिंगाने पहिला प्रश्न विचारला, 'पंड्याने कितीला गंडवले ?' 'कोण पंड्या ?' आमचा प्रश्न. 'तुमच्या बरोबरचा गाईड' . क्षणात आमच्या आनंदाचा, दानाच्या सुखाचा बुडबुडा

फटकन फुटला. काहीही न बोलता आम्ही गाडीत बसलो व परतीच्या प्रवासाला लागलो. मथुरेच्या हॉटेलमध्ये संध्याकाळी ७ वाजता पोचलो. गोरज मुहूर्तावर आमची आजची मुशाफिरी संपली होती, खिन्नता मनात दाटलेल्या अवस्थेत !

### ३ नोव्हेंबर २००५

काल उशीर झाल्यामुळे एक महत्वाचे स्थान राहिले होते - द्वारकाधीश मंदिर. त्याच्या दर्शनाच्या वेळा फार मर्यादित होत्या; आम्ही लवकर उठून सायकल रिक्षाने मंदिरात दाखल झालो. १० वाजले होते आणि नुकताच पडदा झाकला गेला होता; आता ११ पर्यंत तो उघडणार नव्हता. यमुना नदी जवळच आहे हे कळल्यावर आम्ही तिच्या दर्शनासाठी निघालो. आज मात्र तिने आम्हाला निराश केले नाही. आम्ही नदीवरच्या २४ घाटांपैकी प्रमुख विश्रामघाटावर आलो. नदीचे पात्र खूप रुंद, लांबवर पसरलेले होते. एक नाववाला आम्हाला यमुनेचे सैर करायला बोलवत होता. काठावरील दात झाडीच्या प्रतिबिंबामुळे काळ्याशार पाण्याच्या यमुनेच्या पात्रात आम्ही अर्धा तास नौकाविहार केला. काठावर आल्यावर यमुनेची पूजा केली. चोहीकडून ‘यमुना महाराणी की जय’  असे जयघोष होत होते. ११ ला ५ मिनिटे कमी असताना आम्ही मंदिरात दाखल झालो. लगेच पडदाही दूर झाला आणि वैभवशाली द्वारकाधीशाचे दर्शन झाले. इतर मंदिरांप्रमाणे हे मंदिरही खूप विशाल होते; गर्दीही खूप होती; पण दर्शन छान झाले. थोड्या वेळाने पुजाऱ्याने फेकलेला मूर्तीवरील एक हार अचानक माझ्या गळ्यात अलगद येऊन पडला. प्रसाद म्हणून मी त्याचा स्वीकार केला. आशा तर

हर्षभरित झाली. आमची भेट भगवंताने स्वीकारल्याची ती पावती होती जणू !

मंदिरात हिंडून बाहेर आलो. एका 'गुजराती हिंदू हॉटेल' मध्ये कालच्या वैष्णव हॉटेलसारखे रुचकर, भरपेट जेवण मिळाले. व्रजवासी हॉटेलमध्ये घरी नेण्यासाठी खरपूस पेढे व थोर ही मिठाई घेतली. व्रजभूमीचे सर्व दर्शन झाले होते; मनाने तृप्त झालो होतो.

इथल्या लोकांना आपण व्रजवासी असल्याचा एव्हढा अभिमान आहे की जागोजागी दुकानांच्या नावात व्रजवासी शब्दाचा अंतर्भाव असतो. अगदी आमच्या 'व्रजवासी रॉयल हॉटेल' पासून ते व्रजवासी बेकरी, डेअरी, किराणा दुकान, फर्निचर, पार्लर, अगदी hair cutting salon पर्यंत सर्व व्यवसाय हे बिरुद अभिमानाने मिरवत असतात.

संध्याकाळी ६ वाजता ऑगस्ट क्रांती राजधानी एक्सप्रेस दिल्लीहून आली. भरल्या पोटी ढेकर द्यावा तास भरल्या अंतःकरणाने आम्ही व्रजभूमीचा निरोप घेतला, व्रजवासी भगवान श्रीकृष्णाच्या शैशवाला अंतःकरणात साठवून !

आधुनिक विकासाच्या लाटेत मथुरा खूप बदलत आहे; पण गोकुळ अजून बाळकृष्णाच्या लीला उराशी कवटाळून बसले आहे आणि वृंदावन ! ते तर राधाकृष्णाच्या रासक्रीडेच्या स्वप्नात अजून विहरत आहे. राधे राधे !

## व्हिक्टोरिया - कॅनडा

कॅनडाला आमची ही चौथी भेट. पहिल्या १९९० च्या भेटीत पूर्व कॅनडातील टोरांटो, तिथला C. N. Tower आणि मुख्यतः Horse Shoe आकाराचा मुख्य नायगारा धबधबा पहिला; ती आमची अमेरिकेचीही पहिली भेट. चि. तनुजा - अभयच्या शिकागोतील लग्नासाठी. २००० साली आम्ही चि. अंजू व रश्मीबरोबर कमाकडे एडमंटनला गेलो होतो. त्या शहरातील मोठा बझार व जॅस्पर नॅशनल पार्कमधील हिमनदीचा अद्भुत देखावा आम्ही पाहिला. २००२ साली आम्ही व्हॅन्कुव्हर पाहिलं, ती आमची तिसरी भेट आणि २००३ साली २४ - २५ मे ला आमची कॅनडा (पश्चिम) ची चौथी भेट झाली, 'व्हिक्टोरिया' शहर पाहण्यासाठी.

व्हँकुव्हर बेटाच्या दक्षिण टोकावर वसलेलं व्हिक्टोरिया शहर हे कॅनडाच्या पश्चिम किनाऱ्यावरील British Columbia प्रांताची राजधानी आहे. खास ब्रिटिश धर्तीचे, इंग्लिश जीवनाची, वातावरणाची जागोजागी छाप असलेले हे शहर मुंबईच्या 'फोर्ट'; लंडनच्या 'West End' सारखे. ब्रिटिश धर्तीच्या प्रचंड दगडी वा सिमेंट काँक्रिटच्या डौलदार इमारती, घोडागाड्या, समुद्रकिनाऱ्याची पार्श्वभूमी, ताजमहाल, ओबेरॉय - शेरेटनसारखी 'पॉश' हॉटेल्स, थंड व उबदार हवामान; जागोजागी मुंबई फोर्टची आठवण करून देणारे - फक्त नव्हती ती मुंबईची गर्दी आणि घामट चिकचिक !

२४ मे २००३, शनिवारी आम्ही सर्व जोशी कुटुंबीय दोन गाड्या भरून सकाळी ९ वाजता निघालो. चि. अंजू व तनुजाने सर्व

नियोजन, आरक्षणे आणि तयारी केली होती. सौ. तनुजाची अमेरिका भेटीला आलेली बहीण कुमुदताई आमच्यात समाविष्ट झाल्या. कॅनडा - अमेरिका सरहद्दीकडे आम्ही निघालो. २००२ सालच्या व्हॅंकुव्हर भेटीप्रमाणे I - 5 Highway वरील Rest Area मध्ये न्याहारी; सरहद्दीवरील तपासणीचे सर्व उपचार व अनुभव उरकून आम्ही व्हॅंकुव्हरमध्ये न शिरता बोटीच्या Tsswwanssen (उच्चार वाचकाने हवा तसा करावा) नावाच्या बोटींच्या धक्क्याकडे वळलो. बंदराशेजारी एका Cafeteria मध्ये घरून आणलेल्या उप्पीट, परोठे, सॅंडविचेस, दह्यावर लंच केलं व दुपारी २ वाजता बोटीने व्हॅंकुव्हर बंदर सोडले. पॅसिफिकमधील छोट्या छोट्या बेटांना बगल देत ३:४५ ला आम्ही Victoria च्या Shwartz Bay या बोटीच्या धक्क्यावर पोचलो.

British Columbia कंपनीची ही बोट एक चार मजली चालती तरंगती इमारतच होती - लांबरुंद आणि प्रशस्त, ऐसपैस. तळमजल्यावर प्रवाशांच्या गाड्या, प्रवासी बसेस, ट्रक्स या वाहनांचा Parking Lot. इथं हे फार छान असतं; तुम्ही तुमच्या गाड्या देऊन बोटीवर प्रवेश करता व प्रवास संपला की गाडीतून बाहेर पडता. दुसरा व तिसरा मजला - प्रवाशांच्या आरामशीर बैठका, Cafeteria, दोन्ही बाजूंनी Open Decks असतात; प्रवास करता करता तुम्ही बसून वा हिंडत फिरत समुद्राची, बेटांची, आकाशाची दृश्ये पाहू शकता; बोटीवरील Games खेळू शकता; खाऊ - पिऊ शकता; वरच्या मजल्यावरील डेकवर जाऊन Open to Sky दृश्ये पाहू शकता. रेल्वेसारखा एका जागी जखडलेला प्रवास नाही; गर्दीचा त्रास नाही. सगळं स्वैर,

आरामशीर, बंधनरहित. सर्व डेकना बाजूला जाड काचा. चुकून समुद्रात पडण्याची भीती नाही; पण समुद्रातील लाटा पाहायला अडथळा नाही. आणि हे दोन्ही मजले Air Conditioned. The entire journey is a pleasure trip ! ३:४५ वाजता आम्ही आमच्या गाड्यांतून बोट सोडली व व्हिक्टोरियाच्या जमिनीवर प्रवास सुरु केला. अर्ध्या तासात आम्ही १२ मैलांवरील (अमेरिका कॅनडात अंतर अजून मैलांत मोजतात; किलोमीटरमध्ये नाही) पहिल्या प्रेक्षणीय स्थळापाशी आलो - बुचार्ट बाग.

**Buchart Gardens**

सर्वच व्हिक्टोरिया शहर पॅसिफिकच्या सान्निध्यामुळे उबदार हवामान, बारमाही पाऊस व सुपीक जमीन यांमुळे सगळीकडेच फुलांनी बहरलेले आहे. रस्तोरस्ती लटकवलेल्या फुलांच्या कुंड्या व त्यांमधून डोकावणारे फुलांचे झुबके पाहावयास मिळतात. शहरात अनेक बागा आहेत. त्यात शहराच्या थोडासा बाहेर असणारा ‘बुचार्ट बाग’ हा बागांचा बादशहा आहे. सुरवातीस श्री. व सौ. बुचार्ट यांनी आपल्या खाजगी उभारलेला हा बाग अधिक सार्वजनिक झाला आहे. शहराचे एक प्रमुख भूषण व प्रवाशांचे आकर्षण झाला आहे.

१५ एकर जमिनीवर पसरलेला हा बाग अनेक भागांत विभागला आहे. झुलता बाग ( Hanging Gardens ) मध्ये मांडवासारखी वळणे आहेत व त्यांत वर मोठमोठ्या टांगलेल्या कुंड्यांतून विविधरंगी फुले बाहेर झेपावतात. प्रत्येक मांडवात २०-२५ कुंड्या व असे ४ मांडव आहेत. प्रत्येक कुंडीतील फुले एकाच जातीची व अनेक रंगांची असल्यामुळे त्यांचे सर्वत्र पसरलेले

मिश्रण मोठे मनोहर दिसते. दुसरा विभाग होता ‘खोलगट बाग’ ( Sunken Garden ) एखाद्या मोठ्या कढईसारख्या खोल व प्रशस्त भूभागात फुलांचे शेकडो फुलबाग (Flowerbeds) फुललेले होते - विविध जातींचे व रंगछटांचे. त्यांच्यातून छोट्या वाटा व नागमोडी हिरवळीचे पट्टे होते. मध्ये एक मोठे उत्तुंग कारंजेही आहे. वेड्यावाकड्या वाटांच्या दोन्ही कडांनी हा बाग खूप पसरलेला आहे. थोडा वेळ फिरून आम्ही ज्येष्ठांनी वरूनच पाहणे पसंत केले; तरुणांनी आणि बालवर्गाने (आमची ३ वर्षांची सानिकासुद्धा) संपूर्ण चालत हे सौंदर्य अवलोकन केले.

जपानी बाग - हा तिसरा बाग - परिपूर्ण व छोट्या स्वरूपात होता. सर्व रोपे दीड  - दोन फुटी उंच झाडे - फांद्या, पाने, फुले यांनी परिपूर्ण होती. सर्वच छोटे छोटे (पिग्मी) व स्मरणीय होते. ही झाडे जास्ती वाढू देत नाहीत.

चौथा विभाग होता गुलाब बाग (Rose Garden), ज्यांत सर्व गुलाबांची विविध रंगी फुले होती. जगातील अनेक देशांतून (५० पेक्षा अधिक) गुलाबांच्या दुर्मिळ जाती या बागेत होत्या. ही फुले जूनमध्ये बहरतात. आम्ही त्याआधी आल्यामुळे आम्हाला अस्फुट कळ्यांच्या दर्शनावरच समाधान मानावे लागले. सर्व बाग फुलल्यानंतर रंगांची रेलचेल किती असेल याची कल्पनाच मोठी विस्फारित करणारी होती.

याशिवाय १६ बाजू असलेला एक मोठा तलाव, २ भव्य कारंजी, उपाहारगृह व Gift and Seed Shop (भेटकार्डे व बी - बियाणे) हेही विभाग होते. सगळीकडे फुले इतकी भरगच्च आणि भरपूर

होती की कचराकुंड्यांवरसुद्धा फुलांनी लहडलेल्या कुंड्या ठेवल्या होत्या. सुगंधी, नुसती शोभिवंत असलेल्या सहस्त्रावधी फुलांची ही प्रचंड बाग पाहून आमचे डोळे निवले आणि अक्षरशः शिणले. अष्टरंगांच्या (काळा सोडून) विविध रंगछटांनी विनटलेली फुले निसर्गाची अप्रतिम किमया होती; रंगांची आणि विविधतेची लयलूट होती. आम्ही पाहून पाहून दमलो. दिवस मोठा असल्यामुळे ८:३० वाजले तरी सूर्यप्रकाश भरपूर होता. एक समृद्ध अनुभव उराशी बाळगून आमच्या Hotel Motor Inn वर आलो.

लवकर जेवण उरकून आम्ही रात्री १० वाजता British Columbia Royal Museum मधल्या National Geographic I-Max Theatre मध्ये The Day of the Tiger हा एक तासाचा लघुपट पहिला. भारतातील कुमाऊं जंगलातील दृश्ये, जिम कॉर्बेटच्या जीवनातील परिवर्तन - नरभक्षक वाघांचा शिकारी वाघांचा संरक्षक बनतो, हे सर्व भव्य पडद्यावर पाहून मायभूमीबद्दल धन्यता वाटली. काही भारावलेले गोरे प्रेक्षक आम्ही भारतीय आहोत हे ओळखून आमच्या भोवती गोळा झाले. थोडा वेळ आमची कॉलर ताठ झाली आणि असे वाघ आमच्या शेतात नेहमी वावरत असतात अशा थाटात आम्ही त्यांच्याशी गप्पा मारल्या. Oh yes, they are very ferocious; but they won't hurt you unless you tease them … आणि मग त्या गोऱ्यांचे डोळे विस्फारून बोलणे - Oh really, how cute! … रात्री Downtown मधून गाडीतून फिरत फिरत इमारती, रोषणाई केलेली Legislature Building

(मंत्रालय), मोठमोठी ५-स्टार हॉटेल्स, ब्रिटिश धर्तीच्या इमारती पाहत पाहत हॉटेलवर आलो.

### २५ मे , रविवार

सकाळी लवकर तयार झालो. पाहण्याची स्थळे खूप व वेळ कमी; थोडक्यात रात्र थोडी आणि सोंगे फार होती. बरीचशी स्थळे बाहेरूनच पहिली. लक्षणीय दोन स्थळे निरखून पहिली; Miniature World (छोटे जग). Empress Hotel या 5-Star हॉटेलच्या एका प्रशस्त दालनात हे एक छोटे जग उभे केले होते. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धातील देखावे अगदी हुबेहूब, जसेच्या तसे, लहान प्रमाणावर उभे केले होते. घरे, माणसे, पूल, चर्च, तोफा, सैनिक, विध्वंस विलक्षण वास्तववादी वाटत होते. Reaping The Whirlwind या दृश्यात अमेरिकेन - रशियन विमानांनी केलेल्या बॉम्ब वर्षावात उध्वस्त झालेले बर्लिन शहर इतके हुबेहूब उभे केले होते की आम्ही भान हरपून पाहत होतो. Dolls House (बाहुलीचे घर) मधील वेगवेगळी दालने, Tudor Mansion या प्राचीन सरदारगृहातील (Mansion) प्रेक्षागृहे, Circus Arena मधील त्यांची शहरातील मिरवणूक - तंबू, जनावरे, पिंजरे, विदूषक वगैरे सर्व कलावंत पाहून हे जग तयार करण्याऱ्या कलावंतांचे कसब व कौशल्य अप्रतिम वाटले. छोट्या जागेत - एक मोठा हॉल - हे जग काटक्या, लाकूड, गवत, छोट्या वस्तू यांच्या साहाय्याने इतके विलक्षण खरेखुरे झाले होते की बस्स ! मानवनिर्मित कलाकृती या दृष्टीने हे दालन अभूतपूर्व, प्रेक्षणीय, लक्षणीय वाटले.

चि. सारंगच्या आग्रहास्तव पाहिलेले Underneath the Sea हे मत्स्यालय खास वाटले नाही. समुद्राच्या पाण्यात एक पाणबुड्या वेगवेगळ्या जातीचे मासे दाखवत होता; सोबत एक युवती धावती टिप्पणी - Running Commentary करत होती. बहुचर्चित Octopus (अनेक सोंडांचा प्राणी) ही फारसा प्रभावी वाटलं नाही. शिराळ्याच्या नागपंचमीतील वारंवार खेळवून ढिला झालेला नाग जसा लुळा वाटला, तसाच तो ऑक्टोपस गलितगात्र वाटला.

ज्यांनी लंडनमधील Madame Tussaud Wax Museum पाहिलं नव्हतं, त्यांनी येथील मेणाचे प्रेक्षालय पाहिले. आम्ही दोघे एका बाकावर चि. अंजूने आणलेले लेमोनेड पीत, पाय लांब करून बसलो.

वेळेअभावी आम्ही इतर प्रेक्षणीय स्थळांना, Garden, Butterfly Museum, एक जुना किल्ला, Observatory या सर्वांना बाहेरूनच टाटा केलं. Subway Sandwich खाऊन बोटीच्या धक्क्याच्या दिशेने गाड्या वळवल्या. संध्याकाळी ५ ची व्हॅन्कुव्हर बोट पकडली व परत Canada - US border ओलांडून रात्री १०:३० वाजता घरी परतलो.

# दक्षिण भारत सहल

आम्ही वारणानगरला असताना दोन मोठ्या, दीर्घ भारतीय सहली केल्या: एक दक्षिण भारत व दुसरी उत्तर भारत.

1981 साली मार्च मध्ये दक्षिण भारत सहलीची जाहिरात वाचण्यात आली. प्रशांत ट्रॅव्हल्स यांची संपूर्ण भारताची एक महिन्याची सहल, १ मे ते ३० मे. परीक्षेची सर्व कामे संपली होती, पुण्याला शिकायला असलेली मुले सुट्टी असल्यामुळे घरी आली होती. त्यांच्या आग्रहाने आम्ही ही संधी घ्यायचे ठरवले. कोल्हापूरला जाऊन पैसे भरले. प्रवासाची सर्व तयारी केली व आम्ही दोघे आमच्या दोन सुटकेसेस घेऊन ठरलेल्या दिवशी कोल्हापुरात आलो. सर्व प्रवास बसनेच होता. सोळा सहप्रवासी, बहुतेक सर्व कोल्हापूरचे. बस सकाळी 11 वाजता निघाली. तुंगभद्रा धरणाचे विशाल पात्र पार करून व टेकडीवरील हनुमंताचे दर्शन घेऊन आमचा दक्षिण दिशेने प्रवास सुरू झाला.

पहिले प्रेक्षणीय स्थळ होते प्राचीन विजयनगरचे साम्राज्य हम्पी व बदामी. या दोन स्थानांमध्ये पसरलेले साम्राज्याचे विशाल अवशेष पाहून मन खिन्न झाले. प्रवेशाला एका प्रचंड शिळेमधून कोरलेली श्री गणेशाची मूर्ती लक्ष वेधून घेते. जिकडे पहावे तिकडे मैलोनमैल प्रचंड शिळा, दगड व त्याला वेढून असलेले वाळलेल्या गवताचे जंगल! 'काय होते आणि काय राहिले' याची विषण्ण जाणीव करून देते.

हिंदुस्थानला मुस्लिम सत्तेचा विळखा पडला त्याची सुरूवात विजयनगर, दक्षिणेतील या सामर्थ्यशाली साम्राज्याच्या अधःपतनापासून झाली. आणि तो विळखा तथाकथित आजच्या निधर्मी सरकारला कसा ग्रासून राहिला आहे याची उदासवाणी जाणीव ही उद्ध्वस्त भूमी करून देते. खूप वाईट वाटले. आम्ही सर्वजण विषण्ण नजरेने वर्तमान काळातील भूतकाळ अनुभवत होतो. ही विदारक जाणीव प्रत्येक हिंदूधर्मीयाला जागी करणारी आहे.

बदामीला एक छोटेसे गोल मंदिर आहे. त्याचा कळस लोप पावलेला आहे, मूर्तीही अदृश्य झाली आहे, पण मंदिराला सात छोटे नाजूक खांब आहेत. एखादे लांब पेन किंवा छोटी पातळ काठी घेऊन खांबावर हलकेच आघात केले तर सा रे ग म प ध नी हे सूर गोड आवाजात बाहेर पडतात. आमच्यातील संगीतप्रेमींनी त्याची खात्री करून घेतली.

उद्ध्वस्त, अवशिष्ट शिल्पातूनसुद्धा त्या वेळचे बांधकाम व कोरीव कलाकाम किती उत्कृष्ट होते याचा प्रत्यय येतो. ते स्थळ अंतःकरणात एक सांद्र उदासी घेऊन आम्ही सोडले, परत परत मागे वळून बघत! पुढचा मुक्काम होता हैदराबाद. आमच्या कॉलेजच्या (४० गावच्या) सहलीमध्ये हे शहर त्याच्या सर्व प्रेक्षणीय स्थळांसह पाहिले होते, सालारजंग म्युझियम, चारमिनार, सिकंदराबाद वगैरे; त्याचे वर्णन त्या सहलीत आले आहे. या ट्रिपमध्ये कमी वेळ असल्यामुळे फारसे त्या वेळेइतके पाहावयास मिळाले नाही. संधी साधून मी चारमिनार जवळच्या

गल्लीतून आमची धाकटी कन्या अंजूसाठी हिरव्या निळ्या खड्यांचा आणखी एक सुंदर सेट घेतला.

त्यानंतर थांबा होता सुप्रसिद्ध तिरुपती. तिरुपती हे गावाचे नाव आहे, देवाचे नाव आहे तिरूमल. मंदिर बऱ्याच उंचीवर आहे. मंदिराकडे जाणारा रस्ता नागमोडी, वळणा वळणाचा वर चढत जाणारा आहे. काही वळणांनंतर शेवटी एक थेट चढाचा रस्ता येतो. तेथे एक विलक्षण दृश्य आम्हाला दिसले.अनेक स्त्री-पुरुष डोक्याचे पूर्ण केशवपन करून काही गुडघ्यांवर रांगत, तर काही दोन हात दोन पाय वापरून पुढे चढत होते, देवाला बोललेला नवस ते लोक पूर्ण करत होते. थोडा वेळ गाडीतून उतरून आम्ही भक्तीचा हा विलक्षण प्रकार स्तंभित होऊन पाहात राहिलो. रस्त्याचा एक भाग त्यांच्यासाठी राखीव होता.

मंदिरात आल्यानंतर लक्षात आले दर्शनासाठी खूप गर्दी होती आणि प्रत्यक्ष मूर्तीपर्यंत जाईपर्यंत बरेच तास प्रतीक्षा करावी लागणार होती. दर्शनापूर्वी वेळ घालवण्याची व्यवस्था मात्र छान होती. तीन प्रतीक्षा गृहे (मोठे हॉल्स) सर्व सोयींनी युक्त- आराम करण्याची, पैसे देऊन खाद्यपदार्थ मिळण्याची, इडली सांबार किंवा सांबार भात अल्प किमतीत पोटभर मिळत होते. बाहेर जाऊन फिरून येण्याची सोय होती. मूर्तीच्या दर्शनाजवळच्या हॉलमध्ये रांगेने गर्दी पुढे सरकत होती. पहिल्या व दुसऱ्या हॉलमध्ये सर्वजण एकदम प्रगती  करत होते. दीड दिवस (एक दिवस रात्र पूर्ण अर्धा दिवस) वाट पाहिल्यानंतर तिसऱ्या हॉलमध्ये दर्शनाच्या रांगेत आमचा नंबर लागला. खूप कंटाळवाणी उभे राहण्याची प्रतिक्षा संपल्यानंतर दर्शनाला नंबर

लागतो आणि दर्शन ते कसले देवाचे तोंड दिसते न दिसते तेवढ्यात  तुम्ही गाभाऱ्यातून बाहेर ढकलले जाता. Whisk या शब्दाचा अर्थ तुम्हाला अनुभवाने कळतो. You are simply whisked out. गाभाऱ्यात  प्रकाश जाणीवपूर्वक मंद असतो. इतक्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर सुद्धा देवदर्शन खऱ्या अर्थाने होतच नाही. असाच अनुभव दक्षिण भारतातील सर्व मंदिरात येतो. २०१२ साली केरळमधील गुरुवायूर आणि पद्मनाभ मंदिरात असाच अनुभव आला होता. तेथे तर देव पूर्णपणे काळोखात, त्यांच्या तोंडावर एक छोट्या मिणमिणत्या दिव्याचा प्रकाश, कुठे बघायचे हे कळायच्या आतच आपण मंदिराबाहेर ढकलले गेलेलो असतो. ही दर्शनाची mystery का ते काही कळत नाही. एकमेकांना विचारत  'देव दिसला का?' आम्ही बाहेरच्या वाटेला लागलो. आमच्यापैकी कोणाचेही जराही समाधान झाले नव्हते, पण......

पुढचा मुक्काम श्रीशैल्यम. हे मंदिर छान आहे, नदीच्या झुळझुळत्या प्रवाहाच्या कडेला असलेले भगवान शंकराचे मंदिर खूप समाधान देऊन जाते. एका पुजाऱ्याशिवाय येथे कोणीही नाही, कोणी अडवत नाही, थांबवत  नाही.

तेथून आम्ही गेलो चेन्नईला. चेन्नईचा 'मदिना बीच' खूप सुंदर आहे, रमणीय आहे. बंगालच्या उपसागराचा आम्ही पाहिलेला हा पहिला किनारा. खूप सुखद आहे. लाटा लहान मुलासारख्या पायाशी घोटाळतात व मागे जातात. It is pleasing . मद्रास शहरांमध्ये खास काही नाही, इतर शहरांसारखेच. बहुतांश माणसे लुंगी मध्ये,पॅन्ट शर्ट मध्ये फारच  थोडे आणि आपल्याला

न समजणारी दक्षिणी भाषा बोलणारे. दक्षिणेकडील सर्व राज्यांची खासियत एकतर ते त्यांची भाषा बोलतात - तमीळ, मल्याळी, कानडी किंवा इंग्रजी. हिंदी बोलायला कोणीही तयार नसतात . English न येणाऱ्या आमच्या भगिनी वर्गाची शॉपिंगच्या वेळी फार पंचाईत झाली. चेन्नईच्या १ दिवस मुक्कामानंतर म्हणून तर आम्ही आणखीन दक्षिणेकडे असलेल्या पाँडीचेरी (आता पुदुच्चेरी) ला भेट दिली. श्री अरविंद यांचा आश्रम खूप साधा होता. येथून समुद्र अगदी जवळ होता. पाण्यातूनच बऱ्याचशा हालचाली, ताडामाडांची नारळाची उंच उंच झाडे, समुद्रांच्या संथ हलक्या लाटा आणि अरविंदबाबूंचा रमणीय छोटेखानी आश्रम! निसर्गाने आपल्या सौंदर्याची इथे लूट मांडली होती. आमच्या कोडॅक कॅमेऱ्यातील एक रोल आम्ही इथे संपवला. आत्तापर्यंत ४ रोल संपले होते. मुलांना दाखवण्यासारखे खूप नयनरम्य फोटो आम्ही कॅमेऱ्यात साठवले होते. मुले मोठी असल्यामुळे घरी राहिली होती. इंदू भोसले व मुलांची आजी (आशाची आई) त्यांच्या सेवेला असल्यामुळे त्यांची गैरसोय होण्याची चिंता नव्हती. या सहलीमध्ये आमच्याशिवाय बाकीचे सर्व प्रवासी कोल्हापूरचे होते.

चेन्नईनंतर आणखी दक्षिणेकडे आम्ही महाबलिपुरमला भेट दिली. तेथे महाभारतातील पांडव व इतर अनेक योद्ध्यांच्या दगडातील प्रचंड मूर्ती कोरलेल्या होत्या. नंतरचे स्थळ ते सुप्रसिद्ध रामेश्वर. येथे शंकराचे खूप मोठे मंदिर आहे. प्रभू रामचंद्रांनी येथे स्थापन केलेल्या प्रचंड पिंडीवर अभिषेक करणे हे मोठे पुण्यदायी कृत्य असते. त्यापूर्वी मला २४ वेळा थंड पाण्याने अंघोळ - उघड्या अंगाने स्नान करावे लागले आणि

नंतर सर्वांनी एकत्र अभिषेक केला. खरं तर वाराणसीची गंगा शिवलिंगावर अर्पण करून मग रामेश्वरच्या पिंडीवर अभिषेकासाठी वापरायची असते. माझे उलटच झाले. आधी रामेश्वर मग काशी असा क्रम झाला, असो.

रामेश्वरहून पंदनला आम्ही परत गेलो. येथून लंका सर्वात जवळ आहे. रामायणातील सेतू इथे बांधल्याची आख्यायिका आहे. फेरीतून येत असताना आम्ही पाण्यात डोकावून तो कुठे दिसतो का पाहण्याचा प्रयत्न केला पण आम्ही सर्वसामान्य मानव असल्याने सेतूचा मागमूसही दिसला नाही. आणि यानंतर आले प्रसिद्ध क्षेत्र कन्याकुमारी. कन्याकुमारी देवीचे मंदिर छोटेसे आहे. देवीचे दर्शन करून आम्ही फेरी घेऊन विवेकानंद स्मारक मंदिराच्या प्रचंड शिळेवर आलो. तीन सागरांच्या संगमावर प्रचंड मोठ्या खडकावर बांधलेले विवेकानंदांचे स्मारक सर्वार्थाने अप्रतिम आणि अलौकिक आहे. श्री एकनाथजी रानडे यांनी 21 वर्षे भारतभर भटकंती करून सरकार, खाजगी संस्था, वैयक्तिक देणग्या गोळा करून हे स्मारक उभे केले आहे. त्यांची आमची भेट झाली, गप्पा मारल्या. सौ.आशाची ज्ञानेश्वरी अध्यापनाची माहिती ऐकून त्यांनी तिच्याशी अधिकच आपुलकीने गप्पा केल्या. आम्ही स्मारकाच्या परिसरात स्वैर भटकलो. स्मारकाच्या पाठीमागे एका मोठ्या शिळेवर आम्ही दोघे पाण्यात पाय सोडून बसलो होतो. कोणीतरी पाठीमागून बोलले, 'तीन समुद्राचा हा महासंगम आहे' (डावीकडे बंगालचा उपसागर, उजवीकडे अरबी समुद्र, आणि समोर विस्तृत पसरलेला हिंदी महासागर). आमच्या पायातून डोक्यापर्यंत एक आनंददायक शिरशिरी गेली. काहीतरी विलक्षण, उदात्त

आध्यात्मिक भावनेने आम्ही भारून गेलो. आम्ही ओंजळीतून पाणी प्राशन केले, खारट होते.

कन्याकुमारी मध्ये आम्ही एक सबंध दिवस घालवला, स्वैर हिंडण्यात, पाहण्यात. केरळची हद्द ओलांडून सुचींद्रम पर्यंत गेलो. तेथील हनुमंताची मोठी मूर्ती पाहिली. सुचींद्रम पासून तिरुवनंतपुरम (त्रिवेंद्रम) फक्त ४० मैल होते, पण केरळ आमच्या कार्यक्रमात नव्हते. आम्ही परत फिरलो. मदूरेला आलो. मदुराईचे मिनाक्षी मंदिर पाहिले, त्याचे प्रवेशद्वारच विलक्षण सुंदर होते, कमानीवरच्या छोट्या छोट्या रंगीत रेखीव मूर्ती पाहण्यात आम्ही रमून गेलो. देवीचे मंदिर तर अप्रतिम सुंदर आहे. देवीची उंच, रेखीव मूर्ती पाहून नेत्र सुखावले. दक्षिणेकडे सर्वत्र मंदिरे, त्यातील देवतांच्या मूर्ती आणि सजावटीचे रेखीव सौंदर्य विलक्षण आकर्षक, वेधक आणि खास दक्षिणी शैलीचे आहे. उत्तरेकडे किंवा महाराष्ट्रामध्ये हा कोरीवपणा आणि विशिष्ट सुंदर शैली क्वचितच आढळते. आम्ही पाहातच राहिलो, डोळे हालायलाच तयार नव्हते.

मदुरेनंतर एक दिवस मुक्काम होता कांजीवरमला. अर्धा दिवस साऱ्या भगिनींनी साड्या खरेदीची धमाल केली, काही हजारांचा सौदा नक्कीच झाला.

चेन्नईला येण्यापूर्वीचा एक महत्त्वाचा उल्लेख राहूनच गेला. तंजावर (Tanjore) व तेथील व्यंकोजी महाराजांचा (छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ) मराठी छापाचा महाल व बृहदेश्वर मंदिर पाहिले. मंदिराचे शिल्पकाम व कोरीव काम फार

सुंदर आहे. त्याच्यावर दक्षिणेची छाप आहे. मंदिर खूपच मोठे व रेखीव आहे. पाहण्यासाठी कित्येक तास जातात आणि मान अवघडून जाते.

दक्षिणेकडील सर्वच मंदिरे भव्य बांधकाम, भक्कम दगडी, आणि दगडातील खोदकाम आणि कोरीवकाम कुठेही भारतात पहावयास मिळत नाही. धार्मिक मूर्तींची जडण-घडण अप्रतिम रेखीव आहे. पाहातच रहावेसे वाटते.

दक्षिणेकडील प्रवासात एक कंटाळवाणा, तोच-तोचपणा म्हणजे खाण्यातील एकसुरीपणा. सर्व प्रवासात न्याहारीला इडली व पातळ चटणी, जेवणाला सकाळ-संध्याकाळ भाताच्या प्रचंड मुदी व त्यावर बादलीने वाढले जाणारे सांभार, कुठेही पुऱ्या, चपाती, भाजी, कोशिंबीर नाहीत. या स्वागताला आम्ही कंटाळलो होतो.

कांजीवरमवरून आम्ही बंगलोरला बाजूला टाकून आधी म्हैसूर ला आलो. आधीच्या आम्हा दोघांच्या एका वैयक्तिक ट्रिपमध्ये आम्ही बेंगलोर, म्हैसूर व  उटी पाहिले होते, त्यामुळे तेथील त्रोटक वर्णन देऊन मी पुढे सरकतो.

मैसूरला जाण्यापूर्वी आम्ही शहरापासून ६०  मैल बाहेर अंतरावर असलेल्या शिवमंदिर व विष्णू मंदिर यांना भेट दिली. दोन्ही मंदिरे डाव्या उजव्या  बाजूला कमालीची सारखी identical! मूर्ती सोडता सर्व बाबतीत आम्ही दोन्ही मंदिरांचे कोरीवकाम व त्यांच्यातील विलक्षण साधर्म्य पाहून थक्क झालो. काय कारागिरी

आहे! मागच्या आमच्या भेटीत या मंदिराजवळ आणखीन एक गोष्ट माहिती होती - श्रवणबेळगोळ डोंगरावरून खालील मूर्तीवर केलेला दुधाचा अभिषेक. दुधाच्या धारा देवांच्या डोक्यावर पडत असतात आणि खालून तो देवदुर्लभ देखावा आम्हाला गेल्या भेटीत पाहायला मिळाला होता; तिथी कोठली होती आठवत नाही.

कावेरी नदीच्या छोट्या धबधब्यापासून कारंजी व musical fountain पर्यंत चालून आम्ही थकलो होतो. आजचे sight seeing बरेच taxing झाले होते. मोठे कारंजे व त्याप्रमाणे संगीताचे सूर हा चमत्कार आम्ही सर्वजण प्रथमच अनुभवत होतो. तो एक अद्भुत चमत्कार होता. ९.३० वाजता तो सोहळा व त्याची जादू संपल्यानंतर लक्षात आले आम्ही खूप थकलो होतो, सर्व गात्रे विश्रांती मागत होती. थोड्या अंतरावर आमचा makeshift रात्रीचा मुक्काम कारेकरांनी ऐनवेळी ठरवलेला. एका मंदिराच्या उघड्या ओसरीत; पुजाऱ्याकडून सतरंज्या, चादरी मिळाल्या. अर्ध्या तासातच आम्ही गाढ झोपी गेलो.

आणि तो अपशकुनी दिवस उगवला! पहाटे ४/५ वाजता आम्हा दोघांनाही जाग आली आणि लक्षात आले झोपताना आमच्या दोघांमध्ये ठेवलेली सौ आशा ची पर्स गायब झाली होती. आमची झोप खाडकन उडाली. रात्री आम्ही दोघांनी सर्व मौल्यवान वस्तू पर्समध्ये ठेवल्या होत्या. सौ. आशाच्या मंगळसूत्रासह सर्व दागिने, कानाच्या कुड्या, परदेशी मनगटी घड्याळ, परदेशी नवा कोडॅक कॅमेरा, सर्व कॅश - जवळजवळ दहा हजार रुपये - कोऱ्या करकरीत नोटा, ज्यादा कॅमेरा रोल, वापरलेले रोल, सर्व

सर्व मौल्यवान वस्तू एका झटक्यात आम्हाला सोडून गेल्या होत्या, आम्ही हतबुद्ध झालो. शेजारच्या दोघातिघांना उठवून बातमी दिली. टूर मॅनेजर कारेकरांना सांगितले. त्यांनी जवळच्या पोलिस इन्स्पेक्टरला बोलावून घेतले. चौकशी, जबानी, सर्व सोपस्कार झाले, काहीच निष्पन्न झाले नाही. सहलीत २-३ कुटुंबे आमची मित्र झाली होती, अशोक पाटील त्यांचे मित्र भालेराव सर्वांना एक गोष्टीचे आश्चर्य वाटले की एवढा जबर धक्का बसूनही आम्ही दोघे शांत होतो. काहीच आरडाओरडा, आक्रस्ताळेपणा करीत नव्हतो. मला सौ. आशाच्या शांतपणाचे - तिचे सर्वात जास्त नुकसान झाले होते - मला अंतर्यामी कौतुक वाटले. अध्यात्माचा तिच्या वागण्यात परिणाम जाणवत होता. दोघा-तिघांनी आम्हाला खरेदीसाठी पैसे देऊ केले. आम्ही ते नाकारले. कन्याकुमारी, कांजीवरम येथे आम्ही मुलांसाठी आवश्यक खरेदी केली होती, उसनवार करून नवीन खरेदी करावयाची इच्छा नव्हती व हव्यास नव्हता. सहलीचा मूडच गेला होता. पण वरकरणी आम्ही शांत होतो. ७-८ दिवसांचा प्रवास बाकी होता. कारवार, गोकर्ण महाबळेश्वर येथे रावणाने आणलेले शिवलिंग श्रीगणेशाच्या हुशारीने जमिनीत घट्ट रुतून गेले व शेवटचा गोवा, पणजी, शांतादुर्गा, म्हाळसा वगैरे मंदिर आम्ही आधीच पाहिलेली ती स्थळे पाहून आम्ही कोल्हापूरला व तेथून वारणानगरला परत आलो. सुट्टी संपायला अजून २-३ दिवस अवकाश होता.

दक्षिणेच्या एक महिन्याच्या प्रवासाने आम्ही काळे पडलो होतो - मुलांचे पहिले निरीक्षण. प्रवासाच्या गमतीजमती त्यांना सांगितल्या पण चोरीचे वृत्त त्यांना सांगितले नाही. रात्री सीमाने,

आमच्या थोरल्या कन्येने, आईच्या रिस्टवॉचची मागणी केली. (रात्री सर्व घड्याळांना किल्ली  देण्याची ड्युटी ती करत असे.) त्यावेळी पितळ उघडे पडले. कॅमेरा गेल्याचे दुःख सर्व मुलांना खूप जाणवले. सर्व रोल्स आणि फोटोही गेले होते. आमच्यापेक्षा आमची मुले आणखीन समजूतदार निघाली. त्यांनी आम्हाला काहीही न विचारता बॅगेतल्या सर्व वस्तू योग्य ठिकाणी ठेवून दिल्या. त्यांच्यासाठी आणलेल्या वस्तूंवर मात्र आनंद व्यक्त केला. आजही त्या प्रसंगाची आठवण झाली की तिन्ही  मुलांच्या समजुतदारपणामुळे मन भरून येते. सोमवारी मुलांची शाळा व आमचे  कॉलेज सुरू झाले, दैनंदिन कार्यक्रमात सर्व विसर पडला. त्यावेळी आणलेल्या काही वस्तू - शिंपल्याच्या बाहुल्या, तिघांसाठी त्यांची नावे कोरलेले ३ शंख  घेऊन धातूच्या छोट्या मूर्ती - आमच्या शोकेसमध्ये आहेत.